CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
सोलापूर | बुधवार, १५ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ७० | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### अर्जुनीत अ. भा. मातोश्री जिजाऊ मराठी साहित्य संमेलन

**अर्जुनी मोरगाव :** दुसरे अखिल भारतीय मातोश्री जिजाऊ परिवर्तन मराठी साहित्य परिषद संमेलन १९ जानेवारी रोजी शहरातील एसएसजे महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे. पहिल्या सत्रात सकाळी ११ वाजता आ. राजकुमार बडोले यांच्या हस्ते पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांच्या अध्यक्षतेत उद्घाटन होईल. स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. अनंता सूर राहतील.



अतिथी म्हणून संस्थाध्यक्ष लुनकरण चितलांगे, बद्रीप्रसाद जायस्वाल, मुकेश जायस्वाल, प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले, छाया नागपुरे, शारदा बडोले, माजी आमदार दिलीप बनसोड, डॉ. राज मुसने, कवी, लेखक, अभिनेते प्रशांत दामले, रमेश आल्हाट, डॉ. श्याम मोहरकर उपस्थित राहतील. दुपारी १२.३० वाजता प्रा. छाया बोरकर यांचा 'शापित शृंखला' काव्यसंग्रह व 'भारताची रणरागिणी' या कादंबरीचे तसेच उमा गजभिये यांच्या 'गर्भ रेशमी' काव्यसंग्रहाचे विमोचन होईल. या पुस्तकांवर प्रा. डॉ. अनंता सूर, प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले, डॉ. श्याम मोहरकर भाष्य करतील. दुसऱ्या सत्रात दुपारी १.३० वाजता पुरस्कार वितरण, दंडार व हास्य विनोद कार्यक्रम होईल.

### डिसेंबरमध्ये घाऊक महागाईचा दर वाढला

**नवी दिल्ली :** डिसेंबरमध्ये घाऊक महागाईचा दर वाढून २.३७ टक्के झाला. खाद्यपदार्थांच्या किमती कमी झाल्या असल्या, तरी उत्पादित वस्तूंच्या दरवाढीचा हा परिणाम असल्याचे केंद्र सरकारने मंगळवारी जाहीर केलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. घाऊक निर्देशांकावर आधारित महागाई नोव्हेंबर २०२४ मध्ये १.८९ टक्क्यांवर होती, तर डिसेंबर २०२३ मध्ये ०.८६ टक्क्यांवर होती. डिसेंबर २०२४ मध्ये खाद्यान्नातील महागाई कमी होऊन ८.४७ टक्क्यांवर आली. नोव्हेंबर महिन्यात ती ८.६३ टक्के होती. बटाट्यातील महागाई ९३,२० टक्के इतकी उच्च होती आणि कांद्यातील महागाई डिसेंबरमध्ये १६.८१ टक्के होती. डिसेंबरमध्ये अन्नधान्य, डाळी, गहू यासारख्या वस्तूंमध्ये महागाई कमी झाली. डिसेंबरमध्ये इंधन आणि वीज श्रेणीमध्ये ३.७९ टक्के घसरण झाली. जी नोव्हेंबरमध्ये ५.८३ टक्के होती. उत्पादित वस्तूंमध्ये महागाई २.१४ टक्के होती, जी नोव्हेंबरमध्ये २ टक्के होती.

### राज्यात पुढील तीन दिवस गारठा वाढणार

**पुणे :** पुढील तीन दिवस धुके आणि ढगाळ हवामान राहणार आहे. विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे तर थंड वाऱ्याचा जोर जास्त राहिल्यास उत्तर महाराष्ट्र, उत्तर विदर्भात किमान थंडी वाढण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवस किमान तापमानातील चढ-उतार कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. श्रीलंका आणि भारत दरम्यान असलेल्या कोमोरिन भागात चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. उत्तर भारतात १०० नॉट्स वेगाने पश्चिमेकडील जोरदार वाऱ्यांचे झोत वाहत आहेत. उत्तर भारतात पश्चिमेकडील जोरदार वाऱ्यांचे झोत वेगाने येत आहेत. त्यामुळे थंडी कमी-अधिक होत असून, दाट धुक्याचे साम्राज्य कायम आहे. सध्या राज्यातील तापमानाचा पारा १० अंशांच्याही पुढे गेला आहे. विशेषतः विदर्भात थंडीचा प्रभाव वाढलेला दिसत आहे.

### सीआयएसएफच्या दोन नवीन बटालियनना मान्यता

**नवी दिल्ली :** गृह मंत्रालयाने केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलासाठी दोन हजारांपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांच्या दोन नवीन बटालियनना मान्यता दिली. सीआयएसएफकडून विमानतळ आणि अणुऊर्जा प्रकल्पांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा दिली जाते. नवीन बटालियनच्या स्थापनेसह सीआयएसएफ दलातील कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे दोन लाखांपर्यंत पोहोचेल. या निर्णयामुळे सीआयएसएफच्या क्षमतेसह राष्ट्रीय सुरक्षा देखील अधिक मजबूत होणार आहे. सीआयएसएफचे महानिरीक्षक अजय दहिया म्हणाले, नवीन बटालियनना मान्यता मिळाल्याचा आनंद आहे. गृह मंत्रालयाच्या या निर्णयामुळे विद्यमान कर्मचाऱ्यांवरील ताण कमी होईल. कर्मचाऱ्यांना आठवड्याची सुटी तसेच रजा मिळण्यात अडचण होणार नाही. सीआयएसएफच्या प्रवक्त्याने सांगितले की, गृह मंत्रालयाने दोन नवीन बटालियन तयार करण्यास मंजुरी देऊन सीआयएसएफच्या महत्त्वपूर्ण विस्ताराला मान्यता दिली आहे. हा निर्णय आणि अलिकडेच मंजूर झालेल्या महिला बटालियनसह सीआयएसएफची क्षमता वाढणार आहे तसेच २००० हून अधिक व्यक्तींसाठी नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असे ते म्हणाले. सीआयएसएफमध्ये सध्या १२ राखीव बटालियन आहेत.

# 'मिशन मौसम'चे राष्ट्रार्पण

### भूकंपाचा इशारा देणारी यंत्रणा विकसित करा : पंतप्रधान

### हवामानशास्त्र विभागाचा १५० वा स्थापना दिन

**नवी दिल्ली, १४ जानेवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या १५० व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'मिशन मौसम' या अत्याधुनिक यंत्रणेचे राष्ट्रार्पण केले. भारताला हवामान सज्ज आणि हवामान स्मार्ट राष्ट्र म्हणून विकसित करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी वैज्ञानिकांना भूकंपाचा पूर्व इशारा देणारी यंत्रणा विकसित करण्याचे आवाहन केले.

राजधानी दिल्लीतील भारत मंडपम् येथे हा कार्यक्रम पार पडला. हवामान देखरेख आणि हवामान लवचीकता क्षमता मजबूत करण्याच्या देशाच्या प्रयत्नांमध्ये हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यावेळी मोदी यांनी एक विशिष्ट नाणे आणि टपाल तिकिटाचे विमोचन केले तसेच 'व्हिजन २०४७' डॉक्युमेंटचे प्रकाशन केले.

यावेळी मोदी म्हणाले, वीज कोसळण्याची सूचनादेखील लोकांना त्यांच्या मोबाईल फोनवर मिळणे आता शक्य झाले आहे. पूर्वी जेव्हा मासेमार समुद्रात जायचे तेव्हा त्यांचे कुटुंबीय नेहमीच चिंतेत असायचे. पण आता हवामान विभागाच्या मदतीने मासेमारांना वेळेवर हवामान अंदाजाचा इशारा मिळत आहे. कोणत्याही देशाच्या आपत्ती व्यवस्थापन क्षमतेसाठी हवामान विभाग सर्वात महत्त्वाचा आधार आहे. नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी आपल्याला हवामान विभागाची कार्यक्षमता वाढवण्याची गरज आहे. (वृत्तसंस्था)



हवामान खात्यातर्फे आयोजित प्रदर्शनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट दिली

#### दोन हजार कोटींची तरतूद

'मिशन मौसम'ला सप्टेंबर २०२४ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. या मिशनसाठी दोन वर्षांसाठी दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हा प्रकल्प प्रामुख्याने भारतीय हवामान विभाग, भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था आणि राष्ट्रीय मध्यम कालावधी हवामान पूर्वानुमान केंद्राद्वारे राबविण्यात येत आहे.

# रामलला प्राणप्रतिष्ठेनंतर देशात खऱ्या स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ


### आंदोलन कोणाच्या विरोधासाठी नाही : सरसंघचालक

**इंदूर, १४ जानेवारी**

रामललाच्या प्रतिष्ठापनेनंतरच देशात खऱ्या स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवली, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी व्यक्त केले.

अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेची तारीख 'प्रतिष्ठा द्वादशी' म्हणून साजरी केली जावी; कारण हे मंदिर अनेक शतकांपासून शत्रूच्या हल्ल्याचा सामना करीत होते आणि भारताच्या खऱ्या स्वातंत्र्याची स्थापना या दिवशी झाली. राममंदिर आंदोलन कोणाचाही विरोध करण्यासाठी सुरू झाले नसल्याचेही त्यांनी म्हटले.

इंदूर येथील एका कार्यक्रमात श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांना 'राष्ट्रीय देवी अहल्या पुरस्कार' प्रदान केल्यानंतर सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत बोलत होते. ते म्हणाले, राम मंदिराची प्राणप्रतिष्ठेचा पौष शुक्ल द्वादशी हा दिवस 'प्रतिष्ठा द्वादशी' म्हणून साजरा केला पाहिजे. शतकानुशतके बाह्य आक्रमणे सहन करणाऱ्या भारताच्या खऱ्या स्वातंत्र्याची स्थापना याच दिवशी झाली. देश स्वतःच्या पायावर उभा राहावा आणि जगाला मार्ग दाखवता यावा, यासाठी भारताने स्वतःला जागृत करण्यासाठी राम मंदिर आंदोलन सुरू केले होते. गेल्या वर्षी अयोध्येत राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेवेळी देशात कोणताही वाद झाला नाही, अशी आठवणही सरसंघचालकांनी करून दिली.



पुरस्कार स्वीकारल्यानंतर राय यांनी हा पुरस्कार राम मंदिर आंदोलनात सहभागी असलेल्या लोकांना समर्पित केला. हा पुरस्कार मी राम मंदिर आंदोलनात सहभागी असलेल्या ज्ञात-अज्ञात लोकांना समर्पित करतो, ज्यांनी अयोध्येत हे मंदिर बांधण्यात मदत केली. अयोध्येत बांधलेले हे मंदिर हिंदुस्थानच्या अभिमानाचे प्रतीक आहे आणि तेच या मंदिराच्या उभारणीचे कारण आहे, असे चंपत राय यांनी म्हटले.

देवी अहल्या राष्ट्रीय पुरस्कार हा एक प्रतिष्ठित पुरस्कार आहे, जो श्री अहल्योत्सव समिती या इंदूर येथील सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षी सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. लोकसभेच्या माजी सभापती सुमित्रा महाजन या संघटनेच्या अध्यक्ष आहेत. हा पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांमध्ये नानाजी देशमुख, विजयाराजे शिंदे, रघुनाथ अनंत माशेलकर आणि सुधा मूर्ती या दिग्गजांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# वाल्मीक कराडवर मोक्का

**केज, १४ जानेवारी**

बीड जिल्ह्यातील सरपंचाच्या हत्येशी संबंधित दोन कोटी रुपयांच्या खंडणी प्रकरणात अटक केलेल्या वाल्मीक कराडवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, येथील न्यायालयाने त्याला १४ दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडने ३१ डिसेंबर रोजी पुणे येथे पोलिसांसमोर शरणागती पत्करली होती. त्यावेळी त्याला १४ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. मंगळवारी त्याला बीड येथे आणण्यात आले आणि जिल्ह्यातील केज न्यायालयात हजर करण्यात आले. कराडवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली, असे अधिकाऱ्याने सांगितले.

सोमवारी बीडमध्ये मस्साजोग गावात हत्या झालेल्या सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी निदर्शने केली आणि कराडवर मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. आत्मसमर्पण करण्यापूर्वी कराडने समाज माध्यमावर एक व्हिडीओ पोस्ट केला, यात त्याने दावा केला की, राजकीय सूडबुद्धीने त्याला हत्येत गोवले जात आहे. (वृत्तसंस्था)

# प्रवीण स्वामी यांची आमदारकी धोक्यात?

### ज्ञानराज चौगुलेंकडून जात वैधता प्रमाणपत्रावर याचिका दाखल

**तभा वृत्तसेवा । आकाश पोतदार**
**उमरगा, दि. १४ जानेवारी-**

उमरगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या जातीचे प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र रद्द करण्याची विनंती करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आली आहे.

या याचिकेवर फेब्रुवारीमध्ये सुनावणी होणार आहे.विधानसभा निवडणूकीतील पराभूत उमेदवार माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी या याचिकेसह प्रवीण स्वामी यांच्याविरुद्ध इलेक्शन पिटीशन दाखल केली आहे. कास्ट स्पुटीने समिती यांच्याकडे प्रथमता तक्रार दाखल केली होती. परंतु त्यांना सुनावणी घेण्याचा अधिकार नसल्यामुळे त्यांनी तक्रार फेटाळली. त्यामुळे त्या ऑर्डरला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. तसेच इलेक्शन पिटीशन दाखल केलेले असून त्याचा क्र.१६/२०२५ आहे. निवडणुक निर्णय तांत्रिक मुद्द्याच्या आधारावर सदर याचिका दाखल करण्यात आली आहे. ॲड. एस. एस. गंगाखेडकर यांनी यांच्यामार्फत याचिका दाखल केली आहे.





सोलापूर : होमप्रदीपनासाठी काढण्यात आलेल्या नंदीध्वज मिरवणुकीत सहभागी झालेले भाविक

# राज्यात शाळांसाठी सीबीएसई पॅटर्न

### मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय

**मुंबई, १४ जानेवारी**

राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. याचा एक भाग म्हणून राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न स्वीकारण्यावर सहमती झाली आहे, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेतला जात आहे. त्यानुसार शालेय शिक्षणात महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार, असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण पाऊले उचलावी, असा निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिला.

दादा भुसे यांनी मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करणे, शाळांना गुणवत्तेनुसार रँकिंग देणे, एका केंद्रात किमान एका शाळेत दहावीपर्यंत शिक्षण व्यवस्था निर्माण करून त्या शाळा आदर्श तसेच त्यातील एक स्मार्ट वर्ग करणार असल्याचे त्यांनी म्हटले. (वृत्तसंस्था)

### व्ही. नारायणन् यांनी स्वीकारली इस्रोची सूत्रे

**बंगळुरू, १४ जानेवारी**

डॉ. व्ही. नारायणन् यांनी इस्रोचे नवे अध्यक्ष आणि अंतराळ आयोगाचे सचिव म्हणून म्हणून पदभार स्वीकारला. डॉ. एस. सोमनाथ इस्रोच्या अध्यक्षपदावरून पायउतार झाले. त्यांच्याकडून डॉ. नारायणन् यांनी इस्रोचा कार्यभार हाती घेतला.



रॉकेट आणि स्पेसक्राफ्ट प्रोपल्शन तज्ज्ञ अशी डॉ. नारायणन् यांची ओळख आहे. जानेवारी २०१८ मध्ये लिक्विड प्रोपल्शन सिस्टिम्स सेंटरचे संचालक होण्यापूर्वी त्यांनी विविध पदांवर महत्त्वाची भूमिका बजावली.

नारायणन यांनी चांद्रयान-२ मोहिमेत योगदान दिले आहे. एलव्हीएम३-एम१/चांद्रयान-२ आणि एलव्हीएम३/चांद्रयान-३ मोहिमेदरम्यान त्यांनी टीमचे नेतृत्व केले. (वृत्तसंस्था)



### दोन कोटी भाविकांनी केले पहिले शाही स्नान

महाकुंभातील पहिल्या शाही स्नानाला तब्बल दोन कोटी भाविकांची हजेरी होती. कुंभमेळ्याच्या पहिल्या दिवशी दीड कोटी भाविकांनी संगमात डुबकी मारली होती. दोन दिवसात सुमारे साडेतीन कोटी भाविकांनी महाकुंभात स्नान केले आहे. मागील काही वर्षातील हा भाविकांच्या आकडेवारीचा उच्चांक असल्याचे मानले जात आहे.

# परळीमध्ये तुफान राडा

- अत्यावश्यक सेवा वगळता पूर्ण बाजारपेठ बंद
- रस्त्यावर कराड समर्थकांची गर्दी, पेटवून घेण्याचा प्रयत्न

**परळी, दि.१४ जानेवारी:**

संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी प्रकरणात अटक असलेला आरोपी याच्यावर मकाको लावला असून त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. ही माहिती समजताच वाल्मीक कराड समर्थकांनी परळी शहर बंदची हाक दिली आहे. कराड समर्थकांनी रस्त्यावर उतरुन दुकाने बंद करण्याचे आवाहन केले. त्यानंतर व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद केली. अत्यावश्यक सेवा वगळता परळीतील संपूर्ण बाजारपेठ बंद झाली असून रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत आहे.



खंडणी प्रकरणात अटकेत असलेल्या वाल्मीक कराडची १५ दिवसांची पोलिस कोठडी संपल्यानंतर आज न्यायालयात हजर करण्यात आले होते. या प्रकरणावर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. तसेच, वाल्मीक कराडवर मकोका कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही सीआयडीकडून सांगण्यात आले आहे. ही बातमी समजताच वाल्मीक कराड समर्थक आक्रमक झाले असून परळी बंदची हाक देण्यात आली. वाल्मिक कराडवर कारवाई करण्यात आल्यानंतर वातावरण चांगलेच तापले आहे. परळीमधील सर्व दुकाने बंद करण्यात आली असून सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे. वाल्मीक कराड समर्थक रस्त्यावर दिसत आहेत. आज सकाळी वाल्मीक कराडच्या समर्थकांनी परळीतील राणी लक्ष्मीबाई टॉवरजवळ जोरदार निदर्शने केली. यादरम्यान टायर जाळण्याचा प्रयत्न झाला, पण पोलिसांनी हा प्रकार रोखला.

# विश्वासघातकी राजकारणामुळे मतदारांकडून पवार हद्दपार : शेलार

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१४ जानेवारी:**

विश्वासघाताच्या राजकारणाचे जनक शरद पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका करताना आपला तोल गमावला आहे. विश्वासघाताचे आणि खंजीर खुपसण्याचं राजकारण केल्यामुळेच महाराष्ट्राच्या मतदारांनी त्यांना हद्दपार केले, अशी टीका मुंबई भाजपाचे अध्यक्ष आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केली.



ते म्हणाले,'ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी 'पुलोद'च्या निर्मितीबाबत बोलताना आपण जनसंघाच्या बळावर मुख्यमंत्री झालो हे मान्य केले .मात्र हे सरकार बनवण्याआधी विश्वासघाताचे आणि खंजीर खुपसण्याचं कोणते विचारमंथन तुम्ही केले व कोणाच्या विरोधात केले? हे सत्य ही महाराष्ट्राच्या जनतेपुढे येऊ द्या.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना न्यायालयीन प्रक्रीयेद्वारे निर्दोषत्व मिळाले आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष करून शाह यांच्यावर टीका करणार असाल तर 'लवासा' पासून अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयाने कोणाकडे बोट दाखवले आहे ?हे बोलण्याची वेळ येऊ देऊ नका .सत्तेच्या लोभासाठी एकत्र आलेली ही महाविकास आघाडीची एक्सपायरी डेट संपल्याने केव्हाही फुटण्याची शक्यता आहे असेही त्यांनी नमूद केले.

# सोलापूरचे माजी महापौर महेश कोठे यांचे निधन


### प्रयागराज येथे आला हृदयविकाराचा झटका!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी–**

प्रयागराज येथे सुरू झालेल्या महाकुंभमेळ्यात गेलेले सोलापूरचे माजी महापौर महेश विष्णुपंत कोठे (वय ६०) यांचा कडाक्याच्या थंडीत गंगास्नान करताना हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला. मंगळवारी सकाळी ही घटना घडली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे स्थानिक नेते असलेले महेश कोठे हे महाकुंभमेळ्यासाठी आपल्या काही मित्रांसह प्रयागराजला गेले होते. तेथे सकाळी कडाक्याच्या थंडीत गंगा नदीमध्ये स्नान आटोपत असताना त्यांना अचानकपणे हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक पुत्र आणि दोन कन्या, सून, जावई असा परिवार आहे. माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांचे ते वडिल होत. तर भाजपचे आमदार देवेंद्र कोठे हे त्यांचे पुतणे आहेत. आज स. ११ वाजता कोठे यांच्यावर पुणे नाका स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

सविस्तर वृत्त पान ८ वर



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### बंकलगी व होनमुर्गीच्या जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना दिले संगणक साक्षरतेचे धडे

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

भारतीय विद्यापीठ अभिजीत कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशल सायन्समधील एमसीए व बीसीएच्या विद्यार्थ्यांनी बंकलगी या गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले. सालाबादप्रमाणे यावर्षी देखील माजी मंत्री पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त समाज प्रबोधन सप्ताह अंतर्गत आयटी संपर्क अभियानाद्वारे हे अभियान राबविण्यात आले. भारती विद्यापीठ अभिजीत कदम मॅनेजमेंट सोशल सायन्स जे एमसीए व बीसीएच्या विद्यार्थ्यांनी बंकलगी व होनमुर्गी या गावातील तिसरी ते सातवी या वर्गातील विद्यार्थ्यांना संगणकाची माहिती संगणकाचा वापर व इंटरनेटचा वापर कसा करावा याबाबत एलसीडी स्क्रीनवर प्रशिक्षण दिले. या अभियाना अंतर्गत भारतीय विद्यापीठातील समन्वयक प्रा. डॉ. ए. बी. नदाफ व सहसमन्वयक प्रा.डी.डी. म्हेत्रे म्हणून यांनी काम पाहिले. हा उपक्रम राबवण्यात करिता बंकलगी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक देशमुख व होनमुर्गी जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक खडतरे यांनी प्रथम सर्व शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. प्रशिक्षणाच्या शेवटी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून योग्य उत्तर दिलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देखील देण्यात आले. एमसीएचे विद्यार्थी शहाना मणियार, अक्षय बिराजदार, नाझिया नदाफ, शोएब शेख, श्रुती शिंदे, सुप्रिया शेटे, सुप्रिया डफलापुरे, आदित्य दळवी आणि बीसीए भाग तीनचे प्रांजली पाटील, मानसी पाटील, निहाल तांबोळी व आशुतोष पाटील यांनी प्रशिक्षण दिले. प्रा. डी.डी.म्हेत्रे यांनी आभार मानले.



### महानगरपालिकेच्या वतीने चार हुतात्म्यांना अभिवादन

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने हुतात्मा स्मृतिदिनानिमित्त चार हुतात्मा चौक येथील हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी,हुतात्मा श्री किसन सारडा,हुतात्मा जगन्नाथ शिंदे, हुतात्मा अ.कुर्बान हुसेन यांच्या पुतळ्यास तसेच कौन्सिल हॉल येथील कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मातोश्री सेवा कुंज जोडभावी पेठ येथील हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी त्यांच्या समाधीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी सहायक आयुक्त गिरीष पंडित,विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर,शिवकुमार धनशेट्टी, शुभम धनशेट्टी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, प्रकाश सावंत, सिद्धू तिमीगार, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, नझिमा शेख, सारंग अंजीखाने, शकील शेख, गुरुप्रसाद तलवार, झाकीर सय्यद, भालचंद्र साखरे, नईम मुचाले, केरबा माने, आदी उपस्थित होते.



### महापालिकेतर्फे जिजाऊ माँ साहेब, स्वामी विवेकानंद यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनानिमित्त कौन्सिल हॉल येथील कार्यालयात जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सहायक आयुक्त गिरीष पंडित,विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर,कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे,.प्रकाश सावंत, सिद्धू तिमीगार, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

# रेल्वेच्या नो एन्ट्री गेटला टेम्पोची धडक

## १५ महिला जखमी; मरिआई चौकातील प्रकार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

देगावजवळील लाड वस्ती, दस्तगीर वस्ती येथे पाणी येत नसल्याने महानगरपालिकेला जाब विचारण्यासाठी जात असताना मरिआई चौकातील रेल्वेच्या नो एंट्री गेटला धडक बसून झालेल्या अपघातामध्ये १५ महिला जखमी झाल्या. अपघात सोमवारी सायंकाळी पाच वाजता घडला.

रेश्मा नागनाथ माने (वय ४७), भागवत बाबूराव माने (वय ५०), चांदबी अल्लाउद्दीन नदाफ (वय ५५), चोका गोपाळ गायकवाड (वय ६०), प्रभावती भिमा दरीगोळे (वय ५८), उषा गजेंद्र अंकुश (वय ४०), भाग्यश्री योगीनाथ माशाळ (वय २८), अंजना धर्मा माशाळकर (वय ४०), राधिका शरणप्पा चेंडके (वय ३५), राजश्री कृष्णात सोनटक्के (वय ३३), मंजू अर्जुन माने (वय ३८), आशा विजय गायकवाड (वय ३०), निर्मला बबलू कदम (वय ३५), रेणुका शशिकांत राजगुरू (वय २६), आयेशा नबीलाल नदाफ (वय ३५, सर्व रा. बाळे स्टेशन, लाड वस्ती, देगाव, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत.

बाळे रेल्वे स्टेशन परिसरातील लाड वस्ती, दस्तगीर वस्ती या भागात अनेक नागरी समस्या आहे. रस्ते, ड्रेनेज नसल्याने नागरिक त्रस्त आहेत. अशा परिस्थितीमध्ये नळाला येणारे पाणीही बंद झाले. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या महिला खाजगी टेम्पो करून महानगरपालिकेसमोर आंदोलन करण्यासाठी जात होत्या. मात्र, टेम्पो मरिआई चौकात आल्यानंतर चालकाला अंदाज आला नाही. त्याने रेल्वेने लावलेल्या नो एन्ट्रीच्या लोखंडी कमानीखालून टेम्पो नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, वरची कमान जोरात धडकल्याने. टेम्पोत उभ्या असलेल्या व बसलेल्या महिला आतल्या आत पडून जखमी झाल्या. हा अपघात झाल्यानंतर महिलांचा आवाज ऐकून आजूबाजूचे लोक जमा झाले. वरील सर्व जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## मेहता शाळेत सिध्देश्वर पालखी मिरवणूक सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

कै.वि.मो. मेहता प्राथमिक शाळेत शुक्रवार दिनांक १०/१/२०२५ रोजी सोलापूरचे ग्रामदैवत सिध्दरामेश्वर यात्रेनिमित्त पालखी पूजन व नंदीध्वजाच्या प्रतिकात्मक मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी केंद्र प्रमुख कृष्ण सुतार, मुख्याध्यापिका रजनी कुलकर्णी मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते पालखी पूजन व नंदीध्वज पूजन करण्यात आले नंतर मानकरी पूजन करण्यात आले. सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख अतिथींचा परिचय मधुरा छत्रे यांनी करुन दिला. शिक्षकांतर्फे सुजाता यादव यांनी सिध्दरामेश्वर यात्रा सोहळ्याची माहिती सांगितली. यावेळी विद्यार्थी बाराबंदीच्या वेशभूषेत विद्यार्थी, विद्यार्थींनी मिरवणुकीत सहभागी झाले होत्या. सूत्रसंचालन शीतल जालीमिंचे तर आभार योगेश सरवदे यांनी मानले.

## लघुशंका करण्याच्या कारणावरून मड्डी वस्तीत मारामारी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

लघुशंका करण्याच्या कारणावरून भवानी पेठेतील मड्डी वस्तीत मारामारी करणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले.

याबाबत अदिल अब्दुल वाहिद अन्सारी (वय २१, रा. भवानी पेठ, मड्डी वस्ती, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन ओमकार गणेश शिंदे, अनिकेत मलिक सुरते (रा. मड्डी वस्ती, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर ओमकार गणेश शिंदे याच्या फिर्यादीवरुन अदिल अब्दुल वाहिद अन्सारी याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१३ जानेवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास मड्डी वस्तीमधील पमु कॅन्टीनसमोर असणाऱ्या पत्रा शेडजवळ अदिल अन्सारी हा लघुशंकेसाठी थांबला होता. त्यावेळी ओमकार शिंदे व अनिकेत सुरते या दोघांनी ही काय लघुशंका करायची जागा आहे का असे म्हणाले. त्यावेळी समजावून सांगत असताना शिंदे व सुरते या दोघांनी अन्सारी यास मारहाण केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार रूपनर पुढील तपास करीत आहेत.

तर ओमकार शिंदे याच्या फिर्यादीनुसार १३ जानेवारी रोजी रात्री दहाच्या सुमार पमु कॅन्टीन येथे पत्रा शेडजवळ अदिल अन्सारी हा लघुशंका करण्यासाठी थांबला होता. त्यावेळी शिंदे याने थोड्या वेळापूर्वी गाडीचा कट का मारला असे विचारले असता अन्सारी याने शिवीगाळ करून शिंदे यास मारहाण केली. यावेळी भांडण सोडविण्यासाठी सुरते हा आला असता त्यासदेखील मारहाण करून जखमी करण्यात आले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार रुपनर पुढील तपास करीत आहेत.



## देसाई ब्रदर्स कारखानदाराविरुद्ध सिटूची तक्रार

### विडी कामगारांना मिळणाऱ्या ग्रॅच्युटीपासून रोखत असेल तर आंदोलन करू : कॉ. शेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १४ जानेवारी-**

सोलापूर शहरातील विडी उद्योगात हजारोंच्या संख्येने विडी वळण्याचे काम प्रामुख्याने महिला कामगार करतात. या महिलांना कामगार कायद्याचे लाभ आणि कामगार कायद्याच्या तरतुदीपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवण्याचे काम स्थानिक विडी कारखानदार करत आहेत. कामगारांना आठवड्यातून फक्त तीन ते चार दिवस काम दिले जाते व त्यांत २ ते अडीच हजार किंवा त्यापेक्षा जास्त काम दिले जात आहे. आणि एक-दोन दिवसांनी एकदा बोलावले जाते. त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा बोजा पडत असून मजुरीच्या आशेने कामगार तक्रार करण्यात नसले तरी त्यामुळे त्यांच्या ग्रच्युटी व पेन्शनवर परिणाम होणार आहे. याची रीतसर तक्रार सिटू संलग्न लाल बावटा विडी कामगार युनियनच्यावतीने सहा. कामगार आयुक्त सोलापूर यांच्याकडे केलेली आहे. यावर हस्तक्षेप करून घडत असलेल्या अनुचित प्रकारावर आळा न घातल्यास लवकरच तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सिटूचे नेते माजी नगरसेविका कॉ. नसीमा शेख यांनी दिला.

सिटू संलग्न लाल बावटा विडी कामगार युनियन, सोलापूरच्या वतीने सहा. कामगार आयुक्त, सोलापूर यांना सिटूचे नेते कॉ. युसुफ शेख यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाद्वारे विडी कामगारांच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी शिष्टमंडळात नसीमा शेख, युसुफ मेजर शेख, ॲड. अनिल वासम, शेवंताताई देशमुख, शकुंतला पाणीभाते, राजेंद्र गेंटयाल, बालाजी तुम्मा आदींसह महिला कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी विडी कामगारांना कारखान्यात दिला जाणारा अत्यंत निकृष्ट दर्जाचा तेंदूपत्ता महिला विडी कामगार यांनी सहाय्यक कामगार आयुक्त यांना दाखविले. प्रथमदर्शनी त्यांनी त्या तेंदूपत्त्याची पाहणी करून कामगारांच्या या तक्रारीबाबत संघटना, कारखानदार आणि सहाय्यक कामगार आयुक्त यांची संयुक्त बोलावून सदर प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले.

## रिक्षाचालकावरील चाकू हल्ल्याप्रकरणी शिक्षकाची मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

फर्यादी रिक्षा चालक चाँद मोहम्मद शेख (वय ४८ वर्षे, रा. मौलाली चौक, सोलापूर) याचेवर चाकूहल्ला करून त्यास जखमी केल्याप्रकरणी आरोपी शिक्षक अरुणकुमार लक्ष्मण हुच्चे (वय ४५ वर्षे, रा. राघवेंद्र नगर, सैफुल, सोलापूर) याची मुख्य न्यायदंडाधिकारी विक्रमसिंह भंडारी यांनी निर्दोष मुक्तता केली.

८ जुलै २०१२ रोजी सकाळी ७.४५ वाजण्याच्या सुमारास विजापूर नाका ते सातरस्ता जाणाऱ्या रस्त्यावरील कंबर तलावाजवळील सय्यद बुखारी दर्गासमोर फिर्यादी चाँद शेख हा त्याची रिक्षा बंद पडल्यामुळे थांबला होता. त्यावेळी तेथे आरोपी शिक्षक अरुणकुमार हुच्चे हे त्याच्या साथीदारांसह आले. पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून अरुणकुमार हुच्चे यांनी शिवीगाळ करीत चाँद शेख याच्या गळ्यावर व पोटावर त्यांच्याजवळील चाकूने वार करून त्यास जखमी केले. चाँद शेख याने सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचार घेतले वगैरे आशयाची फिर्याद शेख याने सदर बझार पोलीस ठाण्यात दिली होती. त्यावरून हुच्चे यांच्यावर गुन्हा दाखल होऊन त्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कोळेकर यांनी केला. फिर्यादीने आरोपीविरुध्द खोटी केस केली असून फिर्यादीच्या जबाबास वैद्यकीय प्रमाणपत्र आणि परिस्थितीजन्य पुरावा साथ देत नसल्यामुळे गुन्हा शाबीत होत नसल्याचा युक्तिवाद आरोपीचे यांनी केला. तो युक्तिवाद ग्राह्यमानून न्यायाधीशांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.



## शाळांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे महत्त्वाचे : आ. तासगावकर

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

आजच्या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर शाळांची गुणवत्ता वाढली पाहिजे, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली पाहिजे तरच आजचे विद्यार्थी स्पर्धेच्या युगात टिकतील आणि नवीन भारल घडवणारे खंबीर विद्यार्थी तयार होतील, असे विचार पुणे विभागाचे शिक्षक आमदार प्राध्यापक जयंत आसगावकर यांनी मांडले. सद्संकल्प शिक्षण समूहातील राष्ट्रसंत प्राथमिक शाळा आणि विश्वभूषण विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानावरुन बोलताना समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर म्हणाले, सर्वच घटकातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे नवसमाज आणि नवीन भारत घडविणारे आणि पेलणारे विद्यार्थी तयार व्हावेत हा संस्थेचा मूळ हेतू आहे. यावेळी संस्थेच्या वतीने आमदार जयंत आसगावकर यांचा अण्णासाहेब भालशंकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस आ. आसगावकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रास्ताविक मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे, सूत्रसंचालन रामचंद्र व्हनकडे यांनी केले तर मिलिंद भालशंकर यांनी आभार मानले.



## बंद पडलेले दक्षिण सुविधा केंद्र सुरु; लेबर पार्टीच्या मागणीला यश

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

बांधकाम कामगारांसाठी शहरामध्ये दक्षिण व उत्तर सोलापूर तालुक्याचे सुविधा केंद्र सुरु केले होते. दि. ३ जानेवारीपासून हे दोन्ही सुविधा केंद्र काही राजकीय नेत्यांच्या वादविवादामुळे बंद झाले. यामुळे सुविधा केंद्रावर येणाऱ्या कामगारांना आर्थिक व मानसिक त्रास सोसावे लागत होते. या संदर्भात लेबर पार्टीचे शहराध्यक्ष कॉम्रेड एजाज शेख यांनी सोलापूरचे सहाय्यक कामगार आयुक्त सुधीर गायकवाड यांना दि. ७ जानेवारीला समक्ष भेटून बंद पडलेले दक्षिण व उत्तर सोलापूर सुविधा केंद्र तात्काळ सहाय्यक कामगार आयुक्तालय दमाणी नगर सोलापूर याठिकाणी चालू करुन कामगारांना होणारा त्रास थांबवण्याची मागणी केली. गायकवाड यांनी लेबर पार्टीच्या तक्रारीची दखल घेत दिनांक ९ जानेवारीपासून सुविधा केंद्र हे सहाय्यक कामगार आयुक्तालय याठिकाणी चालू केले. सुविधा केंद्रावर जाऊन कामगारांनी अर्ज करुन आर्थिक लाभ घेण्याचे आवाहन कॉ. एजाज शेख यांनी केले आहे. यावेळी लेबर पार्टीचे कॉम्रेड एजाज शेख, चंद्रशेखर बदलापूरे, रफिक हणगी, आण्णासाहेब वाघचवरे, रियाज शेख, शरणू गुडीयवरु, शमशोद्दीन शेख, कॉ. जहीर शेख उपस्थित होते.

## १२ ते २६ जानेवारीपर्यंत जिल्ह्यात मनाई आदेश

**सोलापूर, दि. १४ जानेवारी -**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून १२ ते २६ जानेवारी २०२५ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे. हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

# बुध्दीबळ स्पर्धेत ॲड. अंकुशराव, करवा प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

सोलापूर बार असोसिएशनच्यावतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वकिलांच्या बुध्दीबळ स्पर्धेत पुरुषांच्या गटात ॲड. किरण अंकुशराव यांनी तर महिलांच्या गटात ॲड. शिवानी करवा यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ - २५ च्या निमित्त प्रथमच सोलापूर बार असोसिएशनच्यावतीने जिल्हास्तरीय वकिलांची बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. पी. एम. पाटील आणि जिल्हा न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी बुद्धिबळ पटावरील चाल खेळून केले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश उमेश देवर्षी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी विनायक रेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेत पुरुष गटात ५२ विकीलांनी, महिला गटात ८ आणि त्यांच्या (पाल्याच्या) मुलांच्या गटात १० असे एकूण ७० स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. बुद्धिबळ हा खेळ बुद्धिजीवी असल्याने वकिलांना आणि न्यायाधीशांना याचा खूप फायदा होतो, बुद्धिबळामुळे एकग्रता, संयम यात वाढ होते, याचा फायदा एखाद्या केस मध्ये होतो असे नमूद करत सर्वांनी दररोज बुद्धिबळाचा एखादा डाव खेळावा असे आवाहन उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. पी. एम. पाटील यांनी केले. स्पर्धेसाठी पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे, राज्य पंच विजय पंगुडवाले यांनी काम पाहिले.



### बुद्धिबळ स्पर्धेचे निकाल

पुरुष गट प्रथम ॲड. किरण अंकुशराव, द्वितीय ॲड. फिरोज शेख, तृतीय ॲड. प्रथमेश शिंदे, उत्तेजनार्थ न्यायाधीश श्रीमंत विनायक रेडकर आणि ॲड. प्रकाश अभंगे. महिला गट प्रथम ॲड. शिवानी करवा, द्वितीय ॲड. पूजा खांडेकर, तृतीय ॲड. वनिता कडदास, उत्तेजनार्थ ॲड. सुनयना थोरात आणि लीना गजेंद्र खरात. मुलांचा गट - प्रथम - कारुण्य विवेक शाक्य, द्वितीय यश मनोज पामुल आणि तृतीय जयवीर जयदीप मोहिते. यावेळी सोलापूर बार असो अध्यक्ष ॲड. अमित व्हि. आळंगे, उपाध्यक्ष ॲड. व्ही. पी. शिंदे, सचिव ॲड. मनोज नागेश पामूल, सहसचिवा ॲड. निदा अनिस सैफन, खजिनदार ॲड. विनयकुमार सि. कटारे सह सोलापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. व्ही. एस. आळंगे, ॲड. प्रकाश कुलकर्णी, ॲड. अभिजीत देवधर व इतर बहुसंख्य विधिज्ञ उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## मणिपुरात ५० एकरवरील अफूची लागवड केली नष्ट

◆ **इम्फाळ, १४ जानेवारी**

उखरूल जिल्ह्यातील एका गावात ५० एकरात करण्यात आलेली अफूची लागवड नष्ट करण्यात आली, अशी माहिती मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेनसिंह यांनी दिली.

मुल्लम कुकी गावातील अफूच्या शेतात आढळलेल्या चार झोपड्याही जाळून टाकण्यात आल्या आणि बेकायदेशीर लागवडीतील दोषींची ओळख पटवण्यासाठी तपास सुरू केला आहे, असे त्यांनी सांगितले. उखरूल जिल्हा पोलिस, सहावी मणिपूर रायफल्स, लष्कर आणि वन विभागाच्या कर्मचाऱ्यांचा समावेश असलेल्या आमच्या समर्पित दलांनी लिटन पोलिस ठाणे हद्दीतील मुल्लम कुकी गावातील डोंगररांगेत असलेली बेकायदेशीर अफूची लागवड नष्ट करण्यासाठी यशस्वीरीत्या मोहीम राबवली. यात एकूण ५० एकर अफूची लागवड नष्ट करण्यात आली आणि या शेतीतील चार झोपड्या जाळण्यात आल्या, असे सिंह यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# संसदीय समिती ‘मेटा’ला बजावणार समन्स

### झुकरबर्गच्या टिप्पणीमुळे अडचणीत

◆ **नवी दिल्ली, १४ जानेवारी**

भारतातील लोकशाही निवडणुकीवर भाष्य केल्याने फेसबुकचे संस्थापक आणि मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकरबर्ग यांच्यासमोरील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. अलिकडेच त्यांनी एका पॉडकास्टमध्ये भारतीय निवडणुकीबाबत केलेल्या टिप्पणीवर टीका होत आहे. या प्रकरणी संसदीय समिती मेटा कंपनीला समन्स बजावणार आहे.

संसदीय समिती फेसबुकची मूळ कंपनी मेटाला समन्स बजावणार असल्याचे माहिती-तंत्रज्ञान व दूरसंचार प्रकरणांवरील संसदीय समितीचे अध्यक्ष निशिकांत दुबे यांनी ‘एक्स’वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. चुकीच्या माहितीसाठी माझी समिती मेटाला समन्स बजावणार आहे. कोणत्याही लोकशाही देशात चुकीची माहिती देशाची प्रतिमा मलीन करते. या चुकीबद्दल त्या संघटनेला भारतीय संसदेची आणि येथील लोकांची माफी मागावी लागेल.

ज्यो रोगनच्या पॉडकास्टमध्ये मार्क झुकरबर्ग म्हणाले होते की, सरकारांचा हा पराभव दर्शवितो की, कोरोना महामारीनंतर लोकांचा विश्वास कमी झाला आहे. वाढती महागाई, साथीच्या आजाराशी संबंधित आर्थिक धोरणे आणि सरकारांनी कोरोना महामारीला कसे हाताळले, यामुळे लोकांचा विश्वास कमी झाला आहे, असेही ते म्हणाले होते.

आयटी आणि दळणवळण मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही ‘एक्स’वर पोस्ट करताना मेटाला टॅग केले. त्यांनी लिहिले की, या प्रकरणात मी आधीच मार्क झुकरबर्ग यांना उत्तर दिले होते. जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही असलेल्या भारतात २०२४ मध्ये निवडणुका झाल्या, ज्यात ६४ कोटी लोकांनी भाग घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या रालोआ सरकारवर भारतातील जनतेने विश्वास दाखवला. कोरोनानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये भारतासह जगातील बहुतेक सत्ताधारी सरकारे पराभूत झाली आहेत, हा मार्क झुकेरबर्ग यांचा दावा चुकीचा आहे. निशिकांत दुबे यांनी या प्रकरणात मेटाला समन्स बजावण्याची शिफारस केली आहे. ◂(वृत्तसंस्था)



नवी दिल्ली : खो-खो विश्वचषक स्पर्धेतील सामन्यात भारताचा कर्णधार प्रतिक वायकर याने ब्राझीलच्या संरक्षकाला सूर मारुन बाद करताना टीपलेले छायाचित्र.

# बंगालमधील गंगासागरात लाखो भाविकांची डुबकी

◆ **कोलकाता, १४ जानेवारी**

मकर संक्रांतीच्या पर्वावर मंगळवारी पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील हुगळी नदी आणि बंगाल उपसागराच्या संगमावरील पवित्र गंगासागर येथे लाखो भाविकांनी स्नान केले.

थंड हवामानाचा सामना करीत लाखो भाविकांनी कपिल मुनी आश्रमात पवित्र स्नान आणि प्रार्थना केली. शाही स्नान ६.५८ वाजता सुरू झाले. पश्चिम बंगाल सरकारने कोलकात्यापासून सुमारे १०० किमी अंतरावर असलेल्या सागर बेटावर उत्सव सुरू झाल्याची घोषणा करणाऱ्या वार्षिक विधिसाठी विस्तृत रसद आणि सुरक्षा व्यवस्था केली होती. दरम्यान, सागर द्वीपावर रविवारी सकाळी उत्तरप्रदेशातील एका वृद्धाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.



या वर्षीचा गंगासागर मेळा उत्तरप्रदेशात होणाऱ्या महाकुंभासोबतच आला आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कुंभाप्रमाणेच या काळात सागर द्वीपावर होणाऱ्या गंगासागर मेळ्याला राष्ट्रीय दर्जा देण्याची मागणी केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# इंडोनेशिया घेणार भारताकडून ‘ब्रह्मास्त्र’

### जगातील सर्वांत मोठा व्यवहार

◆ **नवी दिल्ली, १४ जानेवारी**

भारताने जगातील सर्वांत मोठा शस्त्रास्त्र व्यवहार केला आहे. ३८,७८,७९,५४,०३० एवढ्या किमतीचा हा व्यवहार आहे. या बदल्यात भारत जगातील सर्वांत मोठ्या मुस्लिम देशाला आपले ‘ब्रह्मास्त्र’ अर्थात् ब्रह्मोस हे सर्वाधिक घातक क्षेपणास्त्र देणार आहे. भारताच्या मदतीने इंडोनेशिया हा मुस्लिम देश आपले शक्तिप्रदर्शन करणार आहे.

भारताने विकसित केलेल्या क्षेपणास्त्रांची जगभरात चर्चा आहे. ‘ब्रह्मास्त्र’ हे भारताकडे असलेले सर्वांत शक्तिशाली आणि घातक क्षेपणास्त्र आहे. इंडोनेशियाने भारताककडून ते विकत घेतले. प्रजासत्ताक दिनानिमित्त इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो भारत दैऱ्यावर येणार आहेत. या दरम्यान ते भारताचे सर्वांत धोकादायक शस्त्र ‘ब्रह्मोस’ खरेदी करण्याच्या करारावर शिक्कामोर्तब करणार आहेत. गेल्या महिन्यात भारतीय नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी यांच्या इंडोनेशिया दौऱ्यात या दीर्घकालीन करारावर चर्चा झाली होती. वेग आणि अचूकतेसाठी ओळखले जाणारे ब्रह्मोस क्षेपणास्त्र इंडोनेशियाच्या किनारपट्टी आणि सागरी संरक्षण क्षमता वाढवेल, अशी पोस्ट इंडोनेशियाचे संरक्षण मंत्री सजाफरी सजामसोदीन यांनी केली.

इंडोनेशियाच्या संरक्षण मंत्रालयाने सुमारे ३८ अब्ज रुपयांच्या ब्रह्मोस सौद्याबाबत भारताला पत्र पाठवल्याचा दावा सूत्रांकडून करण्यात आला आहे. एसबीआय किंवा इतर कोणत्याही भारतीय राष्ट्रीय बँकेकडून या करारासाठी भारत इंडोनेशियाला कर्ज देण्याची शक्यता आहे. एक्सिम् बँक सुरुवातीला इंडोनेशियाला कर्ज देण्याची प्रक्रिया सुरू करणार होती. मात्र, हे प्रत्यक्षात हे शक्य झाले नाही. ◂(वृत्तसंस्था)

# माओवाद कर्करोगाप्रमाणे; समूळ निर्मूलन आवश्यक

### मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांचे प्रतिपादन

◆ **रायपूर, १४ जानेवारी**



माओवाद हा कर्करोगाप्रमाणे आहे आणि त्याचे मूळापासून निर्मूलन आवश्यक आहे, असे प्रतिपादन छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी केले.

मागील वर्षात सुरक्षा दलाने विविध चकमकींत २३० पेक्षा जास्त माओवाद्यांचा खात्मा केला, असे त्यांनी सुकमातील काही विकास प्रकल्पांचे लोकार्पण कार्यक्रमानंतर आयोजित एका कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.

माओवाद कर्करोगाप्रमाणे आहे. कर्करोगाचे निर्मूलन होत नसेल, तर त्याच्या मूळावर घाव घालणे आवश्यक आहे. बस्तरच्या काही भागांत माओवादी जळूप्रमाणे चिकटून बसले आहेत आणि लोकांना धमकावून त्यांचे शोषण करीत आहेत. ही त्यांची सुरक्षित लपण्याची ठिकाणे आहेत. आम्ही माओवाद्यांच्या गढात घुसून त्यांच्यावर हल्ला करण्याचा निर्णय घेतला आहे, असे साय यांनी म्हटले आहे.

माओवाद्यांनी सुकमासह बस्तर विभागाला प्राणघातक हिंसाचारात ढकलले होते. यामुळे सुकमाच्या विकासावर वाईट परिणाम झाला. मागील वर्षात सरकारने सुकमाच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आणि त्यांची वेगाने अंमलबजावणी केली, असे ते म्हणाले.

सुव्यवस्थित रणनीती अंतर्गत माओवाद प्रभावित भागांत पोलिस छावण्यांचा विस्तार करण्यात आला, ज्यामुळे सुरक्षा जाळे मजबूत झाले, असे मुख्यमंत्री म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)




## ‘भारत जगाचे आध्यात्मिक हृदय...’

प्रयागराजमध्ये पौष पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर महाकुंभास प्रारंभ झाला आहे. पौष पौर्णिमेच्या पृष्ठभूमीवर पहिल्या पवित्र स्नानाचा योग भाविकांनी साधला. रोज दोन कोटींहून अधिक भाविक महाकुंभाला भेट देण्याची शक्यता आहे. त्यातही विदेशी भाविकांची संख्या लक्षणीय आहे. जगभरातील भाविक महाकुंभात सहभागी होण्यासाठी भारतात येत आहेत.

**श्रद्धा आहे; पण अंधश्रद्धा नाही...**

युरोपमध्ये वास्तव्यास असणाऱ्या एका रशियन भाविकाने सांगितले की, आम्ही प्रथमच महाकुंभात आलो आहोत. येथे खरा भारत आणि त्याची खरी शक्ती असणारे लोक आहेत. प्रयागराजमधील पवित्र स्नानाचा अनुभव हा माझ्यासाठी आध्यात्मिक उन्नती देणार आहे. मला भारत आवडतो, मेरा भारत महान! मी सात वर्षांपासून सनातन धर्माचे पालन करीत आहे. सनातन धर्मातील तर्कशास्त्र अर्थपूर्ण आहे. श्रद्धा आहे; अंधश्रद्धा नाही. हे खूप सुंदर आहे.

**महाकुंभात विदेशी भाविकांची मांदियाळी**

भारताला पहिल्यांदा भेट देणाऱ्या जोनाथनने यांनी सांगितले की, पवित्र स्नान हा उत्कृष्ट अनुभव आहे. येथील लोक आणि भोजन दोन्ही अत्यंत भारावून टाकणारे आहे. भारतातील सर्व तीर्थस्थळे, पवित्र स्थळे आणि मंदिरे पाहणे हा एक आश्चर्यकारक अनुभव आहे. आम्हाला शाही स्नानात सहभागी होण्याची इच्छा आहे. जगभरातून भाविक प्रयागराजला येत आहेत. दक्षिण आफ्रिका, ब्राझील आणि स्पेनमधील यात्रेकरूंनी सांगितले की, आम्ही खूप भाग्यवान आहोत. आम्हाला महाकुंभात सहभागी होता आले. भारत जगाचे आध्यात्मिक हृदय आहे. नदीतील पाणी थंड आहे; परंतु हृदय उबदारपणाने भरलेले आहे, असे ब्राझिलियन भक्त फ्रान्सिस्को यांनी सांगितले. ■



## ४० कोटी भाविक, एकाने ५ हजार खर्च केले तरी जमा होणार

# दोन लाख कोटी

### तेल, अगरबत्तीतूनच येणार २० हजार कोटी

प्रयागराजमध्ये पहिल्याच दिवशी गंगा, यमुना आणि सरस्वती नदीच्या पवित्र संगमात सुमारे दीड कोटी भाविकांनी पवित्र स्नान केले. जगातील सर्वांत मोठा मानवजातीचा मेळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, हजारो वर्षांच्या या कुंभमेळ्यात प्रयागराजमध्ये ४० कोटींहून अधिक लोक येण्याची अपेक्षा आहे. विशेष म्हणजे, ही संख्या अमेरिका आणि रशियाच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे.

१२ वर्षांनंतर आयोजित करण्यात येणारा हा महाकुंभाचा परिसर सुमारे चार हजार हेक्टरवर उभारण्यात आला आहे. २६ फेब्रुवारीपर्यंत हा महाकुंभमेळा चालणार आहे. यामुळे भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या उत्तरप्रदेशच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. ४५ दिवस चालणाऱ्या महाकुंभासाठी सुमारे ७ हजार कोटींचे बजेट वाटप केले आहे.



**जीडीपीमध्ये १ टक्क्याहून अधिक वाढ**

महाकुंभामुळे उत्तरप्रदेशात तब्बल २ लाख कोटींचा महसूल जमा होण्याची शक्यता आहे. अंदाजानुसार, ४० कोटी भाविकांपैकी प्रत्येकाने सरासरी ५००० रुपये खर्च केले, तरी यातून २ लाख कोटी रुपये मिळू शकतात. प्रती व्यक्ती सरासरी खर्च १० हजारांपर्यंत वाढू शकतो आणि एकूण आर्थिक उत्पन्न ४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकते. यामुळे नाममात्र आणि वास्तविक जीडीपीमध्ये १ टक्क्यांहून अधिक वाढ होण्याची अपेक्षा आहे.

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी २०१९ मध्ये प्रयागराजच्या अर्ध कुंभमेळ्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेत १.२ लाख कोटी रुपयांचे योगदान दिले. २०१९ मध्ये झालेल्या अर्ध किंवा अर्ध्या कुंभमेळ्याने सुमारे २४ कोटी भाविकांना आकर्षित केले होते. यावर्षी ४० कोटी भाविक येण्याची शक्यता आहे.

तेल, गंगाजल, मूर्ती, अगरबत्ती आणि धार्मिक पुस्तके यासारख्या धार्मिक वस्तू आणि अर्पण हे आर्थिक गोष्टींसाठी आणखी एक प्रमुख क्षेत्र आहे, ते अंदाजे २० हजार कोटींचे योगदान देतात. स्थानिक आणि आंतरराज्य सेवा, मालवाहतूक आणि टॅक्सींसह वाहतूक तसेच लॉजिस्टिक्सचा वाटा १० हजार कोटी रुपये असण्याची अपेक्षा आहे, तर टूर गाईड, ट्रॅव्हल पॅकेजेसशी संबंधित उपक्रमांसारख्या पर्यटन सेवांचा वाटा आणखी १० हजार कोटी रुपये असण्याची शक्यता आहे. ■

# महाकुंभात पोहोचले आयआयटीयन बाबा!

### भौतिकशास्त्राकडून भौतिकाच्या त्यागाकडे जाण्याची कथा

प्रयागराज महाकुंभात देश-जगभरातून साधू-संत आणि संन्यासींचा मेळावा दिसत आहे. असे अनेक संत आणि भिक्षूदेखील महाकुंभात आले आहेत, जे त्यांच्या अनोख्या शैलीने लोकांचे लक्ष वेधून घेत आहेत. याचे कारण आहे, त्यांचा इथपर्यंतचा प्रवास. महाकुंभात बाबांबद्दल बरीच चर्चा आहे. या बाबाचे नाव मसानी गोरख उर्फ आयआयटी असून, या नावाच्या प्रसिद्धीमागे एक विशेष कारण आहे. बाबांनी अभियांत्रिकी ते निवृत्तीपर्यंतचा प्रवास केला आहे. आता ते संगम शहरात राहतात. बाबा आयआयटी मुंबईचे पदवीधर आहेत. आयआयटी मुंबईमधून एरोस्पेस आणि एरोनॉटिकल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतल्यानंतर बाबांनी संन्यास घेतला. बाबांना लाखो रुपयांच्या पॅकेजचीही पर्वा नव्हती आणि त्यांनी सर्वस्व सोडून उर्वरित आयुष्य त्यागाच्या मार्गावर चालण्याचा निर्णय घेतला.

बाबा म्हणाले की, मी आयआयटी मुंबईचा पदवीधर आहे. मी एरोस्पेस इंजिनीअरिंग केले आहे. यानंतर, जेव्हा बाबांना विचारण्यात आले की, ते या अवस्थेत कसे पोहोचले, यावर बाबांनी सांगितले की, ही सर्वोत्तम अवस्था आहे. ज्ञानाचे अनुसरण करीत रहा. तुम्ही किती दूर जाल, शेवटी आपल्याला इथे यावेच लागेल. पण, त्यावेळी मला काय करावे, हे समजत नव्हते.



आयआयटी बाबांचे मूळ नाव अभयसिंग आहे. बाबा सांगतात की, मी मूळचा हरयाणाचा आहे. माझे जन्मस्थान हरयाणा आहे. मी बऱ्याच ठिकाणी गेलो. मी आयआयटी मुंबईमध्ये चार वर्षे शिक्षण घेतले. यानंतर त्यांनी आपली कलेची आवड जोपासली, फोटोग्राफीदेखील शिकले. डिझायनिंगमध्ये मास्टर्सची पदवी घेतली. पण मी कुठेही लक्ष केंद्रित करू शकलो नाही. माझ्या आतली चिंता वाढत होती. त्यानंतर मी येथे आले. फोटोग्राफी केल्यानंतर मला असे वाटले की, मी फक्त फिरत आहे. आयुष्यात काय चाललय् ते मला कळत नाही. मग मला प्रश्न पडू लागला की, मी इथे का फिरत आहे. स्वतःचे असे काही नाही. यानंतर मी सर्व सोडून धर्मशाळेत गेलो. तिथे मी स्वयंपाक आणि इतर मूलभूत दैनंदिन गोष्टी शिकलो. माझा त्यागाचा मार्ग तिथून सुरू झाला आणि त्यानंतर मी या मार्गावर पुढे जात राहिलो. इथे येऊन मला जीवनाचा अर्थ सापडला. ■

## लॉरेन पॉवेल जॉब्स पडल्या आजारी

महाकुंभासाठी ॲपलचे सहसंस्थापक स्व. स्टीव्ह जॉब्स यांच्या पत्नी लॉरेन पॉवेल जॉब्स आल्या आहेत. त्या आजारी पडल्याची माहिती निरंजन पीठाधीश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी कैलाशानंद गिरी यांनी दिली. स्वामी कैलाशानंद गिरी यांनी सांगितले की, त्या माझ्या शिबिरात असून, आराम करीत आहेत. त्यांना ॲलर्जी झाली आहे. त्या कधीही इतक्या गर्दीच्या ठिकाणी गेल्या नाहीत. पूजा करताना त्या आमच्यासोबत होत्या.

लॉरेन पॉवेल जॉब्स यांनी स्वामी कैलाशानंद गिरी यांना गुरू मानले आहे. स्वामी कैलाशानंद गिरी महाराजांनी त्यांना हिंदू धर्माची दीक्षा दिली असून, गोत्रही दिले आहे. कैलाशानंद गिरी यांनीच लॉरेन पॉवेल जॉब्स यांना कमला हे नाव दिले. लॉरेन पॉवेल जॉब्स या १५ जानेवारीपर्यंत निरंजनी आखाडा शिबिरातील टेंटमध्ये राहणार आहेत. त्यानंतर २० जानेवारी रोजी नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्याला त्या हजर राहणार आहेत. ■

## चित्रपट वार्ता

### माधुरीने खरेदी केली आलिशान फेरारी



**मुंबई** : माधुरी दीक्षित आजही अनेकांची आवडती अभिनेत्री आहे. सध्या ती समाज माध्यमांवर बऱ्यापैकी सक्रिय असते. आपल्या समाज माध्यमाद्वारे तिने नवी आलिशान गाडी घेतल्याची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली आहे. माधुरीने फेरारी २९६ जीटीएस खरेदी केली, ज्याची किंमत सहा कोटी रुपये आहे. तिने लाल रंगाची फेरारी खरेदी केली आहे. समाज माध्यमांवर तिने गाडीत बसतानाचा व्हिडीओ शेअर केला, जो प्रचंड व्हायरल होत आहे. आधीपासूनच माधुरीकडे मर्सिडीज गाड्यांचे कलेक्शन आहे. शिवाय इनोव्हा, स्कोडा, रेंज रोव्हर या गाड्याही तिच्याकडे आहेत. या ताफ्यात आता फेरारी समाविष्ट झाली आहे. ■

### ऑस्करवर कॅलिफोर्नियातील आगीचा प्रभाव

**कॅलिफोर्निया** : ऑस्करची नामांकने १७ जानेवारी रोजी जाहीर होणार होती; मात्र कॅलिफोर्निया जंगलातील आगीमुळे ती पुढे ढकलण्यात आली आहे. वणव्यामुळे शेकडो घरे जळून खाक झाली असून, त्यात अनेक हॉलीवूड सेलिब्रिटींच्या घरांचा समावेश आहे. आतापर्यंत २४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. ऑस्करच्या नामांकनाच्या तारखेत बदल करण्यासोबतच नामांकित व्यक्तींचा स्नेहभोजन समारंभही रद्द करण्यात आला आहे. मतदानाची तारीखही वाढवण्यात आली. मात्र, अद्याप लॉस एंजेलिस येथील डॉल्बी थिएटरमध्ये ३ मार्च रोजी होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. ■

### ‘धूम ४’साठी रणबीरचा चेहरामोहरा बदलणार



**मुंबई** : आगामी मेगा बजेट चित्रपट ‘धूम ४’ रणबीर कपूरच्या खात्यात आला आहे. या चित्रपटासाठी त्याने तयारी सुरू केली आहे. रणबीर कपूर ‘धूम ४’ चित्रपटासाठी त्याचा लूक पूर्णपणे बदलणार असल्याच्या बातम्या आहेत. या चित्रपटाचे चित्रीकरण पुढील वर्षी एप्रिलमध्ये सुरू होणार आहे. रणबीर कपूरला या चित्रपटात नवीन लूक दाखवावा लागेल आणि तो सुरू करण्यापूर्वी तो त्याचे दोन विद्यमान प्रकल्प पूर्ण करणार आहे. ‘धूम ४’चे चित्रीकरण एप्रिल २०२६ मध्ये सुरू करण्याची योजना आहे. प्रॉडक्शन टीम सध्या चित्रपटासाठी दोन फीमेल लीड्स लॉक करण्याचा प्रयत्न करीत आहे. या चित्रपटासाठी दाक्षिणात्य अभिनेत्रींचा विचार केला जात आहे. ■

### १५ वर्षांनंतर येतोय् ‘हुप्पा हुय्या’चा सिक्वल

**मुंबई** : अभिनेता सिद्धार्थ जाधव मराठीतील सुपरस्टार म्हणवला जातो. २०१० साली त्याचा ‘हुप्पा हुय्या’ हा चित्रपट चांगला चालला होता. आता या सिनेमाचा सिक्वल प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे. संक्रांतीच्या निमित्ताने सिद्धार्थने याची घोषणा केली. याचे दिग्दर्शन समित कक्कड करणार आहे. आधीच्या चित्रपटात मोहन जोशींसह अनेक कलाकार होते. आता या भागात कोणकोणते कलाकार दिसणार, हे लवकरच जाहीर केले जाणार आहे. ■

## अग्रलेख...

# दिल्ली विधानसभा भाजपा जिंकणार?

संपूर्ण देशाचे लक्ष सध्या दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीकडे लागले आहे. तारखांची घोषणा झाल्यापासून आधीच तापलेले वातावरण आणखी गरम झाले आहे. अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष स्वतःची सत्ता टिकविण्यासाठी जीवाचे रान करीत आहे, तर दशकापासून सत्तेबाहेर असलेली भारतीय जनता पार्टी पुन्हा सत्तेत येण्यासाठी जोमाने कामाला लागली आहे. काँग्रेस पक्षही स्वतःची ताकद आजमावण्याचा प्रयत्न करीत आहे. लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस आणि आम आदमी पक्षाची युती होती. अर्थात, इंडिया आघाडीने एकत्रित निवडणूक लढली होती. परंतु, आज स्थिती बदलली आहे. काँग्रेसने अरविंद केजरीवाल यांना देशद्रोही म्हटले आहे. त्यामुळे इंडिया आघाडीचे तीनतेरा वाजल्याचे चित्र भाजपाला सुखावणारे आहे. १९९८ ते २०१३ पर्यंत दिल्लीत काँग्रेसची सत्ता होती. पण, नंतर काँग्रेसने सत्ता गमावली. आता काँग्रेसची अस्तित्वासाठी लढाई सुरू आहे. दिल्लीत आम आदमी पार्टीने सलग दोन निवडणुका जिंकल्या. या दोन्ही वेळेस भाजपाला दहाचा आकडाही पार करता आला नव्हता, तर काँग्रेसला खातेही उघडता आले नव्हते. यावरून हे लक्षात येते की, दिल्लीवर आम आदमी पक्षाची किती घट्ट पकड आहे. पण, मधल्या काळात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या इतर सहकारी मंत्र्यांना तुरुंगवारी करावी लागल्याने पक्षाची बदनामी झाली. असे असले तरी आम आदमी पार्टीने मतदारांना जी आमिषे दाखवली आहेत, त्यामुळे मतदार खूश झाले असतील आणि पुन्हा ते याच पक्षाला कौल देतील, हे नाकारता येत नाही. मात्र, भारतीय जनता पार्टीने आम आदमी पार्टीने केलेल्या भ्रष्टाचारावर बोट ठेवत धारेवर धरले आहे. वास्तव आणि धारणा वेगळी असल्याची बाब भाजपाकडून जनतेच्या लक्षात आणून दिली जात आहे. याचा परिणाम आम आदमी पार्टीच्या कामगिरीवर निश्चितपणे होईल. भाजपाने आक्रमक भूमिका घेतल्याने पहिल्यांदा आम आदमी पार्टी दबावात असल्याचे चित्रही दिसत आहे. एकीकडे आम आदमी पार्टीने बचावात्मक पवित्रा घेतला आहे तर दुसरीकडे आक्रमक पवित्रा घेत भाजपा आणि काँग्रेसने गतवैभव प्राप्त करण्याचा प्रयत्न चालविला आहे. राजधानी दिल्ली म्हणजे सत्तेचे केंद्र. पण दिल्लीचे स्वतंत्र प्रशासनदेखील असल्यामुळे दिल्लीतले राजकारण दोन स्तरांवर रंगताना पाहायला मिळते. एकीकडे दिल्लीत देशभरातील राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आपापसांत करीत असलेल्या दावे-प्रतिदाव्यांमुळे राजकारण जोर धरत असताना दुसरीकडे दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने आता इथल्या राजकारणात वेगाने घडामोडी घडू लागल्या आहेत. दिल्ली निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यापासून राजकीय रंग बदललेले पाहायला मिळत आहेत. इंडिया आघाडीत फूट पडली असतानाच भाजपाप्रणीत रालोआतही फूट पडली आहे. रालोआचा घटक पक्ष असलेल्या आठवलेंच्या रिपब्लिकन पक्षाने १५ उमेदवार रिंगणात उतरविले आहेत. मात्र, भाजपाचे नुकसान करण्याचा आमचा हेतू नसल्याची मखलाशी करायलाही आठवले विसरले नाहीत. ७० विधानसभा जागांसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी दिल्लीकर मतदान करणार आहेत. त्यात ५८ जागा खुल्या प्रवर्गातल्या असून १२ जागा अनुसूचित जातींसाठी राखीव आहेत. दिल्लीत एकूण १ कोटी ५५ लाख मतदार आहेत आणि त्यातले ८३.४९ लाख पुरुष तर ७१.७४ लाख महिला मतदार आहेत. यामध्ये २५ लाख ८९ हजार तरुण मतदार असून त्यातही २.०८ लाख नवमतदार आहेत. हे सगळे मतदार आम आदमी पार्टी, भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेसचे भवितव्य सुनिश्चित करणार आहेत. गेल्या पाच विधानसभा निवडणुकांपैकी दोन विधानसभा निवडणुकांमध्ये दिल्लीत आम आदमी पक्षाने आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केल्याचे पाहायला मिळत आहे. त्यात २०११ सालच्या भ्रष्टाचारविरोधातील आंदोलनातून आम आदमी पक्षाचा झालेला जन्म दिल्लीच्या राजकारणाला संपूर्ण कलाटणी देणारा ठरला. काँग्रेससाठी पर्याय म्हणून भारतीय जनता पक्षाने दिल्लीच्या राजकारणात पाय रोवण्याचा सक्षम प्रयत्न २०१३ साली केल्याचे दिसून येते. परिणामी त्यांना ३१ जागांवर विजयही मिळाला. पण पुढच्या दोनच वर्षांत झालेल्या निवडणुकीत भाजपाची दाणादाण उडाली आणि आम आदमी पक्षाने दिल्लीत ऐतिहासिक असा विजय मिळविला. मात्र, हे ऐतिहासिक यश आपला पचविता आले नाही, असे दिसते आहे. अण्णा हजारे यांचा आधार घेत दिल्लीत आंदोलन उभे करत आणि अण्णांचा विश्वासघात करत राजकारणात उतरलेले अरविंद केजरीवाल हे आधी छोट्याशा मारुती कारमधून फिरायचे. मला गाडी-बंगला काहीही नको म्हणायचे. लोकांपुढे साधेपणाचे सोंग घेतलेला हा माणूस मुख्यमंत्री झाल्यानंतर पार बदलला आणि मोठमोठ्या आलिशान गाड्यांमधून पोलिस संरक्षणात फिरू लागला. सरकारी बंगला नको म्हणता म्हणता या ढोंगी माणसाने स्वतःसाठी चक्क 'शिशमहल' बनविला. पक्षाचे नाव आम आदमी आणि हे केजरीवाल झाले खास आदमी. जनतेला फुकटात वीज, पाणी दिले. जनता खूश झाली. पण, आता या केजरीवाल महाशयाचे खरे रूप जनतेपुढे आले आहे. त्यामुळे ५ फेब्रुवारी रोजी मतदार कुणाकडे झुकतात, हे पाहावे लागेल. काहीही असो, ही निवडणूक भाजपाने प्रतिष्ठेची केली आहे. आधी हरयाणा आणि नंतर महाराष्ट्रात मिळालेल्या भरघोस यशामुळे भारतीय जनता पार्टीचे मनोबल वाढले आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी काही महिन्यांपासून चालवलेल्या सातत्यपूर्ण आणि केंद्रित प्रचार मोहिमेच्या आधारे, दिल्ली विधानसभा निवडणुकीत दलितांचा प्रभाव असणाऱ्या मतदारसंघांमध्ये भाजपाच्या कामगिरीत लक्षणीय सुधारणा होण्याची आशा व्यक्त केली जात आहे. २०१५ आणि २०२० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या १२ मतदारसंघांपैकी एकही जागा जिंकता आली नव्हती. मागील निवडणुकांमध्येही भाजपाला यापैकी दोन किंवा तीनपेक्षा जास्त जागा कधीच जिंकता आल्या नव्हत्या. त्यामुळे यावेळी भाजपाने कंबर कसली असल्याचे दिसते आहे. दिल्लीत ३० विधानसभा मतदारसंघ आहेत, ज्यात अनुसूचित जातींसाठी राखीव असलेले १२ मतदारसंघ आहेत. त्यामध्ये दलित समुदायाचे मतदार १७ ते ४५ टक्के आहेत. या १२ राखीव मतदारसंघांव्यतिरिक्त राजेंद्र नगर, चांदनी चौक, आदर्श नगर, शाहदरा, तुघलकाबाद, बिजवासन यासह १८ इतर जागा आहेत जिथे अनुसूचित जाती समुदाय २५ टक्क्यांपर्यंत मतदान करतो; जिथे भाजपाला कसून मेहनत करावी लागत आहे. गेल्या काही महिन्यांत, या ३० मतदारसंघांमधील झोपडपट्ट्या आणि अनधिकृत वसाहतींमध्ये अनुसूचित जातीच्या कार्यकर्त्यांद्वारे व्यापक पोहोच मोहीम भाजपाकडून राबविण्यात आली. या सर्व ३० मतदारसंघांमध्ये समुदायातील सदस्यांमध्ये लक्ष केंद्रित करण्यासाठी वरिष्ठ एससी कार्यकर्त्यांना विस्तारक म्हणून नियुक्त करण्यात आल्याचा फायदा भाजपाला होण्याची शक्यता दिसते आहे. या विस्तारकांनी या मतदारसंघांमधील विविध वस्त्या आणि निवासी भागातील व्यक्तींशी संपर्क साधण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर १० दलित तरुणांना तैनात केले जाण्याची भाजपाची रणनीती निवडणुकीचे निकाल बदलेल, असे चित्र दिसते आहे. भाजपाने अशी ५,६०० हून अधिक मतदान केंद्रे ओळखली आहेत. त्यापैकी १,९०० हून अधिक मतदान केंद्रांवर विशेष लक्ष पक्षाकडून दिले आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. हरयाणा आणि महाराष्ट्रातील निवडणुकीत जी व्यूहरचना भाजपाने केली होती, त्यापेक्षाही प्रभावी रणनीती दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत आखली असल्याने आणि आम आदमी पक्षाने केलेल्या भ्रष्टाचारावर प्रहार केले जात असल्याने भाजपाला मोठा लाभ होईल आणि इतिहास घडेल, असे जे बोलले जात आहे, ते खरे ठरते का, हे ८ फेब्रुवारीला कळेलच. मतदारांशी संवाद साधण्यासाठी आणि मोदी सरकारने समाजासाठी केलेले काम आणि आम आदमी पक्षाच्या १० वर्षांच्या राजवटीत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत समजावून सांगण्यासाठी १८ हजारांहून अधिक सक्रिय कार्यकर्ते दिल्लीत फिरत आहेत. ही नवी रणनीतीही भाजपाला यश मिळवून देईल का, हेही पाहण्यासारखे असेल. दिल्ली जिंकण्यासाठी प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात भाजपाने पक्षातील ५५ मोठ्या दलित नेत्यांचा समावेश केला; ज्यात उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश आणि हरयाणा येथील माजी केंद्रीय मंत्री आणि खासदारांचा समावेश आहे, हे अतिशय महत्त्वाचे आहे. प्रचारातील हे वेगळेपण भाजपाला विजय मिळवून देईल, असे स्पष्ट दिसते आहे.

## प्रासंगिक

राहुल गोखले

# जन्मशताब्दी वर्षात खाशाबांचा सन्मान व्हावा

ऑलिम्पिकसारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांत भारतीय क्रीडापटू आपल्या कामगिरीने भारताचे नाव उंचावत आहेत. क्रीडापटूंना प्रशिक्षणाच्या मिळणाऱ्या संधी आणि साधने यांच्यात आता बरीच सुधारणा होत आहे हे खरे; तरीही जागतिक स्तरावरील क्रीडा स्पर्धांत आपला दबदबा निर्माण करण्यासाठी भारताला अद्याप बराच पल्ला गाठायचा आहे, हे नाकारता येणार नाही. आज ही स्थिती; तर पाऊणशे वर्षांपूर्वी स्थिती किती हलाखीची असेल याची कल्पनाच केलेली बरी. तरीही आपले कौशल्य, मेहनत आणि मुख्य म्हणजे जिद्द यांच्या बळावर ज्या क्रीडापटूंनी त्याही काळात आपला ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर उमटविला. त्यांतील अव्वल दर्जाचे क्रीडापटू म्हणून खाशाबा जाधव यांचा नामोल्लेख करावा लागेल. याचे कारण स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारताला हॉकीसारख्या क्रीडा प्रकारांमध्ये पदके मिळत असली, तरी कुस्तीसारख्या वैयक्तिक क्रीडा प्रकारात विजयाला गवसणी घालण्यात भारतीय क्रीडापटूंना यश येत नव्हते. पदकांचा तो दुष्काळ संपविला खाशाबा जाधव यांनी. तोही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दोनच वर्षांत. साहजिकच त्यांच्या त्या पदकाचे मोल आगळे. खाशाबा जाधव यांच्या जन्मशताब्दी वर्षाला सुरुवात होत असताना (जन्म : १५ जानेवारी १९२६) त्यांच्या या अतुलनीय कामगिरीचे स्मरण करणे औचित्याचे ठरेलच; पण नवोदित कुस्तीपटूंना ते प्रेरकही ठरेल.

खाशाबा जाधव यांचे वडील कुस्तीपटू होते. तेच बाळकडू खाशाबा यांना मिळाले असणार, यात शंका नाही. वयाच्या पाचव्या वर्षापासून ते तालमीत जाऊन मेहनत करू लागले असे म्हटले जाते; मात्र वयाच्या नवव्या-दहाव्या वर्षांपासून त्यांनी अधिक गांभीर्याने कुस्तीवर लक्ष केंद्रित केले असणार, असे मानावयास हरकत नाही. मल्लखांब हाही त्यांचा आवडता क्रीडा प्रकार होता, असे त्यांच्या त्या वेळच्या मित्रांनी सांगितले होते. वास्तविक जाधव यांची अंगकाठी ही वरकरणी कुस्तीपटूची वाटेल अशी नव्हती. परिणामतः कोल्हापूरच्या ज्या राजाराम कॉलेजमध्ये ते शिकत होते, तेथे आयोजित कुस्ती स्पर्धांत सहभागी होण्यास त्यांना संबंधितांनी नकार दिला. मात्र जाधव यांनी आपली जिद्द सोडली नाही. त्यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची भेट घेऊन स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी मिळविली. तेथील त्यांची कामगिरी सर्वांना आश्चर्यचकित करणारी होती. पण तो त्यांच्या पुढील कारकीर्दीचा केवळ आरंभबिंदू होता. १९४८ सालच्या लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत जाधव सहभागी होणार होते; तत्पूर्वी लखनौ येथे झालेल्या सराव स्पर्धेत त्यांनी निरंजन दास यांना धूळ चारली. धिप्पाड दास यांच्यावर मात करून जाधव यांनी आपली चमक दाखविलीच; पण आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्याविषयीच्या अपेक्षाही उंचावल्या. लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत जाधव सहाव्या स्थानावर राहिले; तीही कामगिरी दखल घ्यावी अशीच होती. ऑलिम्पिक स्पर्धांत सहभागी होणारे देशोदेशीचे कुस्तीपटू म्हणजे त्या क्षेत्रातील एकेक गडच. तरीही जाधव यांनी सहावे स्थान पटकाविण्यात यश मिळविले. मात्र, १९४८ सालच्या ऑलिम्पिक स्पर्धेत ज्या पदकाने जाधव यांना हुलकावणी दिली होती, त्याच पदकाला जाधव यांनी १९५२ साली गवसणी घातली. शिवाय त्यांनी आपला गटदेखील बदलला होता. १९४८ सालच्या स्पर्धेत त्यांनी ५१ किलो वजन गटात सहभाग घेतला होता तर १९५२ सालच्या हेलसिन्की ऑलिम्पिक स्पर्धेत ५७ किलो वजन गटात भाग घेतला होता. १९४८ आणि १९५२ मधील स्पर्धांत जाधव त्यांच्या दृष्टीने एवढाच फरक नव्हता.



लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत जाधव सहभागी होण्यास गेले तेव्हा त्यांना कोल्हापूरच्या महाराजांनी आर्थिक मदत दिली होती. १९५२ साली ती स्थिती पालटली होती. संस्थाने भारतात विलीन झाली होती. त्यामुळे हेलसिन्की स्पर्धेत भाग घ्यायचा तर केवळ सराव आणि जिद्द पुरणारी नव्हती. अर्थसाह्यदेखील तितकेच निकडीचे होते. एका छोट्या खेडेगावात राहणाऱ्या जाधव यांना तो खर्च परवडणारा नव्हता. मात्र, स्वप्नांना बळ अनेक ठिकाणांहून मिळत असते, याचा मनोहारी अनुभव जाधव यांना आला. जाधव यांनी जनतेकडे देणगीसाठी विनंती केली. आठ हजार रुपयांची आवश्यकता होती. ७५ वर्षांपूर्वी तीही रक्कम सामान्यांच्या आवाक्याबाहेरची होती. लोकांकडून मिळालेली आर्थिक मदत अपुरी ठरणारी होती. अखेरीस राजाराम कॉलेजचे प्राचार्य राहिलेले खर्डेकर यांनी आपले घर गहाण ठेवून चार हजारांची रक्कम उभी केली आणि आपल्या शिष्याच्या ती हवाली केली, असे खाशाबा जाधव यांच्या पुत्राने एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत सांगितले होते. आपल्या गुरूचे पांग या शिष्याने हेलसिन्की स्पर्धेत भारतासाठी कांस्य पदक जिंकून फेडले असेच म्हटले पाहिजे. जाधव यांनी घेतलेले कष्ट, त्यांनी दाखविलेली जिद्द हे सगळे महत्त्वाचेच यात शंका नाही; पण आपल्या शिष्यासाठी आपले घर गहाण ठेवणारे गुरू हेही आताच्या काळात दुर्मिळ ठरावे असेच उदाहरण.

त्या स्पर्धेत जाधव यांना अडचणींचा सामना करावा लागला. मातीत सराव केलेल्या कुस्तीपटूला मॅटची सवय नसते. त्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियम निराळे. सलग दोन सामने वेगवेगळ्या कुस्तीपटूंशी खेळणे सोपे नसते. पण जाधव यांची बाजू संबंधितांसमोर मांडण्यासाठी कोणीही भारतीय अधिकारी उपस्थित नव्हता. तरीही जाधव यांनी रिकाम्या हाताने स्वदेशात परतणे पसंत केले नाही. ऑलिम्पिक स्पर्धेत पदक मिळविणे ही आताही सोपी बाब नाही; तेव्हा तर ती अजिबात नव्हती. जाधव यांच्या त्या कामगिरीचे मोल हे म्हणूनच आगळे ठरते. आताच्या काळात अशा विजेत्यांचे स्वागत आणि अभिनंदन ज्या भव्यतेने होते तसे काही त्या काळात घडले नव्हते. आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानास्पद कामगिरी बजावून कराडजवळील आपल्या गावी परतलेल्या जाधव यांची मिरवणूक काढण्यात आली. तीत १०० हून जास्त बैलगाड्या सहभागी झाल्या होत्या, असे म्हणतात. १९५२ नंतर मात्र जाधव ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होऊ शकले नाहीत. कारण त्यांच्या गुडघ्याला झालेली दुखापत. त्यामुळे १९५६ सालच्या स्पर्धांना त्यांना मुकावे लागले. अन्यथा त्यांनी रौप्य अथवा सुवर्ण पदक अवश्य पटकाविले असते.

कुस्तीमधून निवृत्ती घेतल्यानंतर महाराष्ट्र पोलिसांत त्यांना नोकरी देण्यात आली आणि १९८३ साली पोलिस दलातून ते निवृत्त झाले. आपले 'ऑलिम्पिक निवास' नावाचे घर बांधावे, अशी त्यांची इच्छा होती; त्यासाठी निवृत्तीनंतर मिळालेली रक्कम त्यांनी त्यात घातली. पण आपले हे स्वप्न पूर्ण झालेले पाहण्याअगोदरच एका दुचाकी अपघातात १९८४ साली जाधव यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जाधव यांच्या वाट्याला जेवढा सन्मान येणे आवश्यक होते, तेवढा मात्र आला नाही. १९९४ साली महाराष्ट्राचा शिवछत्रपती पुरस्कार जाधव यांना जाहीर झाला हे खरे; मात्र ऑलिम्पिकपटूचा राष्ट्रीय स्तरावर जो सन्मान होणे गरजेचा होता, तो मात्र झाला नाही, हे कबूल करावेच लागेल. जाधव यांना मरणोत्तर अर्जुन पुरस्कार जाहीर झाला; तो २००१ साली अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार सत्तेत असताना, जाधव यांचा मृत्यू झाल्यानंतर तब्बल १७ वर्षांनी. पद्म पुरस्कारदेखील त्यांच्या वाट्याला आला नाही. स्वतंत्र भारताला ऑलिम्पिक स्पर्धेत वैयक्तिक क्रीडा प्रकारात पहिले पदक मिळवून देणाऱ्या क्रीडापटूला यापेक्षा अधिक सन्मान अवश्य मिळायला हवा, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. त्यांच्यावरील प्रस्तावित चित्रपट 'कॉपी राईट'च्या जंजाळात अडकला आहे. कुस्ती या क्रीडा प्रकारात भारताला आजवर ऑलिम्पिक स्पर्धांत केवळ आठ पदके मिळाली आहेत. त्यांत मुकुटमणी ठरावेत असे खाशाबा जाधव यांच्या जन्मशताब्दी वर्षात तरी त्यांच्यावरील चित्रपट यावा आणि शासनाने त्यांचा उचित सन्मान करावा, या दोन्ही अपेक्षा अवाजवी नाहीत.

९८२२८२८८१९

## वेध

गिरीश शेरेकर

# बांगलादेशी व रोहिंग्यांना शोधून हुसकावून लावा

बांगलादेशी व रोहिंग्यांची भारतातली घुसखोरी पूर्वी पश्चिम बंगाल, आसाम व पूर्वेतल्या अन्य काही राज्यांपर्यंत मर्यादित होती. आता ती संपूर्ण देशात पसरली आहे. या घुसखोरीला सर्वप्रथम पश्चिम बंगालमधल्या डाव्यांच्या सरकारने बळ दिले. त्या पाठोपाठ आसाममध्ये काँग्रेसच्या सरकारनेसुद्धा मोकळेरान करून दिले होते. हे घुसखोर दोन्ही राज्यांत स्थिरस्थावर झाले. त्यांना मतदानाच्या हक्कासह सोयीसुविधा देण्यात आल्या. एकगठ्ठा मतांच्या लालसेपोटी घुसखोरी अखंड सुरू राहिली. पहिले डाव्यांची असलेली ही मतपेढी आता तृणमूल काँग्रेसची झाली. त्यांच्या भरवशावरच ममतांची मदार आहे. २०१४ मध्ये केंद्रात भाजपाचे नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातले सरकार आल्यानंतर घुसखोरीकडे लक्ष केंद्रित करण्यात आले. आसाममध्ये भाजपाची सत्ता आल्यामुळे मोठ्या प्रमाणात घुसखोरीला लगाम लागला असून मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी ठाम भूमिका घेतली आहे. पण, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे बांगलादेशी व रोहिंग्यांना आश्रय देण्याचे काम सुरूच आहे. ही विषवल्ली देशभरात हळूहळू पसरत आहे. सामाजिक वातावरण दूषित होण्यासोबतच देशाच्या सुरक्षेसाठी हा मोठा धोका आहे. भाजपा व हिंदुत्ववादी संघटनांशिवाय अन्य कोणत्याही राजकीय पक्षाला व संघटनांना हा धोका वाटत नाही, याचेच मोठे आश्चर्य आहे.

देशातल्या अन्य भागांतल्या घुसखोरीचे अनेक मोठे पुरावे समोर यायला लागले असून मालेगाव व अमरावतीची उदाहरणे बोलकी आहेत. जेथे स्थिरावण्यासाठी उपयुक्त वातावरण आहे, अशाच ठिकाणी बांगलादेशी व रोहिंगे वास्तव्य करीत आहेत. महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात अनुकूल स्थिती निर्माण करण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केल्याचे दिसते. काही दिवस वास्तव्य केल्यानंतर घुसखोर आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, राशन कार्ड बनवितात. ते मिळविल्यावर जन्म दाखला बनवायचा अशी त्यांची कार्यपद्धती आहे. अमरावतीच्या अंजनगाव सुर्जीत तहसीलदाराकडे मोठ्या प्रमाणात जन्म दाखल्यासाठी अर्ज यायला लागले. तेव्हा सर्वप्रथम भाजपा नेते किरण पातूरकर यांना ही माहिती मिळाली. त्यांनी शहानिशा केल्यावर एकाही अर्जासोबत व्यवस्थित पुरावा नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी लगेच तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माहिती दिली. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या काळात अर्ज येण्याचे प्रमाण आणखी वाढले. दरम्यान, मालेगावात असाच प्रकार किरीट सोमय्या यांनी पुढे आणला. तेव्हा पुन्हा किरण पातूरकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना अंजनगाव सुर्जीची आठवण करून दिली. प्राप्त सूचनेनुसार सोमय्या यांनी माहिती अधिकारात आणि अन्य मार्गाने माहिती गोळा करून धक्कादायक खुलासे केले. मुख्यमंत्र्यांनी लगेच दखल घेऊन दोन्ही ठिकाणच्या चौकशीसाठी समिती गठित केली आहे. गेल्या सहा महिन्यांत एकट्या अमरावती जिल्ह्यामध्ये १४ हजार ६४३ अर्ज जन्म दाखल्यासाठी आले. त्यापैकी ८३५० जणांना दाखले देण्यात आले आहे. आलेल्या अर्जातले बहुतांश अर्ज बांगलादेशी व रोहिंग्यांचे आहे, असा दावा सोमय्यांचा आहे आणि त्याचे पुरावे त्यांनी दिले आहेत. अन्य जिल्ह्यांतही असेच काही घडले का, याचा शोध आता सरकारने सुरू केला असून सोमय्या माहिती गोळा करीत आहेत.

एखाद्या व्यक्तीचा कुठेही जन्म झाला असेल, पण त्याच्याकडे दाखला नसेल तर त्याला सर्वप्रथम जिथे जन्म झाला, तेथे नोंद शोधावी लागते. ती नसेल तर शासनाने ठरवून दिलेली आवश्यक पुराव्याची सात ते आठ कागदपत्रे गोळा करून तहसीलदाराकडे अर्ज करावा लागतो. त्यानंतर वर्तमानपत्रात नोटीस प्रसिद्ध करावी लागते. हरकतीची मुदत संपल्यानंतर दाखला मिळतो. या प्रक्रियेनुसारच मालेगाव व अमरावतीत अर्ज आले आहे. पण, यातील ९० टक्के अर्जांमध्ये सक्षम पुरावेच नाही. जी कागदपत्रे जोडली आहेत, तीसुद्धा बनावट असावी, असा संशय आहे. ही कागदपत्रे संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तपासली नाही आणि दाखले दिले, असा आरोप सोमय्यांचा आहे. जरी तुमची नोंद नसली, तरी कोणता ना कोणता पुरावा मिळतोच. यंत्रणेने तो मागायला हवा आणि खातरजमा करूनच दाखला द्यायला हवा, हा सोमय्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरण्यासारखा आहे. महाराष्ट्रात जे उघड झाले, याच पद्धतीने देशातल्या अन्य भागांतही असे प्रकार सुरू असण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रत्येक राज्यात सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. निश्चितपणे त्यातून काही समोर येईल. केंद्र व राज्य सरकारांनी या प्रकरणात विशेष लक्ष घालून बांगलादेशी व रोहिंग्यांना शोधावे आणि हुसकावून लावावे, तेव्हाच धोका कमी होईल.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# केनोपनिषद : उमाहैमवती आणि देवेंद्र संवाद

आदि शंकराचार्यांनी भाष्य केलेला गोड उपनिषद म्हणजे 'केनोपनिषद' होय. हा उपनिषद सामवेदाच्या अंतर्भूत असल्यामुळे याला 'सामवेदीय उपनिषद' असेही म्हणतात. या उपनिषदाची सुरुवात 'केन' या प्रश्नार्थक पदाने झाल्यामुळे या उपनिषदाला 'केनोपनिषद' असे म्हणतात. केनोपनिषद म्हणजे गुरू-शिष्य प्रश्नोत्तरी असून एकूण ३५ मंत्र चार खंडात आहेत. पहिले दोन खंड तत्त्वज्ञानात्मक असून दुसरे दोन खंड कथात्मक तत्त्वज्ञान आहे. भगवद्पूज्यपाद आदि शंकराचार्यांनी या उपनिषदावर दोन भाष्ये १) पदभाष्य २) वाक्य भाष्य लिहिलीत. सहसा एकाच विद्वानाने एकाच ग्रंथावर दोन भाष्य लिहिणे होत नसते, पण केनोपनिषदाबाबत हे आहे.

खरं तर 'वेदानां सामवेदोस्मि' असे प्रत्यक्ष भगवंतांनीच श्रीमद्भगवद्गीतेत स्पष्ट केले आहे. यज्ञ कर्मात १) होता २) अध्वर्यू ३) उद्गाता ४) ब्रह्मा नावाचे चार प्रमुख ऋत्विक असतात. त्यातील उद्गाता हे यज्ञकर्मात सामवेद गायन करीत असतात. केनोपनिषद सामवेदावरील भाष्य असल्यामुळे त्याला विशेष महत्त्व आहे.

केनोपनिषदात आद्याशक्ती श्रीउमाहैमवती आणि इंद्राचा प्रासादिक प्रश्नसंवाद असून परब्रह्म परमात्म्याचे ब्रह्मस्वरूप आद्याशक्ती हैमवतीने इंद्राला सांगितले आहे.

काय झालं की, देव-दानवांच्या युद्धात परब्रह्म परमात्म्याने देवांना साहाय्यभूत होऊन नव्हे, देवांना निमित्तमात्र करून दानवांना पराभूत केले. पण हा विजय आपल्या सामर्थ्यामुळेच झाला, असा गर्व देवांना झाला. त्यांचा गर्व हरण करण्यासाठी परब्रह्म परमात्म्याने आद्याशक्तीसह देवांची परीक्षा पाहण्यासाठी इंद्रादी देवांना गाठले. इंद्राने दरबारातूनच त्यांना पाहिल्यावर 'हा कोण बरे यक्ष?' असे म्हणून अग्निदेवांना समाचार घेण्यास पाठविले. त्या आद्याशक्तीने अग्निदेवांना प्रश्न केला की, ''कोण आपण?''

गर्वाने परिपूर्ण अग्निदेव म्हणाले की, ''आपण मला ओळखत नाही? अहो, मी अग्नी!''

आद्याशक्ती म्हणाल्या, ''बरं! काय करता आपण?''

अग्नी म्हणाले की, ''अहो, माझ्यात सर्वकाही भस्मसात करण्याचे सामर्थ्य आहे. तुम्ही मला ओळखत नाही? आश्चर्यच आहे!''

तेव्हा परब्रह्म परमात्म्याने एक गवताची काडी त्यांच्या समोर ठेवली आणि म्हणाले, ''जाळून दाखवा!'' मात्र, अग्निदेवांना ती काडी जाळता आली नाही. अपमानित होऊन अग्नी महाराज इंद्राच्या दरबारात खाली मान घालून गेले. मग इंद्रदेवांनी वायू देवतेला पाठवले. वायू त्या गवताच्या काडीला उडवू शकले नाही. सर्वांचा गर्व हरण झाल्यावर इंद्रदेव निघाले. इंद्रांना पाहताच परब्रह्म परमात्मा तेथून गुप्त झाले. इंद्राची इच्छा असूनही त्यांची परब्रह्माशी भेट झाली नाही.

आता इंद्रदेवांनी त्या ठिकाणी असलेल्या आद्याशक्ती हैमवती उमादेवींना नमस्कार करून 'आमचा गर्व हरण करणारे हे यक्ष कोण होते?' असा प्रश्न केल्यावर त्या आद्याशक्ती उमाहैमवती देवींनी इंद्राला उपदेश करीत त्या परब्रह्म स्वरूपाचे वर्णन इंद्रदेवांना सांगितले. तो संवाद कथात्मक स्वरूपात केनोपनिषदात सांगितला आहे. केनोपनिषदाची सुरुवातच साधक आपल्या श्रीगुरूंना आत्मस्वरूपविषयक प्रश्न करताना आहे.

*केनेषितं पतति प्रेषितं मनः ।*
*केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः ॥*
*केनेषितां वाचमिमां वदंति चक्षुः ।*
*श्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥*

प्रश्न आहे, कोणाच्या प्रेरणेने प्रेरित झालेले मन विषयाकडे धावते? कोणामुळे प्रथम प्राण स्वप्रवृत्त होतो? कोणाच्या प्रेरणेने वाणी बोलते? कोणत्या देवाच्या प्रेरणेने चक्षू आणि कान आपल्या कार्यासाठी नियुक्त होतात? या प्रश्नाचे सुंदर उत्तर केनोपनिषदात दुसऱ्याच ऋचेत आले आहे.

*श्रोत्रस्य श्रोत्रं, मनसो मनः*
*मन यद्वाचो ह वाचं स उ*
*प्राणस्य प्राणश्चक्षुषश्चक्षुः ।*
*अतिमुच्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवंति ॥*

जो कानाचाही कान आहे, मनाचेही मन आणि वाचेचीही वाचा आहे, तोच प्राणाचाही प्राण आणि चक्षूचाही चक्षू आहे. त्याचे स्वरूप जाणून धीरविवेकी पुरुष लोकातित होऊन अमृतस्वरूप होतो. या उपनिषदातच तप, दम कर्मादी ब्रह्मविद्या प्राप्तीची साधने असून सत्य हे ब्रह्मविद्येचे घर आहे, असे प्रतिपादन आहे. ती हैमवती स्वतःच स्पष्ट करते की, 'मी स्वतःच सच्चिदानंद आहे. मीच परब्रह्म आहे.'

मनुष्य कोणत्याही वर्णाश्रमाचा म्हणजे कुळाचा असो, कोणत्याही सांपत्तिक स्थितीचा असो स्त्री असो की पुरुष, कोणत्याही वयाचा असो त्याने परब्रह्मस्वरूप म्हणजे स्वस्वरूपाची ओळख करून घेतलीच पाहिजे. पुढे हैमवती म्हणते की, 'माझे ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान असून ते ज्यांना प्राप्त होते, असा पुरुष परब्रह्मस्वरूपच होतो.'

*यो वा एतामेवं वेदापहत्य पाप्मानमनंते,*
*स्वर्ग लोके ज्येये प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति ॥*

ब्रह्मज्ञानी पुरुषाची सर्व पापे नष्ट होतात, त्याला अनंत, आनंदस्वरूप सर्वोत्कृष्ट स्वर्गलोक प्राप्त होतो. अंती तो ज्ञानी आनंदस्वरूप परब्रह्म परमात्म्यामध्ये सुप्रतिष्ठित होतो. आत्मविद्येचे हे फळ सांगून केनोपनिषद विराम घेतो.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### टेलिकॉम नगर सखी मंडळाचा स्तुत्य उपक्रम

नागपूरमधील प्रतापनगरच्या बाजूला असलेली टेलिकॉम नगर वसाहत एक सुशिक्षित मध्यम वर्गीयांची वसाहत. जवळपास २०० महिला एकत्र येणं ही काही सोपी गोष्ट नाही. वय ४० ते ९० वयापर्यंतच्या महिलांचा एक समूह तयार करून रोजच्या दैनंदिन कामकाजातून विरंगुळा मिळावा, महिलांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा या हेतूने तयार झालेले हे सखी मंडळ आहे. अनेक वर्षांपासून या मंडळाची वाटचाल सुरू आहे. यामध्ये टेलिकॉम नगर ते स्वावलंबी नगर या परिसरातील महिला सदस्य आहेत. अनेक वेगवेगळे कार्यक्रम आखणे, महिलांच्या स्पर्धा घेणे, महिलांच्या आरोग्यविषयक तक्रारींचे निर्मूलन करण्यासाठी वैद्यकीय शिबिर आयोजित करणे, प्रबोधनाचे कार्यक्रम घेणे इत्यादी अनेक कार्यक्रम हे मंडळ करीत असते. आजकाल मराठी कलाकारांना, हौशी कलावंताना, नाटकांना थिएटर मिळत नाही. पैशांचा अभाव असतो त्यामुळे महिला हौशी कलाकारांमध्ये असलेल्या गुणांचा गौरव, कौतुक होत नाही. हाच धागा पकडून सखी मंडळाने महिलांची लघुनाटिका स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेत अनेक मंडळांनी सहभाग घेतला आणि विशेष म्हणजे लघुनाटिकेचे विषय हे आजच्या परिस्थितीशी निगडित आणि ज्वलंत होते. अनेक नवीन स्पर्धक यामध्ये सहभागी झाले. त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम या मंडळाने केले. तसेच भजन स्पर्धा सुद्धा आयोजित केल्या गेल्या. महिलांची सहल सुद्धा आयोजित केली जाते. या सर्वांचं वैशिष्ट्य म्हणजे अगदी नाममात्र शुल्क घेऊन महिलांना सदस्य करून त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात आनंद निर्माण करण्याचं काम हे सखी मंडळ करते. इतके छान काम कुठलीही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता हे सखी मंडळ करते त्याकरिता त्यांचे कौतुक व्हावे.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

### कुंभमेळ्याचे धार्मिक महत्त्व

भारतीय परंपरेत कुंभमेळ्याला वेगळंच महत्त्व आहे. असे म्हणतात कुंभमेळ्याला ज्या प्रचंड संख्येने भाविक गोळा होतात तितक्या संख्येने क्वचितच दुसऱ्या कोणत्या धार्मिक सोहळ्यात माणसं गोळा होत असावीत. यंदाचा कुंभमेळा प्रयागराज येथे सुरू झाला आहे. तिथे प्रचंड थंडी असल्यामुळे दिवसभर धुकं पसरलेलं असतं. तरीदेखील येथे मोठ्या संख्येने भाविक येऊन संगमाला भेट देतात आणि गंगेत स्नान करतात. काय आहे याचे महत्त्व? तर, दर १२ वर्षांनी कुंभमेळा व अर्ध कुंभमेळा सहा वर्षांनी होतो. १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत म्हणजेच ४५ दिवस हा कुंभमेळा चालणार आहे. त्यात सर्वसामान्य भाविक, नागा साधू, संत, मठाधिपती, पीठाधिपती सामील होतात. कारण इतिहासातील संशोधनानुसार दर १२ वर्षांनी जेव्हा सर्व तारे एका रेषेत येतात तेव्हा शंकराचार्यांद्वारे कुंभमेळ्याचे आयोजन केले होते. तसेच पुराणात देव आणि दानव राक्षसांनी जेव्हा समुद्रमंथन केले तेव्हा अमृत कुंभ बाहेर आले, मग जयंत नावाच्या कावळ्याने ते तोंडात धरून पृथ्वी प्रदक्षिणा केली तेव्हा एक एक थेंब प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक या चार ठिकाणी पडले. त्यामुळे ही चार ठिकाणं खास मानली जातात. पुराणात म्हटल्याप्रमाणे पक्ष्याने १२ दिवसांत पृथ्वीला प्रदक्षिणा घातली त्यामुळे दर १२ वर्षांनी कुंभमेळ्याचे आयोजन करण्याची प्रथा पडली आहे. यंदाच्या कुंभमेळ्याचे आयोजन खास पद्धतीने करण्यात आले आहे. यावेळी ४० कोटी लोक येण्याचा अंदाज आहे. यावरून तिथल्या व्यवस्थेची व्याप्ती लक्षात येते. यात अनेक छोट्या-मोठ्या जनतेचे योगदान आहे. यातून हिंदूंचे एकात्मता प्रदर्शन होईल. त्यात सेवा देणाऱ्या सर्वांना गंगा स्नानाचे पुण्य मिळो.



**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### समुद्रापेक्षा खोल असते बाप-लेकीचे प्रेम

रत्नाकराची खोली अमर्याद असते तर लांबी गगनाला भिडणारी असते. हे जेव्हा आपण पाहतो तेव्हा डोळ्यांसमोर येतात ते मुलगी आणि बाप. वडील असेपर्यंत हक्काने आपल्या माहेरी येणारी मुलगी वडिलांच्या निधनानंतर घरी येण्याची हिंमत हरवलेली असते, हे सत्य कोणी नाकारू शकत नाही. मुलीत असणारा वडिलांचा आत्मा आणि मुलीचे सर्वांत मोठे धैर्य व अभिमान या गोष्टी गुलदस्त्यातच असतात. यासाठीच आजच्या काळात मुलीला तिच्या भावाने-वहिनीने आणि घरातील परिवारांनी प्रेम देणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे. बुद्धीच्या अंतरंगातून उमटणारा प्रत्येक विचार हा समोरील व्यक्तीच्या भल्याची आणि हिताची प्रार्थनाच करणारा ठरतो. देवाच्या साक्षीने प्रत्येक कर्म प्रेमाचे असणे फार गरजेचे आहे.

**अमोल करकरे**/९९६९९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## संक्षिप्त वृत्त



### इच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीनं राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड यांनी मुंबई येथील देवगिरी या शासकीय निवासस्थानी मकर संक्रातनिमित्त त्यांची भेट सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वर यांची प्रतिमा, शाल, पुष्पगुच्छ, तिळगुळ वड्या देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार यांचा देखील मकर संक्रात निमित्त सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी राष्ट्रवादी प्रदेश युवक सरचिटणीस चेतन गायकवाड, विक्रांत शिंदे, दीपक आरगेल, महादेव राठोड, लतीफ तांबोळी आदी उपस्थित होते. १८ आणि १९ जानेवारी छत्रपती संभाजी नगर येथे राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांची मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. परंतु आता हा मेळावा १८ व १९ जानेवारी रोजी शिर्डी येथील पुष्पक हॉटेल येथे दोन दिवशीय मेळाव्याचे नियोजन करण्यात करण्यात आले या मेळाव्यात राज्यातील खासदार,आमदार, जिल्हाध्यक्ष,शहराध्यक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशचे विशेष निमंत्रित सदस्य आणि पदाधिकारी यांचा सहभाग असणार आहे. या मेळाव्यामध्ये येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे या मेळाव्यात मार्गदर्शन करणार असल्याचेही यावेळी पवार यांनी सांगितले. यावेळी राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि आमदार इद्रिस नाईकवाडी यांचे देखील भेट घेऊन मकर संक्रांति निमित्त तिळगुळ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.



### जनमंगल नागरी पतसंस्थेच्यावतीने उत्कृष्ट पत्रकार पुरस्काराचे वितरण

**दैनिक तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे यांचा गौरव**

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

येथील जनमंगल महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने पत्रकार दिनाचे औचित्य साधून देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट पत्रकार पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी दैनिक तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे यांचा गौरव करण्यात आला. जनमंगल महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थापक आणि जनमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी व्यवस्थापक विशाल मोरे, केरबा माने, मनपा कर्मचारी पतसंस्थेचे माजी चेअरमन भालचंद्र साखरे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी दैनिक तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे , विजय गायकवाड, नंदकुमार येच्चे, प्रशांत कटारे, विकास कस्तुरे , मकरंद ढोबळे, संजय घोलप आदी पत्रकारांचा यावेळी पुरस्काराने सन्मान करण्यात आला. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याप्रसंगी संस्कार पलंगे यांच्यासह कर्मचारी वृंद आणि सदस्य उपस्थित होते. यावेळी जनमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात म्हणाले, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. लोकशिक्षण आणि लोकजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकारितेच्या माध्यमातून घडते. पत्रकार लोकांचे प्रश्न, समस्या तसेच विविध विकासाचे मुद्दे यावर प्रकाशझोत टाकतात असे सांगत पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.

## निधव वृत्त

### सुरेश बंदगुल



**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

मंगळवार पेठ येथील प्रसिद्ध बारदाना व्यापारी सुरेश सिद्रामप्पा बंदगुल (वय ७२) यांचे दि. १४ जानेवारी रोजी पहाटे ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, जावई, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### महादेव सातपुते



**सांगोला, दि. १४ जानेवारी-**

हलदहिवडी (ता. सांगोला) येथील रहिवासी महादेव भगवान सातपुते (वय ९०) यांचे मंगळवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) पक्षाचे सांगोला तालुकाध्यक्ष खंडू सातपुते यांचे ते वडील होते.

### उर्मिला जाधव



**माळीनगर, दि. १४ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी जिल्हाध्यक्षा उर्मिला प्रदीप जाधव (वय ७८) यांचे मंगळवारी सकाळी वृद्धापकाळाने माळीनगर येथील निवासस्थानी निधन झाले. सासवड माळी शुगर फॅक्टरीचे माजी अध्यक्ष व माजी कार्यकारी संचालक आणि साम इशु ॲग्रो इंडस्ट्रीजचे माजी मॅनेजिंग डायरेक्टर प्रदीप भगवंतराव जाधव यांच्या त्या पत्नी होत्या. उर्मिला जाधव यांनी सहा वर्ष राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षपद भूषवले होते. त्या श्री शिर्डी साईबाबा संस्थानच्या आठ वर्षे विश्वस्त होत्या. माळशिरस पंचायत समिती सदस्यपदी त्या सहा वर्ष तर सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या

# मेहता शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

कै.वि.मो.मेहता माध्यमिक शाळेच्या प्रांगणात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. आठवणीतील गाणी या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित अनेक कलाकारांची गाणी विद्यार्थ्यांनी सादर केली.

राज कपूर, अशोक सराफ, अमिताभ बच्चन या सर्व कलाकारांची आठवण विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून रसिक पालकांना झाली. दिनांक ९ जानेवारी या पहिल्या दिवशी पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ.राजेश रतिलाल फडकुले यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. फडकुले यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या प्रतिभेचा, कलेचा आणि कष्टाचा उत्तम नमुना आहे, हे कार्यक्रम केवळ मनोरंजनासाठी नसतात तर ते विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व



विकासाला चालना देतात, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमासाठी शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन त्याचबरोबर विविध शाळांचे प्रमुख शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष रामचंद्र धर्मसाले, सेवाजेष्ठ शिक्षिका मीनाक्षी भाटवडेकर, स्नेहसंमेलनाच्या कार्याध्यक्षा वर्षा कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी तनिष्का कुंभारे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार आनंद कुलकर्णी व धनश्री विधाते व बक्षीस यादी वाचन प्रतिमा स्वामी यांनी केले.

## डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त पी.बी. ग्रूपतर्फे अभिवादन

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

पी.बी. ग्रुपच्या वतीने प्रबुद्ध भारत चौक, बुधवार पेठ येथे आज विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त तथागत भगवान गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी सामुदायिक बुद्धवंदना देण्यात आली. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



प्रतिमेस विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार चळवळीमधील गौतम इंगळे , गौतम नागटिळक, श्रीमंत जाधव, प्रा.अविनाश शिंदे, भारत बाबरे, विजय इंगळे, अरविंद गायकवाड, प्रमोद शिंदे, सुनील गायकवाड, राजाराम लोखंडे, धोंडीबा कापुरे, धीरज वाघमोडे आदी ज्येष्ठांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अविनाश भडकुंबे, प्रदीप शिंदे, विजय इंगळे, पी.बी. ग्रुप अध्यक्ष आदित्य चंदनशिवे, अरविंद गायकवाड, सुरज वाघमडे, सुनील गायकवाड, धीरज वाघमोडे, धोंडीबा कापुरे,भीमा इंगळे, प्रशांत गवळी,अजय इंगळे, बाबा गायकवाड,सिद्धार्थ दुपारगुडे, सुनील कांबळे, दत्ता कांबळे, सुनील महिंद्रकर,विजय शिवशरण, नितीन शिरसाट, शाहीर कांबळे, श्रीपती गायकवाड, अजित जाधव, श्रीनिवास गायकवाड, प्रकाश



# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील दोन कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक सुरक्षा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरम वीर मीणा यांनी १४ जानेवारी २०२५ रोजी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात सोलापूर विभागातील २ रेल्वे कर्मचाऱ्यांसह मध्ये रेल्वेच्या १२ कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरस्कार देऊन गौरविले. कर्तव्य दरम्यान सतर्क राहिल्याबद्दल, अनुचित घटना टाळण्यात आणि रेल्वे वाहतुकीत सुरक्षितता सुनिश्चित करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल कर्मचाऱ्यांना पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्कारात पदक, प्रशंसापत्र, अनुकरणीय सुरक्षा कार्याचे प्रशस्ती पत्र आणि २ हजार रुपये रोख रक्कम समाविष्ट आहे. सांगोला येथील इलेक्ट्रिकल बनवारी लाल आणि दुधनी येथील ट्रॅक मेंटेनर यल्लप्पा संतराम फूलमाळी यांना मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी सुरक्षा पुरस्कार देऊन गौरविले. यावेळी महाव्यवस्थापकांनी म्हणाले की, अशा सतर्कता आणि शौर्याच्या कृतींमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रामाणिकपणे काम करण्यास तसेच रेल्वे मालवाहतूक मालमत्तेचे नुकसान टाळण्यास प्रेरणा मिळेल असे सांगितले. सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांनी पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी अतिरिक्त महाव्यवस्थापक जगमोहन गर्ग, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी चंद्र किशोर प्रसाद व इतर विभाग प्रमुख आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### बघण्याच्या कारणावरून मारहाणप्रकरणी तरूणावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

बघण्याच्या कारणावरून मारहाणप्रकरणी तरूणावर एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शिवानंद आण्णाराव चिक्कळी (वय ४१, रा. नितिन नगर, कलावती नगर शेजारी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अमर नुरोद्दीन शेख (वय ३०, रा. नितीन नगर, सह्याद्री वाईन शॉपजवळ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ जानेवारी रेजी दुपारी राहत्या घराजवळ शिवानंद चिक्कळी यांना अमिर शेख याने दारू पिऊन विनाकारण तु मला का बघतो असे म्हणून मारहाण करून शिवीगाळ केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी) यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा क्रमांक SUR/TD/T/2024/11R कामाचे नाव : सोलापूर विभागात ट्रामवे OHE चे पारंपारिक OHE मध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव. (पुनर्निमंत्रण) अंदाजे किंमत :- रु. 1,66,89, 928.80/- बिल्ड सुरक्षा : 2,33,500/- पूर्ण कालावधी : 12 महिने. ऑफरची वैधता :- 60 दिवस निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ :- 11/02/2025 रोजी दुपारी 3.00 वाजता.

**Sr. DEE (TRD), सोलापूर**

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे SLP-40

**जामश्री रिअलटी लिमिटेड**
सीआयएनः L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालयः फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३ ००१
इमेल आयडीः jammill1907@gmail.com

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवार दि. २२ जानेवारी २०२५ रोजी ६०१-बी, ६वा मजला, मोतीमहल, १९५, जे. टी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० येथे सध्यांकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) इतर गोष्टीसह ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाही आणि नऊ महिन्याच्या कालावधी करीताचा कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ग्राह्य धरण्यासाठी आणि संमत करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

**जामश्री रिअलटी लिमिटेड करिता**
**सही/-**
तारीख : १४.०१.२०२५
ठिकाण : सोलापूर
**राजेश दमाणी**
**संयुक्त व्यवस्थापकीय संचालक**



### आस्था रोटी बँककडून सिव्हील हॉस्पीटलमध्ये अन्नदान

**सोलापूर, दि. १४ जानेवारी -**

आस्था फाऊंडेशन संचलित आस्था रोटी बँकेतर्फे १००० हजार लोकांना मकर संक्रांतीच्या निमित्त अन्न वाटप करण्यात आले. सोलापुरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरच्या योगदंड विवाहसोहळया निमित्ताने विविध पुजा विधी व उत्सव साजरे करण्यात येतात. परंतु समाजातील आजही एक वर्ग असा आहे जो वंचित आहे. दररोजच एकवेळच्या अन्नासाठी संघर्ष करावा लागत असताना मकर संक्रांती सारख्या सणाला गोडा धोडाच विचार ही करु शकत नाहीत. अशा नागरीकांसाठी आस्थाच्या वतीने मकर संक्रांती निमित्ताने शेंगा पोळी, कडक भाकरी, गरग्गट्टा, पुलाव अशा अन्नाचे वाटप करण्यात आले. सिव्हिल हास्पिटलमध्ये उपचाराकरिता आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांनापण मकर संक्रांती निमित्ताने अन्नदान करण्यात आले. याप्रसंगी सोलापूरचे सहायक पोलिस आयुक्त राजन माने, नंदा गोविंद लाहोटी उपस्थित होते. यावेळी सहायक आयुक्त मानेय ंनी आस्था रोटी बँक नेहमीच तळागाळातील लोकांना मदत करते व त्यांचे काम खूप छान असल्याचे सांगितले. याप्रसंगी आस्थाच्या वतीने सभासद निलीमा हिरेमठ, कांचन हिरेमठ, छाया गंगणे, संगिता छंचुरे, स्नेहा वनक्रुद्रे, निता आक्रुडे, मंगल पांढरे, ज्योत्सना सोलापुरकर, सुरेखा पाटील, सुर्वणा पाटील, माधुरी बिरादार, विद्या माने, विजय पाटील तसेच संस्थेचे विजय छंचुरे व पुष्कर पुकाळे आदी उपस्थित होते.



### कोंडी येथील महिला आरोग्य तपासणी शिबिरात ५० जणांची तपासणी

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

युगंधर फाउंडेशन सोलापूर आणि फेस सोसायटी पांगरी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने सोलापूर जिल्ह्यामध्ये कॅन्सर जाणीव जागृती आणि महिलांच्या आरोग्य तपासणी शिबिरा अंतर्गत तिसरे महिला आरोग्य तपासणी शिबिर उत्तर सोलापूर येथील कोंडी या गावात आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोनी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. आशा रोकडे या उपस्थित होत्या. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सोलापूर येथील नैसर्गिक शेती आणि कृषी पर्यटन क्षेत्रात नावाजलेल्या सोनाली जाधव-मस्के उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्तर सोलापूर तालुक्याचे आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रकांत ऐवळे होते.यावेळी युगंधर फाउंडेशनच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा वर्कर तसेच गावातील महिला आणि तरुणींच्या आरोग्य तपासणीचे शिबिर आयोजित करून महिलांमध्ये कॅन्सर विषयी जाणीव जागृती व्हावी यासाठी प्रयत्न केले. युगंधर फाउंडेशनच्या वतीने सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण पन्नास शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

**खरेदीपुर्व जाहिर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः खुद्द शहर पंढरपूर येथील व आसपासचे लोकांना खाली सही करणार श्री. भारत अनंतराव बहिरट, ॲडव्होकेट, काळा मारूतीजवळ, पंढरपूर यांजमार्फत या जाहिर नोटीसीद्वारा कळविण्यात येते की,:-

डिस्ट्रीक्ट सोलापूर सब डिस्ट्रीक्ट व तालुका पंढरपूर पैकी खुद्द शहर पंढरपूर हद्दीतील सिटी सर्व्हे नं. ४४२३/२, यांसी सिटी सर्व्हे रेकॉर्डाप्रमाणे क्षेत्रफळ १२.५० चौ.मी. (यांसी चतुः सिमा दिलेल्या नाहीत) ही मिळकत हल्लीचे विद्यमान मालक व वहिवाटदार ज्ञानेश्वर बापू सुकरे यांचे मालकीची असून सदरील मिळकत कायमखुष खरेदी देण्याचा ठराव आमचे अशिलाबरोबर केला आहे. सदरील जमीन ही निष्कर्जी, निजोखमी, हल्लीचे मालक यांचे निष्कलंक मालकीची असल्याची खात्री आमच्या अशिलास ज्ञानेश्वर बापू सुकरे यांनी दिलेली आहे व लवकरच आमचे अशिल ठरावाप्रमाणे खरेदी व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदर व्यवहाराबाबत आमचे अशिलाने विद्यमान मालकास इसारादाखल काही रक्कम देखील दिलेली आहे

तरी याद्वारा तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदरहू मिळकतीबाबत कुणाची काही, गहाण, दान, लिज, बोजा वा कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसाचे आत अस्सल कागदपत्रानिशी आमचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत येवून आमची खात्री पटवून द्यावी. तसे न घडल्यास कुणाची काही हरकत नाही असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मग मात्र कुणाची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

म्हणून हि जाहिर नोटीस दिली दिनांक : १४/०१/२०२५

**सही/-**
**ॲड. भारत अनंतराव बहिरट**
**(एम.ए., एलएल.एम.) ॲडव्होकेट**
**'अभिमान', ३०८१, काळा मारूती, पंढरपूर**

**नगरपरिषद तुळजापूर**

**जाहीर ई-निविदा सूचना**

**जा.क्र-नपतु/बा.वि/ई-निविदा/२०२५ दि. १४/०१/२०२५**

**जाहीर ई-निविदा प्रसिद्धीकरण**

नगर परिषद तुळजापूर अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन करण्याकरिता साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया राबविणे या प्रस्तावित कामास जाहीर प्रसिद्धीकरण करून ई प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुकांनी आपली ई-निविदा ऑनलाईन पद्धतीने दि. १४/०१/२०२५ ते दि. २२/०१/२०२५ रोजी सांय. ५:०० वाजेपर्यंत या विहित कालावधीत सादर करावीत. प्राप्त व पात्र निविदांचाच विचार केला जाईल. सदरील कामा बाबतीत इतर अटी व शर्ती **https://mahatenders.gov.in** या पोर्टलवर पहावयास मिळतील.

**ई-मेल : tuljapurmc@gmail.com**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद तुळजापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम १८ अनुसार जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, सोलापूर यांच्या वैधानिक कार्यक्षेत्रातील व प्रवर्गातील खालील सहकारी संस्थांचे संचालक मंडळ निवडणुक कार्यक्रमांची घोषणा मा. राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, म.रा. पुणे यांनी केलेली आहे. सदर निवडणुक कार्यक्रमातील महत्वाचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

| नामनिर्देशन पत्र विक्री व दाखल करावयाचा दिनांक | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याचा कालावधी |
|---|---|---|
| दि. १५/०१/२०२५ ते दि. २१/०१/२०२५ | दि. २२/०१/२०२५ | दि. २३/०१/२०२५ ते दि. ०६/०२/२०२५ |

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव व पद | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | करकंब नं.४ वि.का. सेवा सहकारी संस्था मर्या. करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | **अविनाश काशिनाथ कांबळे,** अप्पर उपलेखापरिक्षक, सहकारी संस्था, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | दि. १६/०२/२०२५ | लेखापरिक्षक श्रेणी १, सहकारी संस्था, पंढरपूर, ४६१३/अ/४, शिलप्रभा निवास, गाताडे प्लॉट, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| २ | वसंतराव काळे वि.का. सेवा सहकारी संस्था मर्या. पटवर्धनकुरोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | **एम.बी. सावंत,** लेखापरिक्षक, सहकारी संस्था, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | | |
| ३ | तपकिरी शेटफळ वि.का. सेवा सहकारी संस्था मर्या. त. शेटफळ, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | **एस.एस. सांगोलकर,** सहकारी अधिकारी श्रे. २, अधिन सहाय्यक निबंधक, सह. संस्था, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | दि. १६/०२/२०२५ | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर, इंद्रप्रस्थ इमारत, पहिला मजला, सावरकर चौक, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि. सोलापूर |
| ४ | उंबरगांव वि.का. सेवा सहकारी संस्था मर्या. उंबरगांव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | **जे. एल. जमादार,** सहा. सह. अधि. अधिन, सहाय्यक निबंधक, सह. संस्था, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | | |
| ५ | सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना सेवकांची सहकारी पतसंस्था लि. चंद्रभागानगर, भाळवणी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | **प्रदीप भानुदास सावंत,** सहकारी अधिकारी श्रे. १ अधिन, सहाय्यक निबंधक, सह. संस्था, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | | |
| ६ | बोहाळी - उंबरगांव वि.का. सेवा सहकारी संस्था मर्या. बोहाळी - उंबरगांव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | **जे. एल. जमादार,** सहा. सह. अधि. अधिन, सहाय्यक निबंधक, सह. संस्था, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | दि. १५/०२/२०२५ | |

**टीप :** उपरोक्त सर्व सहकारी संस्थांचे मतदार संघ, समितीचा रचना, निवडणुकांच्या विविध टप्प्यांच्या तारखा व वेळा इ. बाबतचा सविस्तर निवडणुक कार्यक्रम संबधित निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, संबधित तालुक्याचे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचे कार्यालय तसेच संबधीत सहकारी संस्थेच्या नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : १४/०१/२०२५**

**सही/-**
**(किरण गायकवाड)**
**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर**

## महत्त्वाचे

### गंभीर, रोहितमध्ये कोणताही वाद नाही

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार रोहित शर्मा यांच्यात कोणताही वाद नाही, अशी माहिती बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी सोमवारी दिली. सध्या खराब फॉर्मशी झुंजणाऱ्या रोहितलाही शुक्ला यांनी पाठिंबा दिला. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताचा १-३ असा दारुण पराभव झाला आणि रोहितने मालिकेदरम्यान फक्त ३१ धावा केल्या. त्यामुळे त्याला सिडनीतील पाचव्या आणि शेवटच्या कसोटी सामन्यातून स्वतःला बाहेर ठेवावे लागले.रोहितच्या खराब कामगिरीमुळे, त्याच्या आणि गंभीरमध्ये मतभेद असल्याची अटकळ होती. तथापि, विराट कोहलीसह संघातील इतर वरिष्ठ खेळाडूंच्या खराब कामगिरीवरूनही मतभेद झाल्याचे अनुमान आहे. पराभवानंतर संघावरील टीकेवरील प्रश्नांना उत्तर देताना शुक्ला म्हणाले, हे पूर्णपणे चुकीचे विधान आहे. निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर आणि प्रशिक्षक यांच्यात कोणतेही मतभेद नाहीत. कर्णधार आणि प्रशिक्षक यांच्यातही कोणतेही मतभेद नाहीत, असे राजीव शुक्ला यांनी स्पष्ट केले. गंभीरने वरिष्ठ खेळाडूंना चांगली कामगिरी करण्याचे किंवा वगळण्यास तयार राहण्याचे अल्टिमेटम दिले होते, अशी चर्चा आहे. शुक्ला म्हणाले, रोहितने कर्णधारपदाचा आग्रह धरला आहे हे देखील चुकीचे आहे. तो कर्णधार आहे.

### जोकोविच, अल्काराजचा सहज विजय

**मेलबर्न** : १९ वर्षीय भारतीय वंशाचा अमेरिकन टेनिसपटू निशेष बसवरेड्डी १० वेळा ऑस्ट्रेलियन ओपन विजेता नोवाक जोकोविचविरुद्ध सामना जिंकू शकला नाही, परंतु त्याने रॉड लेव्हर अरेनामध्ये बसलेल्या प्रेक्षकांना आपल्या खेळाने मंत्रमुग्ध केले. एका क्षणी असे वाटत होते की निशेष वर्षातील पहिल्या ग्रँड स्लॅममध्ये मोठा उलटफेर निर्माण करणार आहे. त्याने पहिला सेट जिंकला होता आणि दुसऱ्या सेटमध्ये तो शानदार खेळत होता, पण २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेता असलेल्या ३७ वर्षीय जोकोविचचा अनुभव कामी आला. त्याने ४-६, ६-३, ६-४, ६-२ असा विजय मिळवत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. जोकोविचला शेवटचा ग्रँड स्लॅमच्या पहिल्या फेरीत २००६ च्या ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये पराभव पत्करावा लागला होता. त्याला अमेरिकेच्या पॉल गोल्डस्टाईनकडून हा पराभव पत्करावा लागला. ही घटना निशेषच्या जन्मांतर काही महिन्यांनी घडली.

### शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर** : क्रीडा विभागामार्फत शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांमध्ये जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम, दिव्यांग खेळाडू व जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक) असे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. त्यासाठी २६ जानेवारीपूर्वी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नियमावलीनुसार सन २०२२-२३ या वर्षासाठीच्या पुरस्कारासाठी ज्येष्ठ क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी, दिव्यांग खेळाडू आदींकडून दि. १४ ते २६ जानेवारी या मुदतीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

### पॉवर लिफ्टिंगमध्ये सुलाखे कॉमरस कॉलेजच्या जाधवचे यश

**बार्शी** : छत्रपती शिवाजी रात्र कॉलेज व सोलापूर पॉवर लिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजमधील सौरभ सुधीर जाधव बी.कॉम. भाग १ मधील खेळाडू द्वितीय क्रमांक ६६ किलो वजन गटामध्ये पटकवला. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय करंडे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी प्रकाश पाटील, सहसचिव अरुण देवडवार व खजिनदार बापूसाहेब शितोळे तसेच सर्व संस्था पदाधिकारी व सदस्य यांनी अभिनंदन केले. तसेच पुढील होणाऱ्या आखिल भारतीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ.दत्तप्रसाद सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले.



# हरियाणाचा रजतसिंग त्रिमुर्ती कुस्ती चषकाचा मानकरी

## राहुल सुळ ठरला उपविजेता; पटकविला दीड लाखांचे बक्षिस

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ जानेवारी-**

माळशिरसचा मल्ल राहुल सुळविरुध्द हरियाणाच्या मल्ल रजतसिंग यांच्यामध्ये त्रिमुर्ती चषकासाठी अत्यंत अटीतटीच्या झालेल्या कुस्ती स्पर्धेत ९ गुणांकर रजतसिंगने विजय मिळवित त्रिमुर्ती चषकावर नाव कोरले. त्यास प्रथम क्रमांकाचे रोख २ लाख रुपये व सन्मानचिन्ह देण्यात आले.

यामध्ये सुरुवातीपासूनच रजतसिंह याने राहुल सुळवरती जोरदार आक्रमण केले होते. वारंवार कब्जा घेत रजतने राहुलची दमछाक केली. निकाली कुस्तीसाठी दिलेल्या वीस मिनिटाच्या वेळेत दोघांनीही एकमेकांची ताकद आजमावली. त्यानंतर तीन-तीन मिनिटाचे दोन डाव गुणांच्या कुस्तीसाठी देण्यात आले. व यामध्ये नऊ गुणांनी रजतसिंग विजयी ठरला. उपविजेता राहुल सुळ यास रुपये दीड लाख व सन्मानचिन्ह देण्यात आले. स्पर्धेच्या बक्षीस वितरणासाठी रुस्तमे हिंद , पद्मश्री पुरस्कार मल्ल सतपाल, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील प्रमुख उपस्थित होते.सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ यांच्या वतीने दि. १२ ते १४ जानेवारी या कालावधीत शंकरनगरच्या शिवतीर्थ आखाड्यात अखिल भारतीय त्रिमुर्ती चषक व वजन गट कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. शंकरनगरच्या शिवतीर्थ आखाड्यात या स्पर्धेसाठी महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, राष्ट्रकुल विजेता रामचंद्र सारंग, उपमहाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, वसंत जाधव, उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, यांच्यासह परिसरातील विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेत विविध वजनगटात ५७८ व खुल्या गटात ६२ अशा एकूण ६४० मल्लांनी सहभाग घेतला. तिसऱ्या व चौथ्या क्रमांकासाठी वैभव माने व प्रमोद सुळ यांच्यातील कुस्तीत प्रमोद सुळ विजयी ठरला. त्याला १ लाख रुपये व वैभव माने यास ५० हजार रुपयांचे बक्षिस देण्यात आले. वजन गटातील कुस्ती स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे २५ किलो श्रेयस कदम वेळापूर, २८ किलो विराज पवार निमगाव, ३० किलो मेघराज तांबिले अकलूज, ३२ किलो युवराज वरेकर खुडुस, ३५ किलो संस्कार जाधव वई, ४० किलो आदित्य सावंत असुन, ४५ किलो हनुमंत जाधव खुडुस, ५० किलो अक्षय चव्हाण खुडुस, ५५ किलो देविदास जाधव कलेढोण, ६० किलोअविराज माने खुडुस, ६५ किलो पवन धायगुडे करकंब, ७० किलो सोमनाथ गोरड गोरडवाडी, ७५ किलो रामचंद्र नंदगौड मंगळवेढा, ८० किलो कृष्णा बनसोडे मंगळवेढा, ८५ किलो अविनाश गावडे पुणे यांनी विजय संपादन केला. विजेत्या व उपविजेत्या मल्लांनाही रोख रकमेची बक्षीसे देण्यात आली. या स्पर्धेमध्ये रोहिदास आमले, राम सारंग, प्रकाश घोरपडे, तानाजी केसरे, बाजीराव पाटील, चंद्रकांत मोहोळ, नितीन शिंदे, सद्दाम जमादार, अमोल पवार, मकरंद पाटील, बाजीराव पाटील, महेश जाधव, महेश पाटील, शंकर गोंगुडे, संभाजी मगदूम, दत्ता एक्षिगे, प्रवीण निकम यांनी पंच म्हणून काम पहिले. कुस्तीचे सूत्रसंचालन अशोक घोत्रे यांनी केले.





### मोहिते-पाटलांकडून पैलवानांना घडविण्याबरोबरच देशसेवाही

मोहिते-पाटील कुटुंबीय मागील ४६ वर्षांपासून या कुस्ती स्पर्धेतून केवळ पैलवानच घडवत नाहीत तर देशसेवा ही करीत आहेत. तरुणांना तंदुरुस्त ठेवून नवी पिढी घडवीत आहेत. मोठी स्पर्धा व मोठी बक्षिसे इथे आहेत. मी ३ हजार कुस्त्या जिंकलो. माझे पहिले बक्षीस चारआणे होते आणि शेवटच्या कुस्तीत पाच लाख होते. इथे मात्र खूप मोठी बक्षिसे पैलवानांना दिली जातात, असे दिल्लीचे रुस्तमे हिंद मल्ल सतपाल यांनी सांगितले.

# पुड्या गोळा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील रामजी कश्यप



**नवी दिल्ली, १४ जानेवारी**

येथे १३ ते १९ जानेवारी दरम्यान सुरु असलेल्या पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेसाठी रामजी कश्यपची अष्टपैलू खेळाडू म्हणून निवड झाली. सलामीच्या नेपाळविरुद्धच्या सामन्यात पहिली स्काय डाइव्ह व पहिली विकेट रामजी कश्यपच्या नावावर होती. त्याच्याबद्दल...

**थेट दिल्लीतून**
**अजितकुमार संगवे**

आई-वडील व्यवसायाच्या शोधात उत्तर प्रदेशमधून सोलापूर जिल्ह्यातील वेळापूर येथे आले. येथे वास्तव्यास आल्यापासून गेली तीस वर्षांपासून छापडी (पुड्या) गोळा करण्याचा व्यवसाय कुटुंब करत आहे. या कुटुंबातील रामजी कश्यप.

रामजीने वेळापूर येथे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेतून घेतले. त्यानंतर इंग्लिश स्कूल वेळापूरमध्ये प्रवेश घेतला आणि तेथे खऱ्या अर्थाने त्याच्या खेळाची सुरुवात झाली कुटुंबाची परिस्थिती अतिशय हलाखीची. वडील हरिचंद्र, आई कमल, भाऊ रामनारायण, अजय, बहिण अंजली आणि रामजी असा हा परिवार रोज गावातून छापडी गोळा करून आपला उदरनिर्वाह चालवायचा.

वयाच्या तेराव्या वर्षापासून खो खो खेळण्याची आवड रामजीला निर्माण झाली. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते व क्रीडाशिक्षक नारायण जाधव यांनी रामजीमधील खो-खो खेळाविषयी असलेली आवड व त्याच्यामधील कौशल्य ओळखले तसेच क्रीडा शिक्षक सतीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली खो-खोच्या सरावाला सुरुवात झाली. परंतु आई-वडिलांकडून खेळाला विरोध होता. सरावाला जात असल्याने व्यवसाय बंद पडत होता. कुटुंबाचा रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होत आहे, त्यामुळे सरावास पाठवू शकत नाही असा साफ नकार त्याच्या आई वडिलांनी दिला. त्यावेळी नारायण जाधव व सतीश कदम यांनी कश्यप कुटुंबीयांच्या घरी जाऊन वेळोवेळी समजूत काढली, आर्थिक मदत देण्याची ग्वाही दिली. त्याच्या कुटुंबाला शैक्षणिक खर्चाचीही आश्वासन देऊन रामजीला खेळण्यास प्रवृत्त केले.

तिथून खऱ्या अडचणीतून मार्ग निघाला व यशाची सुरवात झाली. अर्धनारी नटेश्वर खो-खो क्लबचे अध्यक्ष जावेद मुलाणी, प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, शिवाजी जाधव, जावेद आतार व श्रीनाथ खटके यांच्या मार्गदर्शनाखाली त्याची कामगिरी बहरत आहे. राष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार त्याने सलग दोन वेळा मिळवला. ११ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये त्याने १० सुवर्ण तर १ रौप्य पदकाची कमाई केली आहे. त्याने सलग दोन वर्ष अल्टीमेट खो खो लीगमधील 'दुर्नामेंट ऑफ द बेस्ट प्लेअर'चा पुरस्कार मिळविला. खेळातील कामगिरीमुळेच सध्या तो सेंट्रल रेल्वेमध्ये टी.सी. पदावर काम करत आहे . सेंट्रल रेल्वेला इंटर रेल्वे स्पर्धेत ३० वर्षांनंतर प्रथमच त्याने विजेतेपद मिळवून दिले. यामध्ये त्याला बेस्ट प्लेअरचा पुरस्कार मिळाला. धाराशिव येथे झालेल्या पुरुष खो खो स्पर्धेत त्यास उत्कृष्ट संरक्षकाचा पुरस्कार मिळाला.

# टीम इंडियाचा दमदार विजय

## ब्राझीलवर मात करत बाद फेरीच्या एक पाऊल जवळ



**नवी दिल्ली, १४ जानेवारी**

खो-खो विश्वचषक २०२५ च्या दुसऱ्या दिवसाच्या शेवटी, टीम इंडियाने ब्राझीलवर ६४-३४ अशा प्रभावी विजयासह नॉकआउट फेरीकडे वाटचाल केली. इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये झालेला हा सामना रोमांचक क्षणांनी भरलेला होता. भारत आणि ब्राझील दोन्ही संघांनी आपल्या कौशल्याचा अप्रतिम खेळ केला, मात्र भारताने शेवटच्या टप्प्यात आपल्या साम र्थ्याचा ठसा उमटवला.

**सामन्याचा पहिला टर्न : ब्राझीलची सुरुवात, भारताचा प्रत्युत्तर**

ब्राझीलने पहिल्या टर्नमध्ये आक्रमक सुरुवात करत १६ गुण मिळवले. मात्र, भारताने ड्रीम रन दरम्यान दोन महत्त्वाचे गुण मिळवत ब्राझीलवर दबाव निर्माण केला आणि सामन्याचा पाया मजबूत केला.

**दुसऱ्या टर्नमध्ये भारताचा जोरदार खेळ**

दुसऱ्या टर्नमध्ये भारतीय संघाने आक्रमणात आघाडी घेतली. रोकेसन सिंग, पबानी साबर, आणि आदित्य गणपुले यांनी जबरदस्त खेळ करत भारतासाठी ३६ गुण मिळवले. यामुळे भारताने मोठी आघाडी घेतली.

**ब्राझीलचा झंझावात आणि भारताची प्रतिक्रिया**

तिसऱ्या टर्नमध्ये ब्राझीलने जोरदार पुनरागमन केले. मॉरी पिंटो, जोएल रॉड्रिग्स, आणि मॅथ्यूस कोस्टा यांनी संघासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले, विशेषतः कोस्टाने सहा टचपॉइंट मिळवले. ब्राझीलने या टप्प्यात ३४ गुण मिळवत सामन्यात रंगत निर्माण केली.

**अंतिम टर्न : भारताची निर्णायक कामगिरी**

चौथ्या टर्नमध्ये भारतीय संघाने जबरदस्त पुनरागमन केले. आदित्य गणपुले आणि कर्णधार प्रतीक वाईकर यांनी संघासाठी जोरदार कामगिरी करत विजय ट्प्प्यात आणला. रोकेसन सिंगने स्काय डाइव्हमधून चार गुण मिळवले, तर मिहुलने दोन टचपॉइंट मिळवत भारताचा विजय सुनिश्चित केला. सामन्याचा शेवट ६४-३४ असा झाला आणि भारताने बाद फेरीशी आपली दावेदारी मजबूत केली.

**सामन्याचे पुरस्कार**

*** सर्वोत्कृष्ट अटॅकर:** पबानी साबर (टीम इंडिया) *** सर्वोत्कृष्ट डिफेंडर:** मॅथ्यूस कोस्टा (टीम ब्राझील) *** सर्वोत्कृष्ट खेळाडू:** प्रतीक वाईकर (टीम इंडिया)



# जिल्हा योंगमुडो स्पर्धेत रुद्रशक्ती गुरुकुलला ११ सुवर्ण

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

शालेय जिल्हा योंगमुडो स्पर्धेत रुद्रशक्ती गुरुकुलने ११ सुवर्ण पदकांची कमाई केली.

या विद्यार्थ्यांना प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. याचे उद्घाटन आयशा इनामदार, अविनाश गायकवाड, नागेश शेट्टीकर व योगीनाथ फुलारी, विठ्ठल वाघचौरे यांच्या उपस्थितीत झाले. कामगिरी : १४ वर्षाखालील : बिंद्रिया कुने, श्रद्धा सरवदे, गौरी माळी, अदिती नह्ला, सोनाक्षी माडे, वेनेला चिलका, हार्दिक चिलका. १७ वर्षाखालील : ममता अलशेट्टी, दिव्या द्विड्डी, योगिता सरवदे. १९ वर्षाखालील : अक्षया गड्डम.

# भारतीय महिला संघाची दणदणीत विजयी सलामी

## दक्षिण कोरियाचा १५७ गुणांनी पराभव

### पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा

**नवी दिल्ली, १४ जानेवारी**

भारतीय महिला संघाने पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेत दणदणीत विजयी सलामी दिली. नसरीन शेख या सामन्याची मानकरी ठरली. नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या दिवशी पुरुष संघाला नेपाळविरुद्ध निसटता विजय मिळाल्यानंतर महिला संघाने सलाम च्या सामन्यात दक्षिण कोरियाचा १७५ विरुद्ध १८ असा १५७ गुणांनी पराभव करीत मकरसंक्रांते साजरी केली. पहिल्या डावातील पहिल्या सत्रात १०-२, दुसऱ्या सत्रात ९४-१० तर दुसऱ्या डावातील तिसऱ्या सत्रात ९७-१८ आणि अंतिम सत्रात १७५-१८ असे गुण मिळवीत भारतीय संघाने दक्षिण कोरियाची पळता भुई केली. महिलांच्या या सामन्याला प्रेक्षकाचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. प्रत्येक गुणानंतर प्रेक्षकांनी ढोल-ताशाच्या गजरात नाचत भारतीय संघाचे स्वागत केले.



# अब्दुल रहिमान, सुतार, बनसोडे, व्हनगावडे कर्णधार

## सोलापुर जिल्हा ज्युनियर व सब ज्युनियर नेटबॉल संघ जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

धुळे येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य ज्युनियर व सब ज्युनियर नेटबॉल स्पर्धकरिता सोलापूर जिल्हा कर्णधारपदी अब्दुल रहिमान, नम्रता सुतार, सिध्दार्थ बनसोडे व संपदा व्हनगावडे यांची निवड करण्यात आली. सर्व खेळाडूना संघटनेचे पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

**संघ : ज्युनियर मुले:** अब्दुल रहिमान (कर्णधार) तोरणे यश, अथर्व अविनाश, दवेवाले वेदांत, विक्रम माने, विक्रम पांडुरंग, मोहंमद याहया, तेजस पाटील, बसवेश्वर चौगुले, शब्बीर हुंडेकरी, नालबंद रेहान, अजान पिरजादे,


रहिमान


सुतार


बनसोडे


व्हनगावडे

**मुली:** नम्रता सुतार (कर्णधार), भाग्यश्री घोडके, संस्कृती यादव, राजनंदिनी यलगुडे, अंजली मुठले, साक्षी गुंड, दिपती सुर्यवंशी, आसावरी कदम, पायल गुंड, दिक्षा वाघमोडे, कक्षमला नालबंद, ब्राह्मणी चिलवेरी

**सबज्युनियर मुले:** सिध्दार्थ बनसोडे (कर्णधार), आदित्य मिसाळ, सोमनाथ गोसवामी, तुषार बनसोडे, सिधदराज कुसुमडे, कौसिफ नालबंद, अभिजित बजारे, वाहिद पटेल, वैभव जगाले, सुबहान मौलवी, बिलाल यललगी, उमर बागवान, शहानवाज पटेल.

**मुली:** संपदा व्हनगावडे (कर्णधार) मानसी पोसा, वेदिका गायकवाड, वेदिका धुलम, श्रीया लकडे, सौंदर्या जिल्हा, महेश्वरी मादगुंडी, तेजस्विनी दुर्गम, गौरी चौगुले, दिक्षा वाघमोडे, मुमताज डोका, सानीका.

# शुटिंग बॉल स्पर्धेमध्ये टेंभुर्णी आश्रमशाळा प्रथम

## संघाचे सर्व खेळाडू राष्ट्रीयस्तरावर पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद यवतमाळ येथील जिल्हा क्रीडा संकुलात दि.१२ जानेवारी ते १४ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय शालेय शुटिंग बॉल स्पर्धेत पुणे विभागाचे नेतृत्व केलेल्या टेंभुर्णी (ता.माढा) येथील जय तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा नाशिक विभागाचा पराभव करून राज्यात प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली आहे.

टेंभुर्णी येथील जय तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेचा संघाने शालेय शुटिंग बॉल स्पर्धेच्या १९ वर्षाखालील गटामध्ये पुणे विभागात प्रथम क्रमांक मिळविला होता. आणि पुणे विभागाकडून खेळण्यासाठी यवतमाळ येथे राज्यस्तरीय शालेय शूटिंग बॉल स्पर्धेतही अमरावती व छत्रपती संभाजी नगर विभागास पराभूत करून प्रथम क्रमांक पटकावून फायनलमध्ये नाशिक विभागाबरोबर सामना झाला.सदर सामान्यामध्ये खेळून पहिला डाव २१-१८ व दुसरा डाव २१-१२ अशा चुरशीच्या लढ्यात संघाचा कर्णधार ऋतुराज रोहिदास वाघम रे याने उत्कृष्ट कामगिरी करून नाशिक विभागाचा पराभव करून राज्यात प्रथम क्रमांक येण्याचा मान मिळविला व संघाचे सर्व खेळाडू पुणे विभागाकडून राष्ट्रीय स्तरावर खेळण्यास पात्र ठरले. या विजेत्या संघास यवतमाळचे क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांच्याहस्ते पुरस्कार व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले. या यशस्वी सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षक प्रा. संतोष शिंदे व रेणुकादास वाळके, महादेव चौगुले यांचे इतर मागास व बहुजन कल्याण विभाग सोलापूरच्या संचालिका मनीषा फुले, जिल्हा क्रीडा अधिकारी तानाजी मोरे, रेल्वे विभागाचे निरंजन मोरे, नांदेडचे अधीक्षक अभियंता संभाजी धोत्रे, शिवशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ टेंभुर्णीचे संस्थापक कैलास सातपुते, अध्यक्ष प्रशांत साळे व महाविद्यालयाच्या प्राचार्या जयश्री गवळी, प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका संतोषी आगावणे, प्रा. शुभम सातपुते तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जयमल्हार पत्रकार संघाचे सामाजिक कार्य कौतुकास्पद

## ● गहिनीनाथ महाराज औसेकर : अणदूर येथे दीपस्तंभांचा कृतज्ञता सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १४ जानेवारी-**

अणदूरच्या जयमल्हार पत्रकार संघाने गेल्या १० वर्षात अनेक समाजोपयोगी उपक्रम घेतले आहेत. आजचा अणदूर दीपस्तंभाचा सन्मान सोहळा हा त्यातीलच एक असून असे सामाजिक कार्य गावागावात व्हावेत त्यातून जेष्ठ नागरिकांना ऊर्जा मिळते असे उद्गार श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे सहअध्यक्ष गहनीनाथ महाराज औसेकर यांनी काढले.

ते येथील जयमल्हार पत्रकार संघाच्या वतीने आयोजित दिनदर्शिका प्रकाशन व अणदूरच्या दीपस्तंभाचा कृतज्ञता सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी येथील निलकंटेश्वर मठाचे मठाधिपती श्री ष. ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामी होते. यावेळी आ. राणा जागजितसिंह पाटील, तुळजाभवानी साखर कारखान्याचे चेअरमन सुनील चव्हाण, अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे, ग्रामपंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, माजी सरपंच महादेवप्पा आलुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

सत्कारमूर्ती माजी मंत्री मधुकरराव चव्हाण म्हणाले की, अणदूरच्या जनतेने आम्हाला भरपूर प्रेम दिले असून, पंचायत समिती सभापती ते थेट कॅबिनेट मंत्री बनवले आहे. तुळजापूर तालुक्यात गाव तिथे शेततळे निर्माण केल्यामुळेच या कुसळी तालुक्यात शेतकरी बागायत झाला. शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांची सेवा करणार असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी शिक्षण महर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांचे स्मरण केले. आ. राणा पाटील म्हणाले की, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणे ही आपली संस्कृती जयमल्हार पत्रकार संघाने जपली असून, गावाला अशा दीपस्तंभाचा खूप मोठा आधार असतो असे सांगून संघाच्या दिनदर्शिकेस शुभेच्छा दिल्या. यावेळी सरपंच रामचंद्र आलुरे यांचे भाषण झाले. अध्यक्षीय समारोप श्री ष. ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामी यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. संतोष पवार यांनी केले तर प्रास्ताविक शिवशंकर तिरगुळे यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन चंद्रकांत गुड्डू यांनी तर आभार शिवाजी कांबळे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी पत्रकार सचिन तोग्गी, संजीव आलुरे, दयानंद काळुंके, चंद्रकांत हगलगुंडे, अजय अणदूरकर यांनी परिश्रम घेतले तर कार्यक्रमास दीपक आलुरे, करबसपा धमुरे, आप्पू जेवळे, श्रीमंत मुळे, महादेव मुळे, अरविंद घोडके, डॉ. चिंचोले, धनराज मुळे, आप्पू धमुरे, युवराज करपे आदी मान्यवरांसह जळकोट, नळदुर्ग, इटकळ, अणदूर येथील पत्रकार, महिला, ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.




**माजी मंत्री चव्हाण, कुलकर्णी, नरे, घोडके यांचा सन्मान**

यावेळी अणदूर चे दीपस्तंभ, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबुराव कुलकर्णी, नीलकंठ नरे, बाबुराव घोडके या ९० वर्षावरील ज्येष्ठांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पत्रकार चंद्रकांत हगलगुंडे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल तर सचिन तोग्गी यांची व्हॉइस ऑफ मीडियाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

# रमाई आवास योजनेच्या निधीसाठी नगरसेवक नाना साठे करणार उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १४ जानेवारी-**

रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना निधीसाठी विलंब होत असल्याने सत्ताधारी साठे गटाचे माढा नगरपंचायतीचे पाणीपुरवठा सभापती नितीन साठे हे २६ जानेवारी रोजी सोलापूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवशी लक्षणिक उपोषणास बसणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात असे म्हटले आहे की माढा नगरपंचायती कडुन माढा शहरात नवबौध्द घटाकांसाठी रमाई आवास योजनेची अंमबजावणी सुरु असुन या योजनेच्या अंतर्गत माढा नगरपंचायतीने घरकुल मंजुर



३२९ लाभार्थ्यांना रीतसर परवाना वाटप करणेचे काम केलेले आहे.

बांधकाम परवाना वाटप झालेल्या लाभार्थ्यांच्या घराचे काम हे जोथा लेव्हल तसचे काही लाभार्थींनी त्यांच्या घराचे काम लेंटल लेव्हल पर्यंत पुर्ण केलेले आहे. माढा नगरपंचायतीस आज अखेरपर्यंत ५ कोटी ५४ लाख ५४ हजार इतका निधी प्राप्त झालेला आहे. परंतु रमाई आवास योजने अंतर्गत उर्वरित ३ कोटी ९ लाख ८ हजार ५०० इतका निधी माढा नगरपंचायतीस उपलब्ध करुन मिळावा. परंतु सदर योजनेची हप्ता वितरित करणे करिता नगरपंचायतीस निधी अप्राप्त आहे. यामुळे लाभार्थ्यांना घरकुलाचे बांधकाम पूर्ण करताना अडचणी येत आहे. तरी सदर निधी उपलब्ध करुन मिळाला नाही. निधी उपलब्ध न झाल्यामुळे मी दिनांक २६जानेवारी२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे एक दिवसीय लाक्षणिक उपोषणास बसणार आहे. तरी वरील बाबींचा विचार करुन माढा नगरपंचायतीस निधी तात्काळ उपलब्ध करुन मिळावा ही विनंती केली आहे.

## मंगळवेढ्यात मकर संक्रांत उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१४ जानेवारी-**

मंगळवेढाशहर ग्रामीण भागात मकर संक्रातीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान संक्रातीनिमित्त महिलांनी दामाजी पंतांच्या मंदिरामध्ये दर्शनासाठी तसेच दामाजी साखर कारखाना ऊस तोड महिला मजुरांनी गर्दी केली होती.

सुहासिनी महिलांनी पारंपरिक पेहराव करून ओवसण्यासाठी दामाजी मंदिरामध्ये सकाळपासून रात्री उशिरापर्यंत गर्दी केली होती. महिलांनी एकमेकांना हळदी कुंकू लावून भेटवस्तू दिल्या. दरम्यान मकर संक्रांतीनिमित्त मित्र,मैत्रिणी, आप्त नातेवाईक, कुटुंबातील ज्येष्ठ मंडळी यांनी तिळगुळ देऊन शुभार्शीवाद दिले.



# मोट्याळ येथे गुरुवारपासून हजरत पीर दावल मलिक यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१४ जानेवारी-**

तालुक्यातील मोट्याळ येथील हजरत पिर दावल मलिक यात्रेला गुरवारी १६ जानेवारीपासून सुरवात होणार असून सलग तीन दिवस विवध धार्मिक सामाजिक कार्यक्रम होणार आहे.

हजरत पिर दावल मलिक यात्रा ही गावातील हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र मिळून मिसळून साजरा करतात.गुरुवार दि.१६ रोजी गावातील हजरत पिर दावल मलिक देवाची मिरवणूक व गंध चडवण्याचा कार्यक्रम.शुक्रवार १७ रोजी देवाला नैवद व महाप्रसादाचा कार्यक्रम होणार असून शनिवार १८ रोजी सकाळी देवाची जियारत कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. भाविक भक्तानी या सर्व कार्यक्रम चा लाभ घ्यावा अशी आव्हान दावल मलिक यात्रा कमिटी व गावकरी मंडळ मोट्याळ यांच्या वतीने करण्यात आली आहे.

# अल्पवीन मुलीचा ५० वर्षीय इसमाकडून विनयभंग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जानेवारी-**

लहान मुलीला मोटार सायकल वरुन ट्युशन क्लासला सोडण्यास जात असताना एका ५० वर्षीय इसमाने एका ८ वर्षीय बालिकेचा एका निर्मन्युष ठिकाणी नेऊन तिचा विनयभंग केल्याची घटना पंढरपूर तालुक्यातील एका गावात शुक्रवारी घडली आहे.

पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहीतीप्रमाणे, पंढरपूर तालुक्यतील एक अल्पवयीन मुलगी ट्युशन क्लासला जात होती. यावेळी एका ५० वर्षीय इसमाने क्लासला सोडण्याच्या बहाण्याने एका निर्मन्युष ठिकाणी नेऊन त्या मुलीचा विनयभंग होईल असे कृत केले. त्याचबरोबर पिडीत मुलीला तु घरी काही सांगु नकोस अशी धमकी देखील दिली आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्ती विरुध्द पिडीत मुलीच्या पालकांनी फिर्याद दिली आहे. भा.न्या.सं. कलम ६४(२)(१), ६५(२)७४, ७५, ७९, ३५१(२) बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनिय २०१२ चे कलम ४,६,८,१०,१२ प्रमाणे रविवारी (ता.१२) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायाधीशाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# जिजाऊ गुरुकुलने सादर केली भारतीय संस्कृतीची झलक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

जिजाऊ गुरुकुल, खांडवी येथे उत्साहपूर्ण वातावरणात वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीची झलक दाखवली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अंकुश चव्हाण माजी असिस्टंट कमिशनर, नवोदय विद्यालय समिती, पुणे, रावसाहेब मिरगणे शिक्षण उपनिरीक्षक, पुणे, संतोषकाका ठोंबरे अध्यक्ष, मातृभूमी प्रतिष्ठान, बार्शी, डॉ. संदीप तांबारे सीईओ, आयुष व्यसनमुक्ती व संशोधन केंद्र, जामगाव, मधुकर डोईफोडे रवी क्लासेस, बार्शी आणि सोलापूर जिल्हा आटपट्यांचे अध्यक्ष बाबासाहेब कापसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाटक, पोवाडा व भारुड यांच्याद्वारे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवून झाली. त्यांनी समाजोपयोगी संदेश देत उपस्थितांचे मन जिंकले.

क्रीडाक्षेत्रातील यशस्वी विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. राष्ट्रीय खेळाडू कु. राजनंदिनी घोलप व कु. श्रेया जाधव तसेच नुकत्याच राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या खेळाडूंना गौरविण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. संभाजी घाडगे, सचिव वर्षाताई घाडगे, प्राचार्य संदेश कदम, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, फिजिकल कोच ज्योतीराम शिंदे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल शिरसागर आणि शिवाजी माने यांनी केले. स्नेहसंमेलनाने गुरुकुलच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांची दैदिप्यमान झलक सादर केली.



# संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फाशी देण्याची करमाळ्यात मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १४ जानेवारी-**

संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळाला पाहिजे, मारेकऱ्यांना फाशी द्यावी, म्हणून बहुजन संघर्ष सेनेने करमाळा तहसील कार्यालयासमोर निदर्शने आंदोलन केले.

जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी घोषणा देत तहसील कचेरीचा परिसर दणाणून सोडला. यावेळी राजाभाऊ कदम, वाघमोडे, शहाजी झिंजाडे, विनोद गरड, हनुमंत खरात, सरपंच विनोद सरडे, सरपंच सतीश ओहोळ, सरपंच अविनाश मोरे, संदीप मार्कड, भीमराव घाडगे, शहराध्यक्ष आजिनाथ कांबळे, शहर सचिव कालिदास कांबळे, तालुकाध्यक्ष अंगद लांडगे, ॲड. राहुल कांबळे, विनोद गरड, दत्ता राक्षे, अतुल राक्षे, अधिक शिंदे, लालमन भोई, दिगंबर हजारे, अतुल चव्हाण, शुक्राचार्य ठोसर, राहुल खरात, प्रेमाचंद कांबळे, नामदेव पालवे, अर्जुन भोसले, महादेव कडाळे, मनोज कांबळे, महावीर अत्रे, शिवाजी गायकवाड, प्रशांत गरड, प्रवीण कांबळे, प्रवीण सुरवसे, शत्रुघ्न सरोदे, कैलास सरोदे, हरिश्चंद्र भोसले, बाळू परदेशी, दादा भोसले, महेश भोसले, हरिशन्द्र भोसले, जितेंद्र लांडगे, सतीश कांबळे, बुद्धभूषण कांबळे, राहुल खरात, शेखर गाडे, आबा कदम, कैलास कदम आदी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.




# जिजाऊ जयंतीनिमित्त कुंभेज येथे १०२ जणांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १४ जानेवारी-**

करमाळा तालुक्यातील कुंभेजफाटा येथे शिवस्फूर्ती समूहातर्फे माँसाहेब जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या शिबिरात १०२ जणांनी रक्तदान केले. कमलाभवानी ब्लड बँकेने रक्त संकलन केले. श्वेता शिवाजी पवार व पल्लवी कुमार कादगे यांनी जिजाऊंची वेषभूषा साकारली होती.

ऋषीकेश भोसले याने शिव गारद दिली. यावेळी शितलकुमार मोटे, फुटबॉलमधील सुवर्ण पदक विजेता वेदांत आप्पासाहेब काटे, श्रीराम भोसले यांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हाध्यक्ष अनिल कादगे यांच्या पुढाकारातून हे उपक्रम राबविण्यात आले. अनिल कादगे, पठाडे, सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष अक्रुर शिंदे, मेजर बिभिषण कन्हेरे, मेजर सुरेश आदलिंग, मेजर सुभाष मुटके, मेजर भारत कादगे, सुनिल सावंत, प्रविण भोसले, पक्षीमित्र कल्याणराव साळुंके, रेखा साळुंके, डॉ. राजेंद्र शिंदे, परमेश्वर कादगे, गणेश शिंदे, अमोल मुटके, आण्णासाहेब भोसले, उपसरपंच संजय तोरमल, युवराज भोसले, विनोद कादगे, कुमार कादगे, रवी काटे, ब्लड बँकेचे निलेश पाटील, भारत पवार, महावीर भोसले, संभाजी भोसले, किरण शिंदे, वैभव साळुंके, संतोष महाराज, श्रीराम शिंदे, सुदेश माने उपस्थित होते.



# चित्रकार रत्नदिप बारबोले यांना दादासाहेब फाळके मोटिव्हेशनल पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १४ जानेवारी-**

भगत मीडिया तर्फे दिला जाणारा दादासाहेब फाळके प्रेरणादायी पुरस्कार २०२५ हा पुरस्कार दारफळ सिना येथील जगप्रसिद्ध चित्रकार रत्नदिप बळीराम बारबोले यांना जाहीर झाला आहे.

या पुरस्कारांमार्फत समाजातील विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींचा गौरव सोहळा १९ जानेवारी २०२५ रोजी अंधेरी- मुंबई येथे संपन्न होणार आहे.

या पुरस्काराचे हे दुसरे पर्व असून विविध क्षेत्रांतील लौकिकप्राप्त व्यक्ती, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, इत्यादी विविध क्षेत्रांत कार्यशील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान भगत मिडिया ने आयोजित केलेला आहे.हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा १९ जानेवारी रोजी अंधेरी येथे आयोजला आहे. शाल, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि रोख रक्कम देऊन या महासोहळ्यात बारबोले यांचा गौरव करण्यात येणार आहे. चित्रकार बारबोले यांना कला क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल हा पुरस्कार जाहीर झाला आहे. भगत मीडियाने निवड पत्राद्वारे ही माहिती दिली आहे. बारबोले यांना या अगोदर अनेक आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्य स्तरावरील अनेक नामांकित पुरस्कार मिळाले आहेत.लंडन, रशिया, दुबई अमेरिका अशा अनेक देशांत त्यांची कलाकृती विकल्या जातात. ग्रामीण भागात राहून आंतरराष्ट्रीय पातळीवर यश मिळवत बारबोले यांनी आपल्या कलेची छाप सोडली आहे.



> कोणतं ही काम प्रामाणिकपणे आणि सातत्य ठेऊन केलं की त्या कामाची दखल अनेकजण घेत असतात. गेले सतरा वर्ष झालं या कला क्षेत्रात मी सातत्याने काम करत आहे अनेक अडचणी आणि संघर्षमय प्रवास करत आज यशस्वी झालो आहे. कला क्षेत्र खूप मोठं आहे अजून खूप मोठं काम करायचं आहे.
>
> **- रत्नदीप बारबोले, चित्रकार**

## संक्षिप्त वृत्त



### सांगोला महाविद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**सांगोला, दि. १४ जानेवारी-**

सांगोला महाविद्यालयामध्ये राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भासले यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. भारत हा युवकांचा देश आहे. युवकांच्या कर्तृत्वावर तो महासत्ता होऊ पाहत आहे. युवकांच्या भवितव्यासाठी स्वतंत्र धोरण निश्चित करण्याची गरज आहे. छत्रपती शिवरायांच्या जडणघडणीत जिजाऊ माँसाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. स्वातंत्र्याची संकल्पना आणि रयतेच्या स्वराज्याची स्वप्ने शिवरायांच्या मनात पेरण्याचे आणि साकार करण्याचे काम जिजाऊ माँसाहेबांनी केले आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा इतिहासच बदलला आहे असे विचार डॉ.सुरेश भासले यांनी व्यक्त केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अमोल पवार, सुनिल शिंदे, आसबे यांनी परिश्रम घेतले.

### कोर्सेगाव जि. प. शाळेत बाल आनंद बाजार

**अक्कलकोट, दि. १४ जानेवारी-**

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर व्यावहारिक ज्ञान मिळावे, तसेच खरेदी-विक्री कशी करावी, संवाद कौशल्य कसे वाढवावे, यासाठी तालुक्यातील कोर्सेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद बाजार उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती शिक्षक यादवाड व जावीर यांनी दिला. या बाजाराला पालकांसह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमा पूजन व शिवलिंगप्पा अरवत, अप्पू भिंगे यांच्या हस्ते फीत कापून झाली. या कार्यक्रमाला उपसभापती रामचंद्र अरवत यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या, फळे, स्टेशनरी वस्तू यांची विक्री केली. तसेच भेळ, पाणीपुरी, वडापाव यांचेही स्टॉल लावण्यात आले होते. परिसरातील नागरिकांनी हजेरी लावत विद्यार्थी यांचा माल खरेदी केल्याने मुलांचे प्रोत्साहन वाढवले. पालकांनीही खरेदीसाठी गर्दी केली होती. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमासाठी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवी पोतदार आदींनी परिश्रम घेतले.





### सरपंच संसदेच्या संघटकपदी कलकुटगे

**अक्कलकोट, दि. १४ जानेवारी-**


महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय सरपंच संसदेचेच्या अक्कलकोट तालुका संघटकपदी पालापूरचे माजी सरपंच शेक्कप्पा कलकुटगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय सरपंच संसद प्रमुख समन्वयक योगेश पाटील आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेचे कुलगुरू, डॉ. रविकुमार चिटणीस यांनी ही नियुक्ती केली आहे. ग्रामविकासाचे राष्ट्रीय स्तरावरील हे महत्वपूर्ण अभियान यशस्वीरित्या विस्तारीत करण्यासाठी सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान देण्यासाठी पंचायतराज व्यवस्थेतील लोकनियुक्त लोकप्रतिनिधींची भूमिका मांडण्याचे सर्वात महत्वाची सोय आहे. देशाच्या पंचायतराज व्यवस्थेतील सर्व लोकप्रतिनिधींचे अराजकीय स्वरूपात सूसंघटन करणे, त्यांचे सर्वांगणी प्रबोधन करणे व विविध उपक्रमांचे अभ्यासपूर्वक संयोजन करण्यात येणार आहे.



### बार्शीच्या रेश्मा पठाण यांचा उत्कृष्ट महिला अधिकारी म्हणून गौरव

**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

बार्शी पंचायत समिती येथे महिला बाल कल्याण विभागाच्या प्रकल्प अधिकारी या पदावर कार्यरत असलेल्या रेश्मा पठाण यांच्या कार्याची दाखल घेऊन उत्कृष्ट महिला अधिकारी म्हणून गौरव करण्यात आला. स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त मराठा सेवा संघ शाखा जिल्हा परिषद सोलापूर आयोजित, सावित्रीच्या लेकी सन्मान कार्यक्रमात रेश्मा पठाण यांचा उत्कृष्ट महिला अधिकारी म्हणून तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व विद्यमान जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर, दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले.



### धोंडप्पा नंदे यांना पत्रकारिता पुरस्कार प्रदान

**अक्कलकोट, दि. १४ जानेवारी-**

कुरनूर येथील राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानतर्फे राजमाता जिजाऊ जन्मसोहळ्यात उत्कृष्ट ग्रामीण पत्रकारितग पुरस्कार धोंडप्पा नंदे यांना देण्यात आला. सरपंच व्यंकट मोरे यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी सरपंच व्यंकट मोहन मोरे, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण शिंगटे, एसएस ग्रँड पावरचे मालक केदार मोरे, समाधान मोरे, दिगंबर जगताप, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विश्वजीत भैया बिराजदार, प्रतिष्ठानचे सदस्य, डॉ. अमोगसिद्ध चेंडके उपस्थित होते.

# माजी महापौर महेश कोठे यांचे निधन

## सोलापूरच्या राजकारणावर मोठा प्रभाव असलेला दिग्गज नेता हरपला

### आज सकाळी ११ वाजता सोलापुरात अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

माजी महापौर महेश विष्णुपंत कोठे (वय ५९ वर्षे) यांचे आज सकाळी सहाच्या सुमारास प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यात स्नान करत असताना हृदयक्रिया बंद पडून निधन झाले. सोलापुरात आज बुधवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सोलापूरच्या राजकारणावर मोठा प्रभाव असलेल्या दिग्गज नेत्याचे अचानक निधन झाल्याने सोलापुरात हळहळ व्यक्त होत आहे. सोलापूरकरांना या बातमीने धक्का बसला आहे.

दरम्यान, हे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील लोकांनी त्यांच्या मोरारजी पेठ येथील राधाश्री निवासस्थानाजवळ गर्दी केली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुली, मुलगा माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, पुतणे आ. देवेंद्र कोठे, डॉ.सूर्यप्रकाश कोठे, दोन पुतण्या, जावई, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. महेश कोठे यांच्या निकटवर्ती यांनी दिलेल्या माहितीनुसार ते चार दिवसांपूर्वी आपल्या काही मित्रांसह महाकुंभमेळ्यात पवित्र स्नानासाठी प्रयागराज येथे गेले होते. काल त्यांनी स्नान आणि अन्य धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला. बरोबर गेलेले काही मित्र कालच परतले. महेश कोठे एका मित्रासह आणखी दोन दिवस धार्मिक कार्यासाठी तेथे थांबले होते.

आज पहाटे लवकरच ते प्रयागराज येथे नदीवर स्नानासाठी पोहोचले. महेश कोठे पाण्यात उतरले आणि काही वेळातच तिथे त्यांना त्रास होऊ लागला. ते खाली कोसळले सोबत असलेल्या मित्रांनी तातडीने त्यांना इतरांच्या मदतीने उचलून बाहेर आणले. ॲम्बुलन्सने त्यांना नजीकच्या रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना तपासून निधन झाल्याचे घोषित केले. महेश कोठे यांना काही वर्षांपूर्वी हृदयविकाराचा त्रास झाला होता. त्यांची सर्जरीही झाली होती. यानंतर अलीकडच्या काळातही त्यांना हृदयविकाराचा त्रास झाला होता. यानंतरही त्यांच्यावर उपचार झाले होते. विश्रांती घ्या, असा सल्ला कुटुंबीयांचा असतानाही, बरं वाटत असल्याने आपण या धार्मिक कार्यासाठी जात आहोत, असे महेश कोठे यांनी कुटुंबीयांना सांगितले होते. काँग्रेसच्या राजकारणात वाढलेले महेश कोठे यांना राजकारणाचे बाळकडू सुशीलकुमार शिंदे, विष्णुपंत कोठे आणि अन्य मंडळींकडून मिळाले. अनेक वर्ष त्यांनी सुशीलकुमार शिंदे यांचे कट्टर समर्थक म्हणून स्थानिक राजकारणात काम केले. इतर पक्षातील नेत्यांबरोबरच त्यांचा स्नेहपूर्ण संबंध होता.



### असा आहे राजकीय प्रवास

विडी घरकुल परिसरातून ते तब्बल ६ वेळा सोलापूर महानगरपालिकेवर निवडून आले. १९९२ साली ते प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्याच कालावधीत १९९४-९५ या कार्यकाळात ते सोलापूरचे महापौर होते. सर्वात तरुण महापौर म्हणून त्यांची ख्याती होती. महापालिकेच्या प्रशासनावर आणि राजकारणावर त्यांचा बरीच वर्ष अंकुश होता. या कालावधीत अनेक प्रशासकीय कठोर निर्णय त्यांनी घेतले. २००९ मध्ये त्यांनी शहर उत्तर मधून निवडणूक लढवली. यात ते पराभूत झाले. यानंतर पुन्हा ते २०१४ मध्ये शिवसेनेकडून त्यांनी शहर मध्य मधून प्रणिती शिंदे यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. त्यात त्यांना यश मिळाले नाही. यानंतर २०१९ मध्ये अपक्ष म्हणून शहर उत्तर मध्ये निवडणूक लढली त्यातही अपयश आले होते. दरम्यान, सन २०२४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने त्यांनी सोलापूर शहर उत्तरमधून निवडणूक लढवली. या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. या निवडणुकीतील पराभवानंतर आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून त्यांनी सुरू झालेल्या तयारीत सहभाग नोंदवला. सोलापूरची चौफेर प्रगती व्हावी येथील तरुणांना सोलापुरातच रोजगार उत्पन्न व्हावा या दृष्टीने ते प्रयत्नशील होते. राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या सहकार्याने त्यांनी सोलापुरात स्वतःच्या जागेवर आयटी पार्क सुरू करण्याची मुहूर्तमेढ रोवली होती. भूमिपूजनही झाले होते. सोलापूरच्या राजकारणावर त्यांची छाप आणि प्रभाव होता. महापालिकेत त्यांना मानणारा एक प्रबळ नगरसेवक गट होता. कधी भाजप, कधी राष्ट्रवादी तर कधी शिवसेना आणि काँग्रेस असा त्यांचा राजकीय संपर्क असे. पद्मशाली समाजाचे ते सोलापुरातील ज्येष्ठ नेते होते. अखिल भारतीय पद्मशाली समाज, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली समाज येथेही त्यांनी पदाधिकारी म्हणून काम केले. सोलापूर पद्मशाली ज्ञाती संस्थेचे ते अनेक वर्ष अध्यक्ष होते.

### जुना पुणे नाका स्मशानभूभित अंत्यसंस्कार

माजी महापौर महेश कोठे यांचे पार्थिव आज रात्री उशिरा प्रयागराजहून सोलापुरात आणले जात आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या बुधवारी सकाळी ११ वाजता सोलापुरातील जुना पुणे नाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. तत्पूर्वी बुधवारी सकाळी त्यांच्या पार्थिवाचे मोरारजी पेठ येथील राधाश्री या निवासस्थानी व विडी घरकुल शिंदे प्रशालेत अंत्यदर्शन घेता येणार आहे.

### आमचा आधारवड कोसळला

आमच्या कोठे कुटुंबातील तात्या यांच्या नंतरचे आमचे मोठे आधार महेश काका होते. आज आमचा हा आधारवड कोसळला आहे. त्यांचा पार्थिव ॲम्बुलन्सने सोलापुरात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, आमदार प्रणिती शिंदे यांनीही हे वृत्त समजतात कोठे कुटुंबीयांशी दूरध्वनीवर संपर्क साधून सांत्वन केले आहे.

**- देवेंद्र कोठे, आमदार, सोलापूर**

### संयमी व मितभाषी असणारे अण्णा सर्वस्तरात प्रसिद्ध

पहिल्यापासूनच अभ्यासू संयमी व मितभाषी असणारे महेश अण्णा सर्वांच्या मनामनात होते. राजकीय नातेसंबंध सांभाळून अनेकांशी त्यांचा जवळचा ऋणानुबंध होता. विविध शैक्षणिक संस्था उभारण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला होता. आयटी पार्क सोलापुरात आणण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प देखील त्यांनी उराशी बाळगला होता. सोलापूर महापालिकेत महेश अण्णा यांचा दबदबा कायम होता. कोठे बोले महापालिका हाले असे चित्र वारंवार दिसून आले आहे. आपले वडील स्वर्गीय विष्णुपंत तात्या कोठे यांच्या तालमीत तयार झालेले महेश अण्णा सोलापूरच्या राजकीय वर्तुळात प्रसिद्ध होते. त्यांच्या या अकाली जाण्याने राजकीय, सामाजिक व शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात दुफळी निर्माण झाली आहे; ती कधीही न भरून येण्यासारखी आहे.

### सोलापूरच्या राजकारणात मोठी पोकळी

विधानसभा निवडणूक काळातच त्यांना हार्टचा त्रास होत असतानाही कायम हसतमुख राहून त्यांनी निवडणूक लढविली होती. पराभवानंतरही ते डगमगले नव्हते. त्यांच्या जाण्याने शहरातील राजकारणात भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. माझ्या वडिलांसह मी स्वतःही त्यांच्याबरोबर राजकारणात काम केले आहे. त्यांनी कधीही राजकारणात कोणावरही टीका केली नाही. यामुळे सर्वच पक्षातील नेत्यांबरोबर त्यांचे चांगले संबंध होते. अशा या नेत्याच्या जाण्याचे दुःख वाटते.

**-प्रणिती शिंदे, खासदार**

### सुख-दुःखात साथ देणारा मित्र हरपला

अण्णा गेले यावर विश्वास बसत नाही. तात्यासाहेब कोठे यांच्यासोबत महेशअण्णांनीही अनेक वर्षे काँग्रेस पक्षात होते. कोठे कुटुंबीयांच्या कठीण प्रसंगी आम्ही त्यांच्यासोबत आहोत.

**-चेतन नरोटे, शहराध्यक्ष, काँग्रेस कमिटी**

### सोलापुरातील रोजगाराची इच्छा अपूर्ण

महेशअण्णांच्या जाण्याने सोलापूरकरांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांनी महापौर, पक्षनेते, विरोधी पक्षनेते अशा पदांवर काम केले. ड्रेनेजलाईन, पाणीपुरवठा आदींवर त्यांनी भरपूर काम केले. शहरात मोठे उद्योगधंदे यावेत, आयटी पार्क, गारमेंट पार्क व्हावा, अशी त्यांची मोठे अपेक्षा होती. मात्र त्यांचे आयटी पार्कचे स्वप्न अधुरे राहिले. सोलापूरच्या मुलांना सोलापुरातच रोजगार मिळावा, अशी त्यांची अपेक्षा होती.

**-सुरेश पाटील, माजी नगरसेवक**

### अनेक युवकांचे मार्गदर्शक गेल्याचं दुःख

महेश अण्णांनी आपल्या ३ दशकांच्या राजकीय प्रवासात अनेक युवकांना राजकीय प्रवाहात आणले आणि त्यांना नेतेही केले. त्यांच्यासोबत शिवसेना, काँग्रेसमध्ये काम करता आलं. विकासामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे.

**-अमोलबापू शिंदे, शिवसेना जिल्हाध्यक्ष**

### पद्मशाली समाजाचा नेता गेला

महेश कोठे यांनी शहरातील पद्शाली ज्ञाती संस्था आणि पद्मशाली शिक्षण संस्थेवर प्रत्येकी २ वर्षे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी समाजाला पुढे घेऊन जाण्याचे मोठे काम केले. महापालिकेत आम्ही सोबत मिळून काम केले. त्यांचा स्वभाव खेळीमेळीचा असल्याने त्यांच्याकडून विरोधी पक्षाच्या नेत्यांनाही नेहमी मान, आदर मिळायचा. त्यांच्या स्वभावामुळे विरोधी पक्षाचे नेते कधीही विकासकामात अडचण आणत नसायचे. सर्वच पक्षाच्या नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध होते.

**-पांडुरंग दिड्डी, भाजपा शहर सरचिटणीस**

### निधनाचे अत्यंत दुःख

विधानसभा निवडणुकीचा निकाल अनपेक्षित होता. त्या पराभवाला ते धीराने सामोरेच गेले नाहीत तर निकालाला आव्हान देण्याचे ठरविले. मुंबई उच्च न्यायालयात आम्ही त्यांची निवडणूक याचिका सात जानेवारीला दाखल केली. त्यादिवशी जवळपास पाच तास महेश कोठे यांचा सहवास लाभला.

**-ॲड. असीम सरोदे, वकील, उच्च न्यायालय**

### विकासकामांना नेहमीच मदत

१९७८ पासून स्व. विष्णूपंत तात्यांचे माझे राजकीय संबंध होते. कोठे हे महापौर असल्याने त्यांच्याकडे मी माझ्या वॉर्डातील विकासकामे घेऊन जायचो आणि ते करूनही द्यायचे. यानंतर १९९५ साली मी शहर मध्यमधून आमदार झालो. दिलदार नेत्यांच्या अचानक जाण्याने दुःख वाटत आहे.

**-कॉ. नरसय्या आडम, माजी आमदार**

### शहराचे मोठे नुकसान


महेशअण्णा कोठे एक अभ्यासू नेते होते. शहराचा भौगोलिक, सामाजिक अभ्यास असणारा नेता गेल्यामुळे शहराचे फार मोठ नुकसान झाले आहे. त्यांच्या निधनामुळे फार मोठी राजकीय पोकळी निर्माण झाली आहे.

**-नरेंद्र काळे, शहराध्यक्ष, भाजपा, सोलापूर**

## महेशअण्णांनी पाहिलेले आयटी पार्कचे स्वप्न पूर्ण व्हावे...

सोलापूरचे उच्च शिक्षित असंख्य युवक पुणे, मुंबई, हैदराबाद व इतर काही शहरात स्थलांतरीत होत असल्याची खंत महेश अण्णांना होती. यामुळेच गेल्या दशकापासून महेश अण्णांनी आयटी पार्कचे स्वप्न पाहिले होते. या आयटी पार्कची निर्मिती झाल्यावर सोलापुरातून इतर शहराकडे जाणाऱ्या उच्चशिक्षित युवकांचा लोंढा थांबेल, अशी त्यांना मोठी आशा होती. या आयटी पार्कच्या निर्मितीसाठी काहीवेळा त्यांनी बिनधास्तपणे पक्षांतरही केले, मात्र त्यांचे हे स्वप्न अधुरेच राहिले असून, या स्वप्नाची पूर्ती करण्यासाठी कोठे परिवार आणि सोलापूरच्या सर्वच लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करावेत, अशी जाणकार सोलापूरकरांची अपेक्षा आहे.

शिक्षण पूर्ण होताच...वडिल विष्णूपंत तात्या कोठे यांच्या पावलावर पाऊल टाकीत आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांचे मार्गदर्शन घेवून महेश कोठे यांनी त्यांचा राजकीय प्रवास सुरू केला होता. वडिलांचा सोलापूर शहर-जिल्ह्याच्या राजकारणात मोठा दबदबा असल्याने महेश अण्णांना राजकारणात महापौर व इतर पदांच्या संधी मिळत गेल्या. त्यांच्या उमेदीच्या काळात राज्यात अन् केंद्रातही काँग्रेसचीच सत्ता असल्याने सोलापूरच्या विकासकामाला शिंदेसाहेबांकडूनही भरभरून निधी मिळायचा. यामुळे महेश अण्णांनी अत्यंत कमी वयात सोलापूरचा भरभरून विकास करण्याचा प्रयत्न केला. राजकीय प्रवासातील दोन दशकात त्यांनी सोलापूरच्या विविध वॉर्डातील ड्रेनेजलाईन, पाणीपुरवठा लाईन, शहरातील पथदिवे, रस्ते आदींसह इतरही मुलभूत गरजांकडे लक्ष दिले होते. वडिलांची आणि शिंदेसाहेबांची मोठी साथ लाभल्याने अण्णांनी सोलापुरात धडाधड विकासकामे केली आणि महापालिकेत एक वेगळाच दबदबा निर्माण केला होता. याच काळात शिंदेसाहेबांनी आणि तात्यांनी शहर-जिल्ह्यात कायम बेरजेचे राजकारण केल्याने त्याचा मोठा फायदा महेश अण्णांना होत गेला आणि या संधीचं सोनंही अण्णांनी करून दाखविलं होतं.



तात्या स्वर्गवासी झाल्यानंतरही आपल्या स्व:कर्तत्वावर सोलापूरच्या राजकारणावर महेश अण्णांची एक वेगळी छाप आणि प्रभाव होता. महापालिकेत त्यांना मानणारा एक प्रबळ नगरसेवक गट होता. राज्यात अन् केंद्रात काँग्रेसची सत्ता गेल्यानंतर त्यांनी शहर विकासासाठी कधी भाजप-शिवसेना, कधी राष्ट्रवादी नेत्यांशी दोस्ती करीत पक्ष प्रवेशही मिळविला आणि यामुळेच त्यांचा राजकीय संपर्क वाढला होता. त्यांनी पक्षबदल केल्याने राज्यातील विविध पक्षाचे वरिष्ठ नेतेही कोठे यांना चांगलेच ओळखत होते. पद्मशाली समाजाचे ते सोलापुरातील ज्येष्ठ नेते होते. अखिल भारतीय पद्मशाली समाजाची त्यांनी २ वर्षे अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. पद्शाली शिक्षण संस्थेवरही त्यांनी अध्यक्ष म्हणून काही वर्षे काम पाहिले. या काळात समाजाला पुढे घेवून जाण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला. इतकेच नाहीतर पूर्व भागाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले होते.

स्व. महेश कोठे यांनी शहर मध्य आणि उत्तरमधून आमदारकीचीही निवडणूक लढविली होती. मात्र त्यांच्या या प्रयत्नाला यश आले नाही. या निवडणूक काळातही त्यांनी आयटी पार्क या विषयावरच जोर दिला होता. आयटी पार्कसाठी त्यांनी स्वतःची जागाही दिली होती; मात्र त्यांचे राजकीय वजन कमी पडल्याने त्यांचे आयटी पार्कचे स्वप्न अधुरेच राहिले आहे. सोलापूर शहरातील वाढत्या बेरोजगारीवर ते वारंवार पत्रकार बांधवांशीही बोलायचे. शहरात मोठे उद्योग आणावेत, शहरातील स्थलांतरीत होणाऱ्या युवकांचे लोंढे शहरातच थांबवावेत; यासाठी २ दशकांपासून त्यांचे प्रामाणिक प्रयत्न चालू होते. बड्या नेत्यांचे उंबरठेही त्यांनी यासाठी झिजवले होते. सोलापूरची चौफेर प्रगती व्हावी, येथील तरुणांना सोलापुरातच रोजगार उत्पन्न व्हावा यासाठी राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या सहकार्याने त्यांनी सोलापुरात स्वतःच्या जागेवर आयटी पार्क सुरू करण्याची मुहूर्तमेढ रोवली होती. भूमिपूजनही झाले होते. मात्र प्रयागराज येथे कुंभमेळ्यासाठी गेल्यानंतर महेशअण्णांचे मंगळवार, दि. १४ रोजी निधन झाल्याने त्यांचे हे आयटी पार्कचे स्वप्न अधुरे राहिले आहे. आता अण्णांचे हे आयटी पार्कचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे, कोठे परिवारातील इतर सदस्य आणि शहरातील लोकप्रतिनिधींनी परिश्रम घ्यावेत, अशी शहरातील जाणकार नागरिकांची अपेक्षा आहे.

**- अविनाश गायकवाड, सोलापूर**

# विडी घरकुलच्या विकासात महेश कोठेंचं योगदान

**सोलापूर शहरातील एक धुरंदर नेतृत्व, दूरदृष्टी आणि विकासात्मक नेता म्हणून परिचित असलेले आणि पद्मशाली समाजातील पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष म्हणून विराजमान असलेले आणि सर्वसामान्यांच्या मनातील लोकसेवक महेश विष्णुपंत तात्या कोठे यांचा अचानक एक्झिट काळजाला ठोका चुकवणारा आहे. महेश कोठे यांचं मंगळवारी प्रयागराज येथील महाकुंभ मेळाव्यात गंगा स्नान करताना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने निधन झाले आहे. महेश कोठे यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा थोडक्यात आढावा.**

शहरातील हद्दवाढ भागातील एका वार्डाचा नगरसेवक म्हणून नेतृत्व करीत असताना संपूर्ण सोलापुरातील राजकीय घडामोडीला आपले स्थान निश्चित केले. त्यांच्या कार्य कुशलतेमुळे स्थानिक राजकीय नेते तर सोडाच राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरच्या नेत्यांनाही त्यांचे महत्त्व कळलं होतं. सोलापूर शहरालगत असलेल्या विडी घरकुल ही श्रमजीवींची जेमतेम ३००० विडी घरकुल वसाहत. या वसाहतीतील त्यांचे प्रश्न सुटावे यासाठी त्यांनी १९९२ साली याच भागातून महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडणुकीसाठी उभे राहिले आणि भरघोस मताधिक्याने विजयी झाले. महेश कोठे हे त्यावेळी काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणुकीस उभे राहिले आणि विजयी झाले. महेश कोठे यांचे राजकीय गुरु असलेले आणि सोलापूरच्या राजकारणात भीष्म पितामहाची भूमिका बजावणारे स्वर्गीय विष्णुपंत तात्या कोठे यांचे राजकीय वारसा म्हणून राजकारणात उतरलेले ते पहिल्याच प्रयत्नात यशस्वी ठरले.

महेश कोठे यांना सोलापूरचे तरुण महापौर पद मिळण्याचा मान मिळाला. या महापौर पदाचं सोनं करण्याचा त्यांनी निश्चय करून महापौरपदाच्या कालावधीत शक्य तेवढा निधी विडी घरकुलच्या विकासासाठी आणला आणि पाहता पाहता विडी घरकुल मधील चित्र हळूहळू बदलत गेले. पालिकेत विरोधी पक्षाकडून त्यांच्या विकासात्मक कामाबाबत विरोध होत होता पण त्याची परवा न करता विडी घरकुल मधील नागरी समस्या, रस्ते ,दिवाबत्ती, पाणीपुरवठा आदी सोयी सुविधा सोडवण्यावर त्यांनी भर देत अनेक प्रश्न हळूहळू शून्यावर आणण्याचा प्रयत्न केला. कधीकाळी विडी घरकुल म्हटलं की, नागरिक नाक मुरडायचे पण महेश कोठे यांच्या दुरदृष्टीमुळे तेथील वस्तीला नव संजीवनी मिळाली. महेश कोठे यांच्या निर्णयामुळे या ठिकाणी अनेक गृहनिर्माण संस्था, नगरांची निर्मिती होत गेली. विडी घरकुलच्या तीन हजार घरकुलाव्यतिरिक्त आता या ठिकाणी जवळपास ५० ते ६० हजार वसाहतीतील गृहनिर्माण होऊन दीड ते दोन लाखांच्या आसपास लोक वस्ती आहे. आज शहराच्या सौंदर्यात भर घालत आहेत याचे श्रेय जातं ते महेश कोठे ना ..त्यांनी केलेल्या अनेक विकासात्मक कामाच्या जोरामुळे या ठिकाणी शाळा, हॉस्पिटल, भाजी मंडई, व्यायाम शाळा, समाज मंदिर, पाण्याच्या टाक्या, विद्युत महामंडळाचे उपकेंद्र, मंदिर, उद्यान, पोलीस चौकी आदी विकासात्मक काम मोठ्या कुशलतेने या ठिकाणी कार्यरत आहेत. महेश कोठे यांनी केलेल्या कामामुळे या वसाहतीतील कायापालटामुळे या ठिकाणी यशोदरा हॉस्पीटल सुरू झालं, श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय, सोलापूर महानगरपालिका दवाखाना सुरू होण्याच्या मार्गावर आहे. या ठिकाणी संभाजीराव शिंदे प्रशाला, महाविद्यालय, महर्षी राजश्री शाहू महाराज शाळा ,अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूल, संभाजीराव शिंदे उर्दू शाळा, राजेश कोठे इंग्लिश मीडियम स्कूल, दासरी प्राथमिक शाळा, श्रीमती जनाबाई जनार्दन बिटला प्रशाला, आयडॉल स्कूल, तेलगू शाळेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी विद्यार्जन घेत आहेत. अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन उच्चपदावर विराजमान आहेत.



या व्यतिरिक्त या भागातील जनतेला सुरक्षित आणि मुबलक पाणीपुरवठा व्हावा यासाठी घरकुल परिसरात बी ग्रुप येथे दोन पाण्याची टाकी तर जवाहर नगर येथे दोन पाण्याची टाकी निर्मिती केली. महेश कोठे हे आपल्या नगराचा विकास करतील, या आशेने विडी घरकुल नगराला लागूनच रंगराज नगर, श्री मार्कंडेय वसाहत, गोंधळी वस्ती, राजेश कोठे नगर, वसुंधरा सोसायटी, एम आयजी वसाहत, कोटा नगर ,तुळशांती नगर, क्षिरालिंग नगर, बागवान नगर ,ब्रम्हनाथ नगर ,सर्वोदय नगर, किसान नगर, मल्लिकार्जुन नगर प्रगती चौक, सोनिया नगर ,कल्पक सोसायटी,जवाहर नगर आदींची निर्मिती झाली. यातील बहुतांश नगरातील दिवाबत्ती, रस्ता ,पाणी हे प्रश्न मार्गी लागले काही नगरात अद्यापही ड्रेनेज लाईन वगळता सर्वच प्रश्न कोठेच्या पाठपुरामुळे संपुष्टात येत आहे. विडी घरकुल म्हटलं की, नागरिकांची पाहण्याची दृष्टी बदलण्यासाठी या भागातील डेव्हलपर सुरेश मिठ्ठाकोल, वेणुगोपाल कट्टा आणि एस. एस. शिंदे, शंकर चौगुले यांनी टोले जंग इमारती करून कायापालट करण्याचा निर्णय घेऊन तशी सृष्टी निर्माण केली. सध्या या भागात आल्यावर घरकुलचा पूर्णतः कायापालट पाहावयास मिळतो. परिसरातील सोना चांदी अपार्टमेंट, हिरामोती टॉवर, राघवेंद्र टॉवर्स, सुवर्ण कलश, राघवेंद्र प्लॅटिनम, वीर कोहिनूर, एसएस आयकॉन, रिद्धी सिद्धीचा टोलेजंग इमारती पाहिल्यावर एका नव्या सोलापुरात आल्याच्या दृष्टीस पडतंय. महेश कोठेंनी नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे प्राधान्याने लक्ष दिलं त्यानुसार त्यांनी कौशल्याबाई कोठे भाजी मंडईची निर्मिती केली तर त्याच्या जवळच विष्णुपंत तात्या कोठे यांच्या नावाने उद्यानाची निर्मिती केली. या भागातील नागरिकांचे आरोग्य उत्तम आणि सायंकाळच्या सुमारास आल्हाददायक वातावरणाचा आस्वाद मिळावा म्हणून यासाठी प्रयत्न केले. या व्यतिरिक्त महेश कोठेंनी एक सदस्य, व्दि सदस्य आणि चार सदस्य प्रभागाच्या निर्मितीनंतर आपल्या जवळच्या कार्यकर्त्यांना साथीला घेऊन संपूर्ण परिसरात विकासात्मक कामाची जणू गरुड झेप घेतली. एका प्रभागाचा नगरसेवक असूनही त्यांनी आमदार, खासदार आणि मंत्री यांच्या दिमती प्रमाणे काम केलं. महेश कोठेंनी म्हाडाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यानंतर विडी घरकुल मधील घरकुलधारकांचे व्याजाचे प्रश्न सोडवले तसेच या ठिकाणच्या विद्युत उपकेंद्राचे प्रश्न मार्गी लावले यासह अनेक प्रश्न त्यांनी आपल्या काळात पूर्ण केले. कोठे यांनी दिड वर्षापुर्वी देगाव रस्त्यावर सोलापुरातील युवकांसाठी आय टी पार्क उभारण्यासाठी भूमिपुजन केलं. त्यांचे प्रयत्न हयातीत पुर्णत्वास आलं नाहीत; आता भविष्यात हा प्रकल्प पूर्ण होईल का नाही? हा काळच सांगेल.

**-व्यंकटेश दोंता**




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# फ्लॅट परस्परच विकला; पनाशचे बिल्डर थेपडेंसह दोघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी -**
विजापूर रोडवरील पनाश अपार्टमेंटमधील फ्लॅट परस्परच विकून १२ लाख ६० हजारांची फसवणुक केल्याप्रकरणी पनाशचे बिल्डर थेपडे यांच्यासह दोघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जीबरान इक्बाल शिलेदार (वय ३९, रा. घर नं. ७४/१, देशकवाडी, रेल्वे लाईन, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पनाश लाईफ स्टाईल होम्स सोलापूरचे ओनर अमित थेपडे (रा. पुणे) आणि सेल्स मॅनेजर जावेद शेख (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विजापूर रोडवर अमित थेपडे यांचा पनाश लाईफ स्टाईल होम्स या नावाने गृह प्रकल्प सुरु आहे. या गृह प्रकल्पात जीबरान शिलेदार यांनी सन २०२२ मध्ये ए /२ बिल्डींग मधील फ्लॅट नं. ११०३ हा बुक केला होता. त्यासाठी शिलेदार यांनी थेपडे यांस १२ लाख ६० हजार रुपये रोख व चेकद्वारे दिले होते. पैसे दिल्यानंतरही थेपडे याने शिलेदार यांना त्यांच्या फ्लॅटचे खरेदीखत करून दिले नव्हते. थेपडे याने शिलेदार यांना सांगताच परस्पर त्यांचा फ्लॅट सन २०२४ मध्ये सोमा चटर्जी यांना विकून टाकून शिलेदार यांची १२ लाख ६० हजार रुपयांची फसवणुक केली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### चारचाकीच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी


**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**
सोलापूर ते तुळजापूर जात असताना चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी झाले. सुरज नागेश भाईकट्टी वय २३, रा. भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर) आणि जयश्री श्रीशैल देवनगाव (वय ४७, रा. इंदिरा नगर, कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. मंगळवारी सकाळी पावणे नऊच्या सुमारास सुरज भाईकट्टी व जयश्री देवनगाव हे दोघे सोलापूर येथून तुळजापूरकडे दुचाकीवरून डबलसीट जात होते. त्यावेळी तुळजापूरच्या अलीकडे असलेल्या काका ढाबाजवळ पाठीमागून येणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनाने दुचाकीस कट मारून गेल्याने दुचाकी स्लीप होऊन पडल्याने दोघेही जखमी झाले. जखमी अवस्थेत दोघांनाही नातेवाईक राजश्री यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### विषारी औषध प्राशन करून तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**
डिकसळ (ता. मोहोळ) येथे यावलीच्या तरूणाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. नामदेव विठ्ठल अंकुश (वय २७, रा. यावली) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्याचे नाव आहे. १४ जानेवारी डिसकळ येथे अज्ञात कारणावरून नामदेव अंकुश याने फवारणी करण्याचे विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. नामदेव यास त्रास होऊ लागल्यावर वडील विठ्ठल अंकुश यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### होम मैदानावरून २० हजारांचा मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**
होम मैदान येथील गड्डा यात्रेत बांगड्या खरेदी करणाऱ्या महिलेचा २० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. याबाबत अनिता रामेश्वर टुमणे (वय ४२, रा. चंद्रमौळी एमआयडीसी, मोहोळ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



१३ जानेवारी रोजी रात्री अनिता टुमणे या होम मैदान वरील गड्डा यात्रा फिरण्यासाठी आल्या होत्या. बांगड्या खरेदी करताना गर्दीचा फायदा घेत चोरट्याने अनिता टुमणे यांच्या पर्समधील २० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

### फॉरेस्ट भाजी मार्केटमधून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**
फॉरेस्ट भाजी मार्केटमधू चोरट्याने वृध्दाचा २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत शांतीकुमार मोहनलाल दोशी (वय ७०, रा. भवानी पेठ, बँक कॉलनीजवळ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ जानेवारी रोजी सायंकाळी शांतीकुमारा दोशी हे फॉरेस्ट भाजी मार्केट येथे भाजी खरेदीसाठी गेल्यानंतर त्यांनी त्यांची एमएच १३ एएम ८७५८ क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

### ज्ञानप्रबोधनी शाळेजवळून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**
शहरातील ज्ञानप्रबोधनी शाळेजवळून चोरट्यांनी २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. यावबात आंबण्णा काशिनाथ जित्ते (वय २२, रा. सादेपूर, पो. निंबर्गी, ता. दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ जानेवारी रोजी सकाळी आंबण्णा जित्ते यांनी त्यांची एमएच १३ बीटी ५२१३ क्रमांकाची दुचाकी ही ज्ञानप्रबोधनी शाळेजवळ हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार मुलाणी पुढील तपास करीत आहेत.





# मानाच्या नंदीध्वजांना करमुटगी लावून घातले स्नान


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**
ग्रामदैवत श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर महाराजांचा अक्षता सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा झाल्यानंतर यात्रेच्या तिसऱ्या दिवशी सिद्धेश्वर मंदिरात करमुटगी हा धार्मिक विधी धार्मिक रूढी परंपरेनुसार संपन्न झाला. सकाळी नऊ वाजता उत्तर कसब्यातील हिरेहब्बू मठातून मानाची पालखी व नंदीध्वज सिद्धेश्वर मंदिराकडे मार्गस्थ झाले. श्री सिध्देश्वर मंदिरात मानाचे सात ही नंदीध्वज दाखल झाल्यानंतर हिरेहब्बू व देशमूख यांच्या हस्ते पूजा होऊन संमती कट्ट्याजवळ येऊन थांबतात व तेथे आल्यानंतर प्रथम श्री शिवयोगी सिध्दरामेश्वरांच्या योगदंडास करमुटगी लावून त्या योगदंडास स्नान घालण्यात आला.

दरम्यान, पालखीतील श्रींच्या मुर्तीस करमुटगी लावून स्नान घालण्यात आली. यानंतर मानाच्या सात ही नंदीध्वजांना करमुटगी लावून श्री सिध्देश्वर तलावात स्नान घालण्यात आली. त्यांनतर मंदिरातील अमृत लिंगाजवळ हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते गंगा पुजनाचा धार्मिक विधी संपन्न झाला.

या विधीनंतर हिरेहब्बू यांनी देशमुखांना मानाचा विडा दिला. त्यानंतर गर्भ मंदिरातील श्री सिध्दरामेश्वरांच्या पादुकास करमुटगी लावून ते पादुका धुवून त्यानंतर हिरेहब्बू हे गदगीची (मूर्तीची) आरती केली. यावेळी मंदिरात भाविकांची श्रींचे दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी होती. याप्रसंगी मंदिर परिसरात अनामिक चैतन्य आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. याप्रसंगी यात्रा प्रमुख व पुजारी हिरेहब्बू बंधू, यात्रेचे मानकरी देशमुख, सात ही मानाच्या नंदीध्वजाचे मानकरी नंदीध्वजधारक आणि भाविक भक्त उपस्थित होते.

# होममैदानावर आज गुरु भेटीचा व्हिडिओ शो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**
ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेत बुधवारी रात्री आठ वाजता शिवयोगी सिद्धरामेश्वर आणि श्रीशैल मल्लिकार्जुन यांच्या भेटीच्या प्रसंगावर आधारित सोहळा गुरु भेटीचा या टुडी शोचे आयोजन करण्यात आले आहे.



बुधवार १५ जानेवारी रोजी होम मैदानावर परंपरेनुसार चालू असलेल्या शोभेच्या दारू कामाचे आतिषबाजी व प्रोजेक्टरद्वारे टु. डी. शोचे श्री सिद्धेश्वर देवस्थानच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. मागील तीन वर्षांपासून यात्रेनिमित्त सुरू करण्यात आलेल्या लेझर शोला भाविकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. यंदाच्या या टूडी शोमधून श्री मल्लिकार्जुन व श्री सिद्धरामेश्वर यांची श्रीशैल भेटीचा प्रसंग सोहळा गुरुभेटीचा दाखविला जाणार आहे. यासाठी श्रीशैल येथील कमरीकोळ या दरीचे दृश्य दाखविण्यासाठी सुमारे २२ फूट उंचीची श्री. मल्लिकार्जुन व श्री सिद्धरामेश्वरांची मूर्ती तयार करण्यात आली आहे व ही मूर्ती क्रिएटिव्ह आर्ट स्टुडिओचे उमेश व्हरकट यांनी तयार केलेली आहे. या शोमध्ये श्री सिद्धरामेश्वरांचा जन्म, श्री मल्लिकार्जुन यांच्या सगुण रूपाचे दर्शन घेण्यासाठी श्री सिद्धरामेश्वरांची श्रीशैल पदयात्रा, कमरीकोळळ येथून उडी टाकताना श्री सिद्धरामेश्वर व श्री मल्लिकार्जुन या गुरु-शिष्य भेटीचे दृश्य, श्री मल्लिकार्जुन व श्री सिद्धरामेश्वर यांची षोडशोपचार पूजा, यानंतर श्री सिद्धरामेश्वर वचन गायन, श्री सिद्धरामेश्वर आधारित भक्तीगीते, तद्नंतर श्री सिद्धरामेश्वरांनी सोन्नलगीला परतल्यानंतर केलेले धार्मिक, सामाजिक व अध्यात्मिक कार्य यामुळे सोन्नलगीचे अभिनव श्रीशैलमध्ये झालेले रूपांतर, श्री सिद्धरामेश्वरांची शिवयोगसमाधी व शेवटी श्री सिद्धरामेश्वरांची आरती या क्रमाने कार्यक्रमाचे स्वरूप आहे.

# गांजा घेऊन जाणाऱ्या तिघांना अटक

## ● फौजदार चावडी पोलिसांची कारवाई; ५,३७० ग्रॅम गांजा जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**
फौजदार चावडी पोलिसांनी सेवासदन शाळेच्या कंम्पौडलगत असलेल्या बोळातून गांजा घेऊन जाणाऱ्या तिघांना अटक केली. या कारवाईत पोलिसांनी ९६ हजार ६०० रुपये किंमतीचा ५,३७० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला.

अविनाश राहुल जाधव (वय १९, रा. नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर सध्या रा. सालीगांव, ताम्रावाडा, म्हापसा, नॉर्थ गोवा), सुजल सुधीर खरे (वय १९, रा. १३४, बुधवार पेठ, मिलींद नगर, सोलापूर), अजय आनंद देऊस्कर (वय २४, रा. ४१६, सालीगांव, ताम्रावाडा, म्हापसा, नॉर्थ गोवा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे पथक हे हद्दीमध्ये रात्रगस्त करीत असताना सेवासदन शाळेच्या कंम्पौडलगत असलेल्या बोळातून तीन व्यक्ती या पांढऱ्या रंगाच्या पिशव्यामध्ये काहीतरी घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी येऊन संशयास्पदरीत्या जाणाऱ्या तिघांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. त्यावेळी तिघांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावल्याने तिघांकडील पिशव्यांमधील साहित्याची तपासणी केली असता पिशव्यामध्ये गांजा असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना याची माहिती देऊन तिघांकडून ९६ हजार ६०० रुपये किंमतीचा ५३७० ग्रॅम



गांजा जप्त केला. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक आयुक्त प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक अरविंद माने, तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाली सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे, हवालदार अजय पाडवी, प्रविण चुंगे, पोलिस नाईक आयाज बागलकोटे, शिवानंद भिमदे, कृष्णा बडुरे, विनोद व्हटकर, विनोदकुमार पुजारी, शशिकांत दराडे, नितीन मोरे, अजय चव्हाण, अमोल खरटमल, सुधाकर माने, अतिश पाटील, अर्जुन गायकवाड, तोसीफ शेख, विनायक जाधव, पंकज घाडगे, सचिन लवटे, ज्ञानेश्वर गायकवाड यांनी केली.



सोलापूर : शहरात मंगळवारी सकाळी शहरातील विविध मंदिरात सुहासिनींनी वानवसा लुटला. लष्कर येथील राम मंदिरात टिपलेले छायाचित्र.

(छायाचित्र केवल तिवारी)

# संक्रांतीनिमत्त विविध मंदिरात हळदी-कुंकू कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**
शहरातील विविध मंदिरामध्ये मंगळवारी (ता.१४) मकरसंक्रांती निमित्त सुवासिनी महिलांची वाणवसा घेण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.

हिंदू धर्मामध्ये मकर संक्रांत सणाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. मकर संक्रांत या दिवशी सूर्याचे मकर राशीमध्ये संक्रमण होते. त्याच पार्श्वभमीवर मकर संक्रांत सणानिमित्त शहरातील विविध मंदिरात हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सुहासिनी महिलांनी खणाचे पूजन करून एकमेकींना वानवसा लुटला. सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील खणाची पूजा करून एकमेकींना सौभाग्याचे लेणे असणारे हळदी-कुंकू लावून हा वानवसा लुटला. यावेळी मंदिरात नवचैतन्याचे वातावरण पसरले होते.

# सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ जानेवारी-**
सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते व माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्थांचे संस्थापक स. म.शंकरराव मोहिते-पाटील यांच्या १०७ व्या जयंती निमित्त शिवरत्न बंगला येथील सहकार महर्षी यांच्या समाधी स मोहिते पाटील कुटुंबीयांकडून धार्मिक विधिवत पूजन करण्यात आले समाधीस्थळाचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्यासह विविध सहकारी व शिक्षण संस्थांचे पदाधिकारी, कामगार यांनी दर्शन घेवुन अभिवादन केले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या १०७ व्या जयंती निमित्त शंकरनगर अकलुज येथील सहकार महर्षी सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर स.म.शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुतळ्यास व्हा.चेअरमन शंकरराव माने देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करण्यात येवुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संचालिका स्वरुपाराणी मोहिते पाटील, कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांच्यासह सर्व आजी, माजी संचालक, सभासद, खातेप्रमुख, कामगार प्रतिनिधी व कामगार उपस्थित होते. विजयचौक येथील सहकार महर्षी यांच्या पुतळ्यास सौ देवन्या शिवतेजसिंह मोहिते पाटील



यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

विजयनगर विझोरी येथे शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघाच्या कार्यस्थळावर सहकार महर्षी यांच्या पुतळ्यास बँक ऑफ बडोदाचे रिजनल मॅनेजर संजीवन कुमार यांच्या हस्ते पुष्पहार ,पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी खा धैर्यशील मोहिते पाटील, व्हा. चेअरमन दत्तात्रय भिलारे, सर्व संचालक मंडळ, कार्य. संचालक रविराज इनामदार देशमुख यांच्यासह सर्व खातेप्रमुख, कामगार उपस्थित होते. अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील सहकार महर्षींच्या पुर्णाकृती पुतळ्यास बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपसभापती मामासाहेब पांढरे, सचिव राजेंद्र काकडे, मार्केट कमिटीतील व्यापारी गाळेधारक फळ विक्रेते हमाल, संचालक व कामगार उपस्थित होते.

सदाशिवनगर येथील श्री शंकर सहकारी साखर कारखाना येथील सहकार महर्षींच्या पूर्णाकृती पुतळ्यास व्हा. चेअरमन ॲड. मिलींद कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यावेळी कार्यकारी संचालक स्वरुप देशमुख, सेक्रेटरी रवीराज जगताप, संचालक मंडळ, अधिकारी व कामगार उपस्थित होते.

## ● माळशिरस तालुक्यातील विविध संस्था, संघटनांच्या वतीने विविध उपक्रम

### या संस्थांमध्ये साजरी झाली जयंती

तालुक्यात शिक्षण प्रसारक मंडळ, शिवरत्न शिक्षण संस्था, शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शिवशंकर बझार, शंकरराव मोहिते-पाटील बँक, सुमित्रा पतसंस्था, जयविजय पतसंस्था, शंकरराव मोहिते-पाटील पतसंस्था, रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील बीजोत्पादक संघ, विजयरत्न सहकारी संघ, अकलूज विकास सोसायटी, शंकरनगर विकास सोसायटी, वेळापूर विकास सोसायटी, महादेव देवालय देवस्थान ट्रस्ट, अकलूज नगरपरिषद, शंकरनगर ग्रामपंचायत आदींच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन सहकार महर्षींना अभिवादन करण्यात आले.

# मरिआई चौकात मारहाणीत तरुण जखमी

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**
अज्ञात कारणावरून मरिआई चौकात मारहाणीत तरूण जखमी झाला. जाकिर महेबुब शेख (वय ३२, रा. दमाणी नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे.

१३ जानेवारी रोजी रात्री मरिआई चौकाजवळील स्टार बझारसमोर भजी घेत असताना जाकीर शेख यास अज्ञात कारणावरून इक्बाल बाशा सय्यद व इतर एकाने लाकडाने व खराट्याने मारहाण करून जखमी केले. जाकीर यास आई रूकसाना यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# सराईत गुन्हेगार कासिम शेख दोन वर्षांसाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**
शहरातील फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील सराईत गुन्हेगार कासिम उर्फ सोहेल शेख यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.



तडीपारीनंतर कासिम शेख यास कर्नाटकात सोडण्यात आले आहे. कासिम उर्फ सोहेल शफिक शेख (वय २७, रा. ९२, पटेल किराणा दुकानाच्यासमोर, सिध्देश्वर पेठ, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. कासिम शेख याच्याविरुध्द सन २०१७, २०१९, २०२०, २०२२, २०२३ व २०२४ या कालावधीत पोलिस ठाण्यात जबरी चोरी करणे, घरफोडी करणे, गैरकायद्याची मंडळी जमवून दंगा करणे, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याच्याविरुध्द तडीपारीची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांच्याकडे फौजदार चावडी पोलिसांकडून पाठविण्यात आला होता. त्यास मंजुरी देत पोलिस उपायुक्त कबाडे यांनी कासिम शेख यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर कासिम शेख यास कर्नाटकात सोडण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १००३

**काय काशी करिती गंगा ।**
**भीतरीं चांगा नाहीं तो ।।**

बाह्य सौंदर्याकडे लक्ष देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पूर्वीच्या काळात व्यक्ति बाहेरुन किती सौंदर्यवान दिसतो यापेक्षा त्याचे आचार-विचार कसे आहेत, याकडे जास्त लक्ष दिले जात असे. पण आज व्यक्तीच्या आचार-विचारांपेक्षा त्याचे राहणीमान, सौंदर्य, शरीरयष्टी आदीकडे जास्त लक्ष दिले जात आहे. त्याचाच परिणाम फसवेगिरी, लुबाडणूक, चोऱ्या आदीची वाढ होण्यावर होत आहे. अशा बाह्यसौंदर्यी लोकांना इतरांना फसविण्यात आनंद वाटत असतो. स्वार्थ साधून मोकळे होण्याची एक प्रकारची संधीच यांना मिळते. अशा फसव्या लोकांना पवित्र अशा तीर्थक्षेत्रांना नेले किंवा काशी, गंगेचे स्नान घातले तरी त्यांच्यात कांही बदल होत नाही. अंतर्गत कुविचाराचे भांडार जोपासणाऱ्यांना बाहेरुन कितीही पवित्रतेचा सहवास दिला तरी त्यांच्या अंतर्गत विचारावर त्याचा परिणाम होत नाही. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**काय काशी करिती गंगा । भीतरीं चांगा नाहीं तो ।।**



शरीराच्या शुध्दतेपेक्षा मनाची शुध्दता अत्यंत महत्वाची असते हे यावरुन लक्षात येते. बाह्यसौंदर्यापेक्षा अंतर्गत सौंदर्य वाढविणे अत्यंत महत्वाचे असते. बाह्यसौंदर्य म्हणजे रंग, लिंग, उंची, शरीरयष्टी इत्यादी बाबी आपल्या हातातील नाहीत. ह्या निसर्गत: प्राप्त होणाऱ्या आहेत. मात्र अंतर्गत सौंदर्य म्हणजे आचार-विचार, वर्तन, सकारात्मक दृष्टी हया बाबी आपल्या हातातील आहेत. जे आपल्या हातात नाही, त्याला कृत्रिमरित्या सजवून मोठेपण मिळविण्यापेक्षा जे हाती आहे त्याचाच सदुपयोग करणे जास्त उचित असते. योगायोगाने निसर्गत: सौंदर्य प्राप्त झाले तरी त्याचा दुरुपयोग आपल्याकडून होता कामा नये. दिसायला कोण कसा आहे? यापेक्षा त्याचे वर्तन कसे आहे, हेच जास्त महत्वाचे आहे. अंतर्गत वर्तन, विचार कुप्रवृत्तीचे असणाऱ्यांना तीर्थक्षेत्रही कांही करु शकत नाहीत. ज्ञानेश्वर माऊलींनी अंतर्गत वर्तन, विचार चांगले असणाऱ्यांना चालते-बोलते तीर्थक्षेत्र म्हटले आहे. अर्थात, आपली सदवृत्ती हीच तीर्थक्षेत्र होऊ शकते. अशा सदवर्तनी माणसांमुळे तीर्थक्षेत्राच्या पावित्र्याला पुष्टी मिळते. तीर्थक्षेत्रापेक्षा मानसाने कर्मक्षेत्रावर जास्त भर दिला पाहिजे. कर्मक्षेत्रच जर योग्य नसेल तर तीर्थक्षेत्र कांहीच करु शकत नाही. उलट कर्मक्षेत्र जर उत्कृष्ट व चांगले असेल तर अशा कर्मक्षेत्री माणसाच्या सहवासाने तीर्थक्षेत्राची पवित्रता वाढू शकते. आपल्या वाट्याला आलेले कर्म निती-नियमाला अनुसरुन न करता तीर्थक्षेत्राच्या वाऱ्या करण्याला अर्थ नाही. कर्म हाच खरा ईश्वर असल्याने व कर्मातच खरी मानवता दडल्याने अपण कर्मावरच भर द्यायला हवा. येथे कर्म म्हणजे नशीब नसून कर्म म्हणजे कर्तव्य हा अर्थ विचारात घ्यावा. आपल्या देशाला बळकटी देण्यासाठी तीर्थक्षेत्रापेक्षा कर्मक्षेत्राचीच जास्त आवश्यकता आहे, हेही आपण याप्रसंगी लक्षात ठेवावे. ज्ञानोबा-तुकारामांचा कर्तव्यावर भर देणारा आदर्श आपणाला निश्चितच कर्मक्षेत्राला बळकटी देण्याचा मार्ग दाखविल असे वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार**
**दि. १५ जानेवारी २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - पौष**
**कृ. द्वितीया - (२७.२३)**
**ऋतु - शिशिर**
**नक्षत्र - पुष्य (१०.२७)**
**योग - प्रिती (२५.४५)**
**करण - तैतिल (१५.१७)**

**दिनविशेष - चांगला दिवस, सेना दिन, किंक्रांत, करिदिन**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना लाभदायक राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल. महिलांना सौख्याच्या घटना घडतील.

# क्षयरोग निर्मूलन जनजागृती रॅली

### टीबी हारेल - देश जिंकेलचा दिला नारा; महापालिका आरोग्य विभागाच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज यात्रा अक्षता सोहळ्याप्रसंगी या परिसरात महापालिका आरोग्य विभागाच्या अंतर्गत महापालिका शहर क्षयरोग केंद्राच्या वतीने क्षयरोग निर्मूलन जनजागृती रॅली काढण्यात आली.


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वाकांक्षी योजनेनुसार संपूर्ण भारत देशातून सन २०२५ अखेर पर्यंत क्षयरोगाला हददपार करण्याचे उददीष्ट आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मुक्त मोहिम, निक्षय शिबीरे आयोजीत करण्याची योजना केंद्रीय आरोग्य व कु.क.मंत्रालय यांनी तयार केली आहे.




दरम्यान, सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज यात्रा अक्षता सोहळ्याचे औचित्य साधून महापालिका शहर क्षयरोग केंद्र, मदर तेरेसा पॉलीक्लिनीक ते श्री सिध्देश्वर मंदिर संम्मती कटटा इथपर्यंत क्षयरोग जनजागृतीची लोगो छापलेले एक नाविण्यपूर्ण जॅकेट परिधान करुन श्री सिध्दरामेश्वरांचे चित्र व क्षयरोग विषयक जनजागृतीचे स्टीकर्स असलेले प्रतिकात्मक लहान नंदिध्वज घेऊन जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये श्री सिध्देश्वर महाराजांच्या जयघोषासोबत टीबी हारेल - देश जिंकेलचा नारा दिला. तसेच रॅली झाल्यावर श्री.सिध्देश्वर मंदिर संम्मती कटटा परिसरात क्षयरोग निर्मूलन विषयक घोषणा देण्यात आल्या. अक्षता सोहळयाला उपस्थित असलेल्या भाविकांना श्री सिध्दरामेश्वरांचे चित्र व क्षयरोग विषयक जनजागृतीचे स्टीकर्स असलेले प्रतिकात्मक लहान नंदिध्वज वाटप करण्यात आले. संमती कटटा परिसरात उपस्थित भाविकांना शहर क्षयरोग अधिकारी डॉ.अरुंधती हराळकर यांनी १०० दिवसीय क्षयरोग मुक्त मोहिमेची माहिती दिली. ही रॅली महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे व मनपा आरोग्याधिकारी डॉ.राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर, रोटरी क्लब सोलापूर नॉर्थच्या अध्यक्षा डॉ.जान्हवी माखीजा व शहर क्षयरोग केंद्राकडील सर्व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (२१)
### संघ शिक्षा वर्ग

संघ शिक्षा वर्ग नावाचे एक प्रशिक्षण शिबिर असते. इथे एकात्मतेच्या संस्काराला अधिक सुदृढ बनवतात. इथे मत, भाषा, आणि जातीपातीचा भेदभाव नसतो. इथे सर्वांचे सामूहिक जीवन भेदभाव रहित असते. संघ समाजाला एक जिवंत शरीररचना म्हणतो. समाज म्हणजे विराट पुरुष आणि जसे जिवंत शरीरातील सर्व अवयवांना एक दुसऱ्याशी स्नेहभाव जपावा लागतो तसेच समाज म्हणजे या विराट पुरुषाला भारत मातेच्या सर्व जाती धर्मातील व्यक्ती तसेच रहिवाशां सोबत बंधूभावाचे नाते जपावे लागते अट एकच तो रहिवासी भारत माते प्रति विशुद्ध निष्ठा ठेवणारा असावा. इथे शक्ती आणि अनुशासनाचे विराट प्रदर्शन असते. संपूर्ण राष्ट्र एक कुटुंब ही संकल्पना इथे प्रत्यक्ष अनुभवता येते. १९३९ साली पुण्याच्या संघ शिक्षा वर्गाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भेट दिली होती. तेव्हा त्यांनी डॉक्टरांना विचारले होते की शिबिरात अस्पृश्य पण आहेत का. त्यावर डॉक्टर म्हणाले शिबिरात कोणीही स्पृश्य नाही किंवा अस्पृश्य नाही. इथे फक्त हिंदू आहेत. कारण संघाच्या दृष्टीने हिंदू शब्द भारताच्या राष्ट्रीय स्वत्वाचा पर्याय आहे.

**क्रमश:**

# लोकमंगल महाविद्यालयात जिजाऊ, विवेकानंद जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.




या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. प्रास्ताविक विद्यार्थीनी तृप्ती जाधवर हिने केले. प्रारंभी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे विद्यार्थी तृप्ती जाधवर, दक्षता देशमुख, धम्मेश गवळी, अपुर्वा इरवाडकर, संगमित्रा शिंदे आदींनी आपल्या मनोगतातून स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचे महत्त्व पटवून दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांचे देशाच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान आहे. तसेच त्यांनी स्वामी विवेकानंदांचा त्यांच्या जीवनातील खडतर प्रवास सांगितला. आजच्या युवकांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करून स्वत:मध्ये परिवर्तन करणे आवश्यक आहे, असा सल्ला दिला. कार्यक्रमास प्रा. वर्षा माने देशमुख, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. अंकिता पवार उपस्थित होते. आभार विद्यार्थी रोहित ससाणे यांनी मानले.



## ओमसाई प्रतिष्ठानतर्फे अक्षता वाटप

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री. सिद्धरामेश्वर महाराज यांच्या अक्षता सोहळ्यानिमित्त ओमसाई प्रतिष्ठानच्या वतीने चार हजार भक्तांना अक्षता वाटप करण्यात आले. याप्रसंगी महावितरण सोलापूर शहर विभाग कार्यकारी अभियंता आशिष मेहता, नाशिक प्रशिक्षण केंद्राचे कार्यकारी अभियंता आर. सी.पाटील, औद्योगिक वसाहत कार्यालय शाखाधिकारी अजय चव्हाण, शुभराय टॉवर शाखाधिकारी उल्हास कानगुडे, श्रीकांत घाडगे, ओमसाई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विनोद कर्पेकर, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनिल काळे, अपरिचित सामाजिक संस्था संस्थापक अध्यक्ष मयूर गवते, रुपेश कर्पेकर, धर्मेंद्र कर्पेकर, शुभम कर्पेकर, सतिश म्हमाणे, राजाभाऊ राचुरे उपस्थित होते.

## पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज अभिवादन सभा

**विविध क्षेत्रातील ४० मान्यवरांचाही होणार गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त दलित पँथर सामाजिक संघटनेच्या वतीने बुधवार दि. १५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजता सोलापुरातील ऐश्वर्या हॉटेल येथे अभिवादन सभा होणार आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष डॉ. घन:श्याम भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी विविध क्षेत्रातील ४० मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास मानवंदना देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दलित पँथरचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब पडवळ हे राहणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष घन:श्याम भोसले यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष जगदीश इंगळे, महिला आघाडीच्या महाराष्ट्र अध्यक्ष कविता भोंडे, सरचिटणीस रोहित आयवळे, महेश गायकवाड, सुभाष लाटकर, प्रमोद लोखंडे, उत्तम नवघीरे, विश्वास गजबार, परशुराम शरणागत, शेखर बंगाळे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस विश्वास गजबार, शेखर बंगाळे, गौरव पवार, राहुल कटारे आदी उपस्थित होते.

## गरम तेल अंगावर पडून दोन कामगार जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

मोहोळ तालुक्यातील चंद्रमौळी वसाहतीमधील कंपनीमध्ये गरम तेल अंगावर पडून दोन कामगार जखमी झाले. सोनुकुमार फत्तेबहादूर जमल (वय २४) आणि लवकुमार शिवकांत जमल (वय ३०, रा. उत्तर प्रदेश, सध्या रा. चंद्रमौळी, ता. मोहोळ) अशी जखमींची नावे आहेत. १२ जानेवारी रोजी रात्री सोनुकुमार व लवकुमार हे दोघे राहात असलेल्या कंपनीच्या रूममध्ये स्वयंपाक करीत असताना गॅसचा भडका उडाल्याने तो विझवित असताना गॅसवरील गरम तेलाच्या कढईतील तेल अंगावर पडल्याने दोघेही भाजून जखमी झाले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी मरिबा खुर्द यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## जायंट्स फेडरेशनवर किसन आडम, श्रीनिवास कोंडले यांची निवड

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**


किसन आडम


श्रीनिवास कोंडले

जायंट्स फेडरेशन दोन बी नवीन पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली असून त्यात सोलापूरचे किसन आडम यांची फेडरेशन डायरेक्टर तर श्रीनिवास कोंडले यांची अधिकारी म्हणून सन २०२५ साठी फेरनिवड करण्यात आली. जायंट्स वेलफेअर फौंडेशनचे ४९ वे जायंट्स वार्षिक अधिवेशन गुजरात येथील गांधीधाम येथे दि.१० ते १२ जानेवारी दरम्यान झाले. अध्यक्षस्थानी जायंट्स विश्व अध्यक्ष शायना एन. सी. या होत्या. यावेळी संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. याअंतर्गत यावेळी फेडरेशन २ बी चे नूतन प्रेसिडेंट प्रा. गुरुदत्त राजपूत यांनी फेडरेशन २ बीच्या नवीन पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. भारतात एकूण १० फेडरेशन असून सब फेडरेशन धरून एकूण १५ फेडरेशन प्रेसिडेंट आहेत. भारतात ५५० ग्रुप आहेत.पैकी फेडरेशन २ बी संभाजी नगर, नाशिक, सोलापूर, अहिल्या नगर, वैजापूर, नांदगाव असे ३० ग्रुप आहेत. यावेळी जायंट्स स्पेशल कमिटी मेंबर विनोद शेवतेकर, रत्नामाला मालाणी, नागनाथ कोंडा, सपना कोंडले उपस्थित होते. या निवडीबद्दल मोहन कोंकाटी, भगवान कोंडले, सोलापूर ग्रुपचे अध्यक्ष मेघनाथ येमूल, हरिनिवास सोमा यांनी अभिनंदन केले.

# भूमिहिन शेतमजूर, नवबौध्द घटकांना मिळणार जमीन

### सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील भूमिहिन शेतमजूर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना २ एकर बागायत किंवा ४ एकर जिराईत जमीन १०० टक्के अनुदान स्वरुपात खरेदी करुन देण्यात येत असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसुचित जातीचा दारिद्र्य रेषेखालील व कुटुंब प्रमुखाचे वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे. अशा कुटुंबातील ६० वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या कुटुंबा प्रमुखाच्या पत्नीला या योजनेचा लाभ घेता येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी विक्रिसाठी जमीन उपलब्ध असलेल्या गावाचा रहिवाशी असावा. प्रस्तुत योजनेंतर्गत ज्या गावात जमीन उपलब्ध आहे त्याच गावातील पात्र लाभार्थ्यांची प्रथम निवड करण्यात येईल व त्या गावातील लाभार्थी उपलब्ध नसल्यास लगतच्या इतर गावातील पात्र लाभार्थ्यांना जमीनीच्या उपलब्धतेनुसार चिठ्या टाकून जिल्हा समितीच्या मान्यतेने विहित कार्यपध्दती नुसार पारदर्शक पध्दतीने लाभ देण्यात येईल.

दारिद्र्य रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द प्रवर्गातील परित्यक्ता स्त्रिया, दारिद्र् रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द विधवा स्त्रिया, अनुसुचित जाती /जमाती कायद्यांतर्गत जातीचे आत्याचारग्रस्त या घटकांना लाभार्थी निवडीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. महसुल विभागाने गायरान व सिलिंगच्या जमिनीचे वाटप केलेल्या कुटुंबांना लाभ अनुज्ञेय नाही. या योजनेंतर्गत जमीनीचे वाटप झाल्यानंतर संबंधित लाभ धारकाने स्वता: जमीन कसणे आवश्यक आहे. सदर जमीनीचे अन्य व्यक्तीस, संस्थेस हस्तांतरण व विक्री करता येणार नाही तसेच लीजवर भाडेपट्याने देता येणार नाही. जमीन कसण्यास अयोग्य, डोंगर उताराची, खडकाळ व नदी पात्रा जवळच्या क्षारयुक्त व क्षारपड जमीन असू नये. जमीन सलग असावी, शेत जमीन विना बोजा व कुळ नसलेली असावी तसेच जमीन कोठेही गहाण अथवा वादग्रस्त नसावी. जमीन विक्रीच्या अर्जावर शेतजमीन विक्री करणाऱ्या जमीन मालकाशिवाय संबंधिताच्या कुटुंबातील दोन व्यक्तींची जमीन विक्रीस संमतीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. जे जमीन मालक जिरायत जमीन कमाल ५ लाख रुपये प्रती एकर व बागायत जमीन कमाल ८ लाख रुपये प्रती एकर प्रमाणे विक्री करण्यास तयार आहेत अशा जमीन मालकांनी जमीनीच्या ७/१२ व आवश्यक कागदपत्रासह सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा.

## मार्केट यार्डातून दोन दुचाकींची चोरी

**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

शहरातील मार्केट यार्ड येथून चोरट्याने दोन दुचाकींची चोरी केली. नागप्पा गुरप्पा चनगोंडा (वय ५२, रा. हुच्चेश्वर नगर भाग ४, कुमठा नाका, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ बीजी ५३९६ क्रमांकाची दुचाकी ही १२ जानेवारी रोजी मार्केट यार्ड येथे सकाळी सहा वाजता हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार मस्के पुढील तपास करीत आहेत. कैलास सुरेश चौगुले (वय २७, रा. टिळक नगर भाग २, मजरेवाडी, सोलापूर) यांनी ११ नोव्हेंबर रोजी मार्केट यार्ड येथे त्यांची एमएच १३ एएस ३२८१ क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

# जातीय तेढ कमी होण्यासाठी तिळगुळ समारंभाचे कार्यक्रम व्हावेत

### माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे; शिवतीर्थ पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जानेवारी-**

अलीकडच्या काळात जातीय तेढ वाढ चालण्याच्या घटना घडत आहेत. अशा काळात तिळगुळ समारंभा सारखे कार्यक्रम होणे गरजेचे असून या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजातील जातीय तेढ कमी होण्यासाठी मदत होईल, असा विचार माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केला.




छत्रपती शिवाजी प्रशालेत मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने आयोजित तिळगुळ समारंभ व शिवतीर्थ पुरस्काराचे वितरण शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे हे होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून हभप प्रकाश महाराज बोधले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सरचिटणीस प्रा.महेश माने यांनी केले. यावेळी शिंदे यांनी यापूर्वीचे राजकारण आणि आत्ताचे राजकारण बदललेल्या यावरही प्रकाश टाकला. अध्यक्षीय मनोगत सपाटे यांनी ॲड. एकनाथ माने अंबादास सुरवसे या दोघांनी संस्थेच्या उभारण्यात दिलेले योगदान व निर्मलाताई ठोकळ यांचे वेळोवेळी संस्थेसाठी लाभलेले मार्गदर्शन सांगून पुरस्कार प्राप्त अन्य सत्कारमूर्तींचेही अभिनंदन केले. यावेळी कै. ॲड. एकनाथ तुळशीदास माने कै. अंबादास दाजीबा सुरवसे यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या परिवाराच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारण्यात आली. तसेच माजी आ. निर्मलाताई ठोकळ, आ. अभिजीत पाटील, यांचा शिवतीर्थ समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी चेतन नरोटे, ॲड. धनंजय माने, नागनाथ सुरवसे, ॲड. अमर पाटील, उदयन जाधव, दिलीप सुरवसे, विनायक पाटील, महादेव गवळी, अशोक चव्हाण, शिवदास चटके, नामदेव थोरात, सुनिता साळुंखे रेखा सपाटे, प्रा. महेश माने, ज्ञानेश्वर सपाटे, प्रा.मधुकर पवार, तानाजी माने, मोहम्मद शेख, सुजाता जुगदार, उषा गोखळे, महानंदा सोलापूरे, दत्ता भोसले. प्रा.युवराज सुरवसे, प्रा. संतोष गवळी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### जिजाऊ पब्लिक स्कूलच्या नवीन बसचे चिमुकल्यांच्या हस्ते उद्घाटन

**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

ग्रामीण भागातील शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत उत्तम पद्धतीच्या सेवा पोहोचवण्यासाठी शाळेने कटिबद्ध असले पाहिजे. सुरक्षित आणि चांगला प्रवास व्हावा यासाठी जिजाऊ पब्लिक स्कूल यांच्यावतीने मुलांसाठी नवीन शालेय बस खरेदी करण्यात आल्या. त्याची पूजन शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य सुजित आगलावे आणि पूजा सुजित आगलावे यांच्या हस्ते करण्यात आले. बसमधून मुलांना सैर घडवण्यात आली आणि मुलांनी मोठ्या आवाजात गलका आनंद आणि उत्साह गाणी भेंड्या डान्स इत्यादी गोष्टी शिक्षकांसह मोठ्या उत्साहामध्ये करण्यात आल्या. यावेळी संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव पवार, राज्य प्रशिक्षक यशदा पुणे आणि संस्थेच्या सचिव वैशाली पवार तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अमृता झाडे, सहशिक्षिका सोनाली मांजरे, सोनाली आगलावे, नम्रता झाडे, मनीषा पवार, गणेश गायकवाड, विराट पवार डॉ. शीतल पवार, मुन्ना विटकर, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### हालहळ्ळीच्या स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालयात निरंतर वाचन केंद्र सुरु

**वळसंग, दि. १४ जानेवारी-**

हालहळ्ळी अ (ता. अक्कलकोट) येथील स्वामी विवेकानंद व राजमाता जिजऊसाहेब यांच्या जयंतीनिमित्त वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियानाचे उद्घाटन सरपंच प्रकाश बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले.विद्यार्थी, शिक्षकांना ग्रंथभेट देऊन वाचनालयाचे मोफत सभासद करून घेण्यात आले. सोशल मीडियाच्या दुनियेत दिवसेंदिवस सर्वांचे वाचन कमी झाले आहे. सार्वजनिक ग्रंथालयातील विपुल वाचन साहित्याला वाचक मिळण्यासाठी ग्रंथालयाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियानात सहभागी होताना जिल्हा परिषद शाळेत निरंतर वाचन केंद्र सुरू केले आहे. विद्यार्थ्यांकडून प्रत्येक महिन्यात वाचलेल्या पुस्तकाचे सारांश त्यांच्या शब्दात लिहून घ्यायचे आहे. यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत सर्वोत्कृष्ट पहिल्या तीन पुस्तक परिचय, सारांश लेखनास प्रजासत्ताक दिनी पारितोषक देऊन गौरव करण्यात येणार आहे. हे निरंतर वाचन प्रत्येक महिन्यात किमान एक कार्यक्रम करण्याचा निर्णय ग्रंथालय व शाळेने घेतला आहे. यावेळी गौरीशंकर दोड्याळे, नीलप्पा बिराजदार, बसवराज बिराजदार, ग्रंथपाल गुरूनाथ गोविंदे, मुख्याध्यापक कोठे, हणमंत बिराजदार, हणमंत कळमंडे, नदाफ, कुसेकर उपस्थित होते.



### अमेरिकास्थित आशिष जोशी यांच्यातर्फे रामभाऊ जोशी प्रशालेला देणगी

**करकंब, दि.१४ जानेवारी-**

करकंबच्या शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले दिवंगत रामभाऊ जोशी यांचे नातू व सध्या अमेरिकेत गुगल कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत असलेले आशिष प्रवीण जोशी यांनी करकंब येथील रामभाऊ जोशी प्रशालेस नुकतीच भेट दिली. याप्रसंगी जोशी परिवाराकडून ५१ हजार रुपयांची देणगी प्रशलेस भेट देण्यात आली. यावेळी त्यांचेसोबत प्राचार्य हेमंत कदम, प्रकाश जोशी, प्रवीण जोशी, नेत्रा जोशी, श्रुती जोशी, जोशी परिवारातील चौथ्या पिढीतील अवी जोशी, अरुण देशपांडे आदी उपस्थित होते. दहावीतील विद्यार्थ्यांना आशिष जोशी यांनी करिअर कसे करावे? सध्या कोणती आव्हाने आहेत याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.




### युवा दिनानिमित्त युनियन अध्यक्ष सायबण्णा गोविंदे यांचा सन्मान

**सोलापूर, दि. १४ जानेवारी-**

राष्ट्रीय युवा दिनानिमित्त चपळगाववाडीचे सुपुत्र व ह्युंदाई पुणे कंपनीचे युनियन अध्यक्ष सायबण्णा गणपती गोविंदे यांचा सोलापुरीतल जगद्गुरु महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) सोलापूर येथे गुणवंत प्रशिक्षणार्थी म्हणून आणि उद्योग विश्वात भरारी घेणारे माजी विद्यार्थी म्हणून सत्कार करण्यात आला. सायबण्णा गोविंदे सोलापूरच्या आयटीआयचे माजी विद्यार्थी असून, त्यांनी आपल्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेते संस्थेला नावलौकिक मिळवून दिला आहे. युनियन अध्यक्ष म्हणून त्यांची कामगिरी फार चांगली आणि प्रेरणादायी आहे. सहकारी कामगारांच्या हितासाठी दक्ष राहून नेहमीच ते नियोजन करुन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात. यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. सायबण्णा गोविंदे हे चप्पळगाववाडी (ता. अक्कलकोट) येथील रहिवासी आहेत.

# वाणवसा करण्यासाठी विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मंदिरात सुवासिनींची मांदियाळी

## लाखेचा चुडा भरण्यासाठीही महिलांची अक्षरश : झुंबड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ जानेवारी-**

येथील विठ्ठल मंदिरा मध्ये मंगळवारी (ता.१४) मकरसंक्रांती निमित्त पहाटे पासून सुवासिनी महिलांची वाणवसा घेण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. राज्याच्या विविध भागातून या महिला येथे आलेल्या होत्या. त्यामुळे मंदिर परिसर महिला भाविकांच्या गर्दीने फुलून गेलेला दिसत होता. पंढरपूरचे खास वैशिष्ठ समजला जाणारा सौभाग्याचे लेणे असलेला लाखेचा चुडा भरण्यासाठी देखील महिलांची अक्षरश: झुंबड उडालेली दिसत होती.

मकरसंक्रांतीनिमित्त येथील विठ्ठल मंदिरातील रुक्मिणीमातेच्या, महालक्ष्मीच्या मंदिरा मध्ये सुवासिनी महिलांची वाणवसा घेण्यासाठी भल्या पहाटे पासून मोठी गर्दी झालेली होती. यावेळी महिला हळदीकुंकू, बोरं,उसाच्या लहान कांड्या ढाळा, तिळगुळ, संक्रांतीचे सुगड घेवून वाणवसा करुन परंपरे प्रमाणे एकमेकींच्या डोक्यावर तिळ टाकून तसेच हातावर तिळगुळ देवून तिळगुळ घ्या गोड बोला, आमचा तिळगुळ सांडू नका आणि आमच्याशी भांडू नका असे म्हणत सणाचा आनंद लुटत होत्या. मंदिर परिसरा मध्ये स्थानिक तसेच परगावाहून आलेल्या सुवासिनी महिलांची सौभाग्याचे लेणे तसेच मांगल्याचे प्रतिक असलेला लाखेचा चुडा तसेच बांगड्या भरण्यासाठी देखील गर्दी झालेली होती. यावेळी मंदिरा मध्ये रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी महिलांच्या अक्षरश: रांगा लागल्याचे दिसत होते. विठ्ठल रुक्मिणी मंदिरा बरोबरच चंद्रभागेच्या वाळवंट तसेच शहरातील प्रदक्षिणा मार्गावरुन आणि स्टेशन रस्त्यावरुन देखील महिलांच्या वाणवसा करण्यासाठी अगदी जथ्थे (झुंडी) येताना दिसत होत्या.



### पारंपारिक पोशाखात महिलांची उपस्थिती

आजच्या संक्रांतीच्या सणा निमित्त वाणवसा करण्यासाठी आलेल्या महिलां मध्ये अनेक महिलांनी पारंपारिक नऊवारी साडी परिधान करुन केसांचा आंबाडा घालून त्या मध्ये फुलांची वेणी, गजरे माळून आपल्या हिंदू संस्कृतीच्या पारंपारिक पोशाखात मंदिराच्या महाव्दार तसेच पश्चिमव्दारा समोर एकमेंकींना हळदीकुंकू लावत असल्याचे दिसत होते.

### संक्रांतीच्या दिवशी खण (सुगडं) पूजनाला महत्व

संक्रांतीच्या दिवशी महाराष्ट्रामध्ये सुगडं पुजण्याची प्रथा आहे. या सुगड्यामध्ये पाच खणाला हळदी - कुंक लावून. त्यानंतर या खणाच्या गळ्याभोवती पांढरा दोरा गुंडाळला जातो. खनाच्या आत मध्ये हरभरा, गव्हाची ओंबी, फुले, उसाचे तुकडे, भुईमुगाच्या शेंगा, गाजर, तीळ, ज्वारीचे कणीस इत्यादी वस्तू टाकल्या जातात व पूजा केली जाते. त्यानंतर सर्व सुवासिनी गोळा होऊन हे सुगडं पदरामध्ये झाकून एकमेकींना हळदी-कुंकू लावून हे सुगडं दान देतात. संक्रांतीनंतर रथसप्तमी पर्यंत हळदी-कुंकवाचा कार्यक्रम महिलांमध्ये सुरू असतात. सुगडं पुजनाला संक्रातीच्या दिवशी विशेष महत्व आहे.

### मंदिर समितीकडून विविध उपाय

श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच महिला भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन, मंदिर प्रशासनाकडून सुलभ व जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने ऑनलाइन दर्शन पास बुकिंग व्यवस्था बंद ठेवण्यात आली आहे. तसेच थेट दर्शनावर निर्बंध, पुजेची संख्या कमी करणे, महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

### शहरातील इतर मंदिरातूनही गर्दी

विठ्ठल रुक्मिणी मंदिरा बरोबरच शहरातील सुवासिनी महिला दिंडीरवनातील लखुबाई, एकविरामाता, हरिदासाची देवी, अंबाबाई, पदमावती, घाडगेची देवी, कालिकादेवी, यमाईतुकाई आदी मंदिरा मधून वाणवसा करीत असल्याचे दिसत होते. या बरोबरच उपनगरातील महिला देखील त्या त्या भागातील मंदिरा मधून हळदीकुंकू लावुन संक्रांतीचा सण उत्साहात साजरा करीत होत्या.

### शंकासूर, किंकरासूर या राक्षसांचा वध

भोगी, संक्रांत आणि किंक्रांत हे तीन वेगवेगळे दिवस असतात त्यामुळे या तीन दिवशी संक्रांत संपन्न केली जाते. संक्रांत हे एक देवी स्वरूप असल्याने संक्रांतीने शंकासुर व क्रीक्रांतीने दुसऱ्या दिवशी किंकरासूर या दोघांचा वध केल्याने हा सण साजरा केला जातो अशी पुराण कथा आहे.

### रुक्मिणीमातेस नवधान्य अर्पण

श्री रुक्मिणी मातेला सुवासिनी महिलांनी नवधान्याचे वाण अर्पण करण्यासाठी गर्दी केली असून, हजारो महिला भाविक पहाटेपासूनच ताटात हळद, कुंकू, तिळगुळ, ऊस, बोर, गाजर, हुरडा यासह अन्य प्रकारचे धान्य अर्पण मनोभावे रुक्मिणीमातेस अर्पण करीत असल्याचे दिसत होते.

### रुक्मिणीमातेस पारंपारिक पोशाख

भोगी तसेच संक्रांती निमित्त दोन दिवस रुक्मिणीमातेस उंची वस्त्रे परिधान करण्यात आलेली होती. दोन्ही दिवशी दुर्मिळ असे विविध सोन्याचे पारंपारिक अलंकार (दागिने) देखील परिधान करण्यात आलेले होते. त्यामुळे रुक्मिणीमातेची मुर्ती अधिकच विलोभनीय दिसत होती.



# मुलांना खेळण्यासाठी प्रवृत्त करा : अ‍ॅड. परिचारक

## कराटे स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १४ जानेवारी-**

कोरोना काळापासून मुलांच्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. कुटुंबातील सदस्यांबरोबरच संवाद कमी होऊन, खेळाच्या मैदानावरील आवड कमी होऊन मोबाईलशी त्यांचे नाते घट्ट होत आहे. जागरूक पालकांनी याबाबतचा विचार करून आपल्या मुलांना मैदानावरील खेळांकडे नेण्याचा प्रयत्न करावा असे सांगत मोहोळसारख्या ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात क्रांतिवीर भगतसिंग कराटे अ‍ॅकॅडमीच्या माध्यमातून राष्ट्रीयस्तरापर्यंत मुले पोहोचत आहेत ही अभिमानाची गोष्ट असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रेल्वे समितीचे सदस्य अ‍ॅड. प्रणव परिचारक यांनी केले.

क्रांतिवीर भगतसिंग कराटे अँन्ड स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीयस्तरावर मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी सपोनि किरण पाटील, अनंत नागणकेरी, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष संजय आठवले, प्रशिक्षक दशरथ काळे, पत्रकार भारत नाईक, रणजीत भोसले, सोलापूर जिल्हा खो-खो असोसिएशनचे संतोष कदम, मंगेश पांढरे, माजी प्राचार्य श्रीधर उन्हाळे, विष्णू शिंदे, अशोक कांबळे, दिनेश सातपुते, अक्षय वाडकर, विजय नागमोडे, कराटे प्रशिक्षक दिलीप शिंदे, नितीन बारसकर, सुनील गायकवाड आदी उपस्थित होते. प्रास्ताविक दशरथ काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रमोद कोरे यांनी केले तर आभार नितीन बारसकर यांनी मानले.

# सोपल प्रशालेत फुलला आनंद बाजार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

दिलीपराव सोपल प्रशाला व दत्त प्राथमिक विद्यामंदिर बार्शी या दोन्ही शाळेच्या विद्यमाने दिलीपराव सोपल प्रशाला येथे भव्य आनंद बाजार संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती क्रीडा,शिक्षण व समाजसेवी संस्था, उपळाई (ठों) या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहनआण्णा ठोंगे प्रमुख पाहुणे म्हणून न.पा. शिक्षण मंडळाचे प्रभारी पर्यवेक्षक सुरेश शिंदे, संस्थेच्या सचिवा सौ. तेजस्विनीताई ठोंगे, मृणाली ठोंगे प्रमुख उपस्थिती म्हणून सचिन काळे मुख्याध्यापक, श्रीकांत कुंभारे उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने व बाल आनंद बाजारचे फीत कापून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक बौद्धिक गुणांना चालना देऊन विकास व्हावा या दृष्टीने बाल आनंद बाजार भरवला जातो. भविष्यात मुलांना व्यवहार समजावेत म्हणून हा स्तुत्य कार्यक्रम आहे, असे विचार मान्यवरांनी मांडले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी युवराज जगताप, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, श्रीकांत कुंभारे, चंद्रकांत लोखंडे, राहुल ठोंगे, संतोष ठोंबरे, अरुणा मठपती, ललिता चव्हाण, शितल पाटील, सारिका लंगोटे व सेवक संदीप भोरे, श्रीकांत चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष ठोंबरे यांनी तर आभार श्रीकांत कुंभारे यांनी मानले.




### २४ हजारांची झाली उलाढाल

आनंद बाजारमध्ये मुलांनी १०१ स्टॉल मांडून भाजीपाला, स्टेशनरी सामान, भेळ, भजी, कटलरी सामान, विविध फळे, इमिटेशन ज्वेलरी, किराणा सामान, गृह उपयोगी सामान इत्यादी मांडून त्यांची विक्री केली. या आनंद बाजारात २३,९२७ रुपयांची उलाढाल झाली.


# बार्शी उपविभाग संघ उपविजेता

## पोलीस अधीक्षक कार्यालयाचा ट्रॉफीवर कब्जा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ जानेवारी-**

एसपी चषक २०२५ अंतर्गत आयोजित शहीद अशोक कामटे सर ट्रॉफी स्पर्धेत पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले, तर बार्शी उपविभाग संघाने उल्लेखनीय कामगिरी करत उपविजेतेपद मिळवले. सदरच्या स्पर्धेकरिता प्रत्येक उपविभागातील एक संघ होता. अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या संघाने बार्शी उपविभाग संघावर विजय मिळवत प्रतिष्ठेची शहीद अशोक कामटे सर ट्रॉफी आपल्या नावावर केली. शहीद अशोक कामटे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित या स्पर्धेने पोलीस दलातील सहकार्य आणि खेळ भावना वृद्धिंगत करण्यास हातभार लावला. बार्शी उपविभाग संघाच्या प्रदर्शनाचे उपस्थितांनी कौतुक केले. विजेत्या आणि उपविजेत्या संघांचे अभिनंदन करण्यात आले.





# इंटरमिजिएट परीक्षेत द. ह. कवठेकर प्रशालेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ जानेवारी-**

शासकीय चित्रकला इंटरमिजिएट इंटरमिजिएट परीक्षेत येथील द.ह.कवठेकर प्रशालेतील विद्यार्थी चि.अथर्व अमित वाडेकर याने राज्य गुणवत्ता यादी मध्ये २१ वे स्थान पटकावले व याच गुणवत्ता यादीत प्रशालेतील विद्यार्थिनी कु.सान्वी सचिन कलढोणे हिने राज्यात २६ वा क्रमांक पटकाविला.

प्रशालेतील १० विद्यार्थी ए ग्रेड प्राप्त असून ९ विद्यार्थी बी ग्रेड प्राप्त करून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना प्रशालेतील जेष्ठ कलाशिक्षक अमित वाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. कला संचालनालयातर्फे एलिमेंटरी व इंटरनेट या दोन चित्रकला परीक्षा मोठ्या प्रमाणात घेतल्या जातात.यावर्षी या दोन्ही परीक्षेस संपूर्ण महाराष्ट्रातून सात लाख ५० हजार ९३५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. प्रशालेस मिळालेल्या या यशाबद्दल पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव एस. आर. पटवर्धन, सु.त्रिं.अभ्यंकर, संस्थेचे अध्यक्ष नाना मालक कवठेकर,चेअरमन वीणाताई जोशी व सर्व संचालक मंडळ तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.एम.कुलकर्णी, उपमुख्याध्यापक सुनील रुपनर, र्यवेक्षक आर. एस. कुलकर्णी यांनी अभिनंदन केले. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर प्राप्त ग्रेडनुसार बोर्डाचे वाढीव गुण मिळण्याचा लाभ विद्यार्थ्यांना होतो. यावर्षी वाढीव गुण प्राप्त १९ विद्यार्थी असून त्यांचे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी पुणे विभागीय बोर्डाकडे पाठविल्याचे मुख्याध्यापक व्ही. एम.कुलकर्णी यांनी सांगितले.

# अक्कलकोटमध्ये बाईक रॅली, दीपोत्सव

## रामलला प्राणप्रतिष्ठापना वर्षपूर्तीनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१४ जानेवारी-**

अक्कलकोटमध्ये अयोध्येतील श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्षपूर्ती सोहळानिमित्त स्टेशन रोडवरील श्रीराम मंदिरात महाआरती, महिला भक्तांची बाईक रॅली, फत्तेसिंह क्रीडांगणावर दीपोत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला.

अयोध्येतील श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्षपूर्ती सोहळ्याचे (तिथीनुसार) औचित्य साधून श्रीराम मंदिरासह विविध ठिकाणी श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी स्टेशन रोडवरील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित श्रीराम मंदिरात प्रभू श्रीरामचंद्रांची महाआरती श्री. स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे, प्रथमेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. तत्पूर्वी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ते श्रीराम मंदिरापर्यंत महिला भक्तांची बाईक रॅली काढण्यात आली. यावेळी शिरा व लाडू वाटप करण्यात आले. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या सौजन्याने कै. कल्याणराव उर्फ बाळासाहेब इंगळे, कै. उमेश कल्याणराव इंगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ अक्कलकोट येथील श्रीराम जन्मोत्सव समितीस प्रभू श्रीरामचंद्र यांच्या मूर्तीची भेट प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते देण्यात आले.




याप्रसंगी, पिंटू अण्णा हिंडोळे, संतोष वगाले, उषा हंचाटे, स्मिता कदम, श्रृती पाटील, सारीका वगाले, संदीप कटकधोंड, संतोष पत्तरगे, अजय आडवितोटे, महेश वागदरे, ऋषिकेश लोणारी, राहुल वाडे, प्रसन्न गवंडी, सौरभ हळके, धनराज पाटील, श्रीशैल गवंडी, विपूल जाधव, प्रविण घाटगे, ज्ञानेश्वर भोसले, मदन राठोड, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, राज मद्रीकर, देविदास गवंडी, आबा पवार, महेश काटकर, अमर पाटील उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# बीआयटी कॉलेजमध्ये राजमाता जिजाऊ माँसाहेब, स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ पुणे संचलित बार्शी येथील भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालय (बीआयटी कॉलेज) मध्ये राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. अर्चना आवटे यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. रणजित शिराळ यांनी प्रतिमेचे पूजन केले. यावेळी महाविद्यालयांतील अनेक विध्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी या कार्यक्रमाला महाविद्यालयातील पदवी आणि पदविका विभागप्रमुख यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्नील कुरमुडे यांनी केले तर शेवटी प्रा. रोहन मोटे यांनी आभार व्यक्त केले.





## संक्षिप्त वृत्त...

### डॉ. कुंभार यांच्या 'पक्ष्यांची दुनियाला' राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर

**अकलूज, दि. १४ जानेवारी-**



येथील शिवरत्न शिक्षण संस्थेच्या बीबीए महाविद्यालयातील निवृत्त प्राचार्यव पक्षी अभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी लिहिलेल्या पक्ष्यांची दुनिया या पुस्तकाला मराठवाड्यातील एकता फौंडेशनच्या राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर झाले आहे. सदर पुरस्कार सतरा जानेवारी रोजी बीड जिल्ह्यातील दहिवडी येथे भरविण्यात येणाऱ्या मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती एकता फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अनंत कराड यांनी प्रसार माध्यमांना दिली. पुरस्कारचे हे सातवे वर्ष असून रोख रक्कम व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असल्याची माहिती फौंडेशनचे कोशाध्यक्ष शिवलिंग परळकर यांनी दिली. एकता फौंडेशनचे मार्गदर्शक व मराठवाडा साहित्य परिषद (छत्रपती संभाजीनगर) चे माजी कोषाध्यक्ष तथा ग्रामीण कथाकार डॉ. भास्कर बडे यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षण समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने डॉ. कुंभार यांनी लिहिलेल्या पक्ष्यांची दुनिया या संशोधनपर पुस्तकास पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे.



### अभिनव प्राथमिक विद्यामंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात

**बार्शी, दि. १४ जानेवारी-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अभिनव प्राथमिक विद्यामंदिरचे वार्षिक स्नेहसंमेलन यशवंतराव चव्हाण सभागृहात संपन्न झाले. प्रमुख पाहुणे अनिल बनसोडे, संस्थेच्या सचिवा कल्पनाताई बारबोले, संस्थेचे पदाधिकारी उमाकांत राऊत, मोहन लोहार, धनश्री गावकरे पालक प्रतिनिधी लक्ष्मी लोंढे, मुजाहिद मुल्ला, उमा ठोंगे व सोनल गरड यांच्या हस्ते प्रथमत: क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व कै. अर्जुनराव (अण्णा) बारबोले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. उपस्थित मान्यवरांचा सत्कार झाल्यावर गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, भारतीय सण व उत्सव, सामाजिक संदेश देणारी गीते, थीम डान्स,लावणी, बालगीते, रिमिक्स गाणी यासारखे बहारदार नृत्याविष्कार सादर केले. बालवाडी विभागातील विद्यार्थ्यांनीही बहारदार नृत्ये सादर केली. सूत्रसंचालन आधार भालेराव आणि रेखा बेद्रे यांनी केले तर रेखा मस्के यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माधुरी सोनवतीकर, सरस्वती मोटे, अनंत लंकेश्वर, गीतांजली नीलकंठ, सारिका कुलकर्णी, सुनंदा कुलकर्णी, रेखा ढोणे व रागिणी मस्के यांनी परिश्रम घेतले.



### माळशिरसमधील मंदिरांमध्ये गर्दी

**सदाशिवनगर, दि. १४ जानेवारी-**

मकर संक्रांतीनिमित्त देवास ओवासायास आज सकाळपासूनच महिलांनी गर्दी केली होती. महिलांचा मकरसंक्रांत सणादिवशी ग्रामदैवत रामदेव, मारुती देव, सावता माळी मंदिर, महादेव मंदिरात देवास ओवसायस गर्दी केली होती. तसेच पंढरपूरच्या विठ्ठलाला वाण घेऊन जाण्याची परंपरा अजूनही आहे. या सणानिमित्त सर्व महिलांच्या घरी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम केला जातो. यावेळी आपल्या ऐपतीप्रमाणे वाण लुटण्यात येते. हा हळदी-कुंकवाचा कार्यक्रम रथसप्तमीपर्यंत चालतो.



### सांगोल्यात हिंदू राष्ट्र संकल्प दिन साजरा

**सांगोला, दि.१४ जानेवारी-**

अयोध्या येथे मागील वर्षी झालेल्या तिथीनुसार प्रभू रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठा निमित्त शनिवार दि.११ जानेवारी या दिवशी सांगोला येथे हिंदू जनजागृती समितीच्या वतीने श्री अंबिका देवी मंदिर येथे हिंदू राष्ट्र संकल्प दिन साजरा करण्यात आला. यावेळी श्रीराम जय राम जय जय राम हा नाम जप घेण्यात आला. त्यासोबतच श्री रामरक्षा स्तोत्र म्हणून घेण्यात आले. त्यानंतर सामूहिक महाआरती करण्यात आली. आणि शेवटी हिंदू राष्ट्र स्थापनेची प्रतिज्ञा घेवून प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने हिंदू धर्म बांधव उपस्थित होते.

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात रंगीबेरंगी फुलांची आरास

## रूक्मिणीमातेला पारंपारिक अलंकार, भाविकांसाठी पुरविल्या आवश्यक सोयीसुविधा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जानेवारी-**

प्रतिवर्षीप्रमाणे दि १३ ते १५ जानेवारी या कालावधीत भोगी, मकरसंक्रांत व किंक्रांत संपन्न होत असून, या सणानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. येणाऱ्या भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी मंदिर समितीकडून भाविकांसाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. तसेच सर्व प्रथा व परंपरेचे पालन करून मंदिरात रंगीबेरंगी फलांची आरास करण्यात आली असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

मकरसंक्रांत निमित्त मंगळवारी (दि.१४) श्री रूक्मिणी मातेला पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले. त्यामध्ये सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, जवेच्या माळा, तांबडी चिंचपेटी, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, जवमणी पदक, हायकोल, सरी, कंबरकट्टा, लक्ष्मीहार इत्यादी अलंकाराचा समावेश आहे.





तसेच वर्षभरातील विविध सण - उत्सवा दिवशी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक व मनमोहक सजावट केली जाते. त्याप्रमाणे मकरसंक्रांती सणानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगीबेरंगी फुलांची आरास करण्यात आली आहे. त्यामध्ये गाभारा, चारखांबी, नामदेव पायरी येथील भाग सजावटीने आकर्षक व मनमोहक दिसत आहे. सदरची सजावट राहुल ताम्हाने, पुणे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली आहे. त्यासाठी ५०० किलो लाल गोंडा, ५०० किलो पिवळा गोंडा, २०० किलो शेवंती, ५० किलो गुलछडी, ५०० किलो कामिनी व १०० किलो ॲस्टर फुलांचा तसेच वांगी, गाजर, कारले, वाटाणा, पावटा, डबल बी ,भोपळा, लाल पापडी, पांढरी पापडी इत्यादीचा वापर केला आहे. या सजावटीसाठी सुमारे ५० कामगारांनी परिश्रम घेतले.

### भाविकांमधून समाधान

मंदिरात फुलांची सजावट, पुरेसा सोई सुविधा, चांगली स्वच्छता, चांगल्या दर्शन व्यवस्थेने भाविक समाधान व्यक्त करीत असून, सदरच्या सोयी सुविधांचे नियोजन मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य संभाजी शिंदे व ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असल्याचे यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

# 'शिवामृत'च्या अत्याधुनिक फ्लेवर्ड मिल्क प्लांटचा शुभारंभ

## शेतीपूरक रोजगार निर्मितीला चालना; अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ जानेवारी-**

येथील शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघाच्या प्रति दिनी एक लाख बॉटल उत्पादन क्षमतेच्या अत्याधुनिक फ्लेवर्ड मिल्क प्लांटचे उद्घाटन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहाकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघाने विजयनगर-अकलूज येथे अत्याधुनिक फ्लेवर मिल्क प्लांटची उभारणी केली असून या प्लांट उद्घाटनप्रसंगी संघाचे मार्गदर्शक संचालक राजसिंह मोहिते-पाटील, बँक ऑफ बडोदाचे रिजनल मॅनेजर संजीवन कुमार, शाखाधिकारी राजकिशोर सिंग, चेअरमन खा. धैर्यशील मोहिते-पाटील, व्हा. चेअरमन दत्तात्रय भिलारे, कार्यकारी संचालक रविराज इनामदार देशमुख, मुंबईच्या मिर्टीलो इंटर नॅशनल कंपनीचे संचालक विकास पाटील उपस्थित होते. संजीवन कुमार, विकास पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक संचालक हरिभाऊ मगर यांनी केले तर आभार व्हा चेअरमन दत्तात्रय भिलारे यांनी मानले.



### बदाम ड्रिंक, क्लासिक कॉफीचे उत्पादन सुरु

प्लांटची दैनंदिन उत्पादन क्षमता एक लाख बॉटल असून यासाठी दररोज २० हजार लिटर दूध लागणार आहे. शिवामृत या बॉटलमधून बटर स्कॉच, बदाम, पिस्ता, केशर, स्टॉबेरी, पायनापल, चोकलेट, व्हेनेला, बनाना हनी, थंडाई, बदाम ड्रिंक व क्लासिक कॉफीचे उत्पादन घेणार आहे. आज बदाम ड्रिंक व क्लासिक कॉफीचे उत्पादन सुरू करण्यात आले आहे, असे चेअरमन खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास एक लाखाची देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ जानेवारी-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीस बापू ज्ञानोबा दगडे या भाविकांने एक लक्ष रुपयाची देणगी धनादेश स्वरूपात दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

देणगीदार भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते उपरणे व दैनंदिनी देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री व विभाग प्रमुख राजेश पिटले उपस्थित होते. देणगीदार यांनी आपले पिताश्री ज्ञानोबा बाबुराव दगडे यांच्या स्मरणार्थ अन्नछत्रासाठी सदरची देणगी दिली आहे. देणगीदार हे बावधन पुणे येथील रहिवासी असून, दिनांक १४ जानेवारी रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूरला आले असता, त्यांनी सदरची देणगी दिली आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास देणगी देण्यासाठी आरटीजीएस, क्युआर कोड, धनादेश, डिडी, ऑनलाइन व रोख स्वरूपात सुविधा उपलब्ध आहे. याशिवाय, अन्नछत्र सहभाग योजना, गोशाळा ठेव योजना, महानैवेद्य सहभाग योजना इत्यादी योजना असून, इच्छुक भाविकांनी संत तुकाराम भवन येथील कार्यालयात संपर्क साधावा.



# शिक्षण, आरोग्य, उद्योगाबाबतीत महिलांना साक्षर करणार : प्रा. मीनाक्षी जगदाळे

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ जानेवारी-**

ग्रामीण भागातील महिला चूल आणि मूल यामध्ये अजूनही अडकलेल्या दिसून येतात त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिजाऊ ब्रिगेड सातत्याने प्रयत्न करीत असून जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना शिक्षण ,आरोग्य व उद्योग याबाबतीत प्रशिक्षण देऊन साक्षर करणार असल्याचे जिजाऊ ब्रिगेडच्या सोलापूर व सातारा विभागाच्या नवनिर्वाचित अध्यक्षा प्रा मीनाक्षी जगदाळे यांनी सांगितले

जिजाऊ ब्रिगेडच्या सातारा व सोलापूर विभागाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सकल मराठा समाज माळशिरस तालुक्याच्या वतीने त्यांचा अकलूज येथे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी माळशिरस तालुका सकल मराठा समाजाचे नेते माणिकराव मिसाळ, धनंजय माने साखळकर, अण्णासाहेब शिंदे, बबनराव शेंडगे, रणजीत कदम, सचिन गायकवाड, दिगंबर मिसाळ, सचिन पराडे, अनिल कदम, रणजीत गायकवाड, दत्ता गोरे, शिवराम गायकवाड, अमोल जगदाळे, गणेश जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रा. मीनाक्षी जगदाळे म्हणाले की, सातारा व सोलापूर जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागामध्ये जिजाऊ ब्रिगेडच्या गावागावांमध्ये शाखा काढून ग्रामीण भागातील गरजू व गरीब महिलांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देऊन छोटे छोटे गृह उद्योग सुरू करून स्वतःच्या पायावर उभा करणार असून यामुळे स्वतःच्या व कुटुंबाच्या विकासात महिलांचा हातभार लागणार आहे. सकल मराठा समाज माळशिरस तालुक्याच्या वतीने सन्मान केल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. यावेळी बबनराव शेंडगे, रणजीत कदम यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक निनाद पाटील तर आभार धनंजय माने साखळकर यांनी मानले.



# निसर्गाची किमया; एका केळीच्या बुंध्याला चक्क दोन घड!

## परिसरात कुतुहलाचा विषय; बाग पाहण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १४ जानेवारी-**

शेटफळ (ता. करमाळा) येथील शेतकरी बाबूराव गुंड यांच्या केळीच्या शेतातील एका केळीच्या बुंध्यातून चक्क दोन घड निघाले असून ही निसर्गाची किमया लोकांच्या व शेतकऱ्यांच्या कुतूहालाचा आणि चर्चेचा विषय ठरत आहे.

शेटफळ येथील बाबुराव गुंड यांनी गेल्या वर्षी जैन टिश्यू कल्चरच्या जी नाईन वाणाच्या रोपांची लागवड केली होती. त्याचे एक पीक त्यांनी घेतले. त्याच्यापासून त्यांनी भरघोस उत्पादन ही मिळवले . सध्या त्यांनी खोडव्याचे पिक घेतले आहे . यामधील एका बुंध्याला चक्क दोन घड सुटले असून त्या दोन्ही घडांची वाढ चांगली होत आहे. नेहमी एका बुंद्याला एकच घड सुटत असतो. परंतु या एका बुंद्याला चक्क दोन घड सुटल्याचे त्यांनी गावातील आपल्या मित्रांना सांगितले व फोटो दाखवले. ते पाहून त्यांना हे आश्चर्य वाटले आणि हे खरोखरच घडले आहे का? हे पाहण्यासाठी सर्वजण शेतात प्रत्यक्ष गेले. याची माहिती लोकांना होताच हा परिसरातील शेतकऱ्यांचा कुतुहलाचा व चर्चेचा विषय ठरला. सध्या गुंड यांच्या शेतातील हे घड पाहाण्यासाठी लोक आवर्जून जात आहेत.

सामान्यत: केळीच्या एका बुंद्याला एकच घड सुटत असतो. परंतु शेटफळ येथील गुंड यांच्या शेतातील केळीच्या एका बुंध्यावर दोन घड निघाल्याची माहिती मिळाली. वनस्पतीमधील जनुकीय बदलामुळे अशा प्रकारची निर्मिती होऊ शकते, हे फक्त अपवादात्मक परिस्थितीमध्येच असते.
**- किरण पाटील, केळी पीक तज्ज्ञ, जैन टिश्यूकल्चर, सोलापूर विभाग**



# करमाळा तालुक्यातून शेकडो कार्यकर्ते श्री शंभू राज्याभिषेक सोहळ्याला जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१४ जानेवारी-**

१६ जानेवारी २०२५ किल्ले पुरंदर ३४५ वा श्रीशंभुराज्याभिषेक सोहळ्यास करमाळा तालुक्यातून शेकडो कार्यकर्ते पुरंदर किल्ल्यावर जाणार आहेत.



यावेळी उपस्थित प्रदेशाध्यक्ष संभाजी ब्रिगेड महाराष्ट्र प्रवीण गायकवाड, आ. विजय शिवतारे, आ. बापूसाहेब पठारे, आ. अभिजीत पाटील, आ. डॉ. बाबासाहेब देशमुख उपस्थित राहणार आहेत. सकाळी ८ वा. गडावर प्रवेश, सकाळी ९ वा. स्मारक पूजन, सकाळी १० वा. पालखी सोहळा, सकाळी ११ वा. श्रीशंभू राज्याभिषेक सोहळा, स. ११:३० वा. पुरस्कार व सन्मान वितर, दुपारी १२ वा. मान्यवरांचे मनोगत, दुपारी १ वा. भोजन, दुपारी २ वा. स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे तालुकाध्यक्ष सुहास पोळ तसेच संभाजी ब्रिगेड जेऊर शहराध्यक्ष अतुल निर्मळ यांनी सांगितले.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री संत गोरोबा काका मंदिरात मकरसंक्रांत निमित्ताने महिलांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१४ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा काका मंदिरात मकर संक्रांत निमित्ताने महीलानी प्रचंड गर्दी केली होती.

तेर व तेर परीसरातील महीला प्रचंड मोठ्या संख्येने श्री संत गोरोबा काका मंदिरात वाणवसा निमित्ताने आलेल्या होत्या. मंदिरात महीलानी मंदिरात वाणवसा करून महीलानी एकमेकिना हळदी कुंकू लावून मकर संक्रांतीचे वाण भेट दिले.





## संक्षिप्त वृत्त...



### धाराशिवात रक्तदान शिबीर

**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

सेवार्थ विद्यार्थी (SFS) व NSS महाजन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने युवक सप्ताह निमित्त स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, शहराध्यक्ष प्रा. प्रशांत गुरव, शहर मंत्री अनिकेत कोळगे, जिल्हा संयोजक वैष्णवी थिटे, प्रा.डॉ. सहदेव रसाळ, कृष्णाली राऊत, जयराम गंभिरे, उज्वल गाढवे, अजय टोले आदी विद्यार्थी व प्राध्यापक कार्यकर्ते उपस्थित होते.



### ओंकार गायकवाड यांचा सत्कार

**तेरखेडा, दि.१४ जानेवारी -**

वाशी तालुका पंचायत समितीचे नव्याने रुजू झालेले गटविकास अधिकारी ओंकार गायकवाड यांचा पंचायत समिती कार्यालय येथे दि.१३ जानेवारी रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य उद्धव साळवी, भाजप तालुका सरचिटणीस सुधीर घोलप, ग्रामपंचायत सदस्य संदीप घुले उपस्थित होते. गटविकास अधिकारी गायकवाड हे प्रशिक्षणार्थी म्हणून वाशी येथे रुजू झाले आहेत.



### तडवळ्यात रक्तदान शिबीर संपन्न

**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

जगद्गुरू नरेंद्रचार्य महाराज संस्थांनच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात रक्तदान शिबिरचे आयोजन ४ ते १९ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात येत आहे.धाराशिव येथील महादेव मंदिर येथे जगद्गुरू नरेंद्रचार्य महाराज प्रणित स्व. स्वरूप संप्रदायाच्या धाराशिव शहर सेवाकेंद्र मार्फत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यासाठी ब्लड बँकला बोलवण्यात आले होते. यात १८६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी समाधान सूर्यवंशी, दिनेश देटे, शहाजी दळवे, नाना अंगटकर, प्रणव गव्हाणे, शुभम सूर्यवंशी, रोहित यादव, पार्वती गाडेकर, मनीषा शिरसागर, कमल गुंडरे, सुवर्णा शेळके तालुक्यातील आणि सेवाकेंद्रातील भक्तगणांनी सहकार्य केले.



### विद्यार्थ्यांची ऐतिहासिक स्थळांना भेटी

**मंगरूळ, दि.१४ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील जिल्हा परिषद प्रशालेची सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाची सहल ७ ते ११ जानेवारी या कालावधीत संपन्न झाली ऐतिहासिक, धार्मिक व भौगोलिक स्थळांना भेट देऊन विद्यार्थ्यांनी इतिहास, भूगोल व अध्यात्म याचे धडे गिरवले व प्रत्यक्ष अनुभव घेतला.

### विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा

**कळंब, दि.१४ जानेवारी -**

कळंब तालुक्यातील शिराढोण येथील उत्तर भिम नगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून नामांतराच्या लढ्यात योगदान दिलेल्या भिम सैनिक व गावातील ज्यांनी नामांतर लढ्यात साथ दिली आशा नागरिकांना सन्मान चिन्ह व पुष्प गुच्छ देवुन गौरवण्यात आले. प्रकाश नाईकवाडे, गोरोबा नाईकवाडे, कल्याण नाईकवाडे, जीवन नाईकवाडे, संभाजी नाईकवाडे, राजाभाऊ सोनवणे, प्रताप नाईकवाडे, आनंद नाईकवाडे, व बुध्द वासी झालेले गौतम नाईकवाडे, सुरेश सरवदे, प्रकाश गोरे, पोमा सिरसाट, विजय गोरे, यांच्या वारसांचा सन्मान करण्यात आला.

### प्रल्हाद पुजारी यांचे निधन

**जळकोट, दि.१४ जानेवारी -**



तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील रहिवासी व उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी प्रल्हादराव गणपतराव पुजारी (वय ८८ ) यांचे दि.१३ जानेवारी रोजी प्रदीर्घ आजाराने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ४ भाऊ, दोन मुले, तीन मुली, सूना, नातवंडे, परतुंडे असा परिवार आहे. भारतीय सैन्य दलाचे माजी सैनिक व्यंकट पुजारी व छायाचित्रकार संजय पुजारी यांचे ते वडील होत.

वक्फ अधिकाऱ्यांचा ऊर्समध्ये अनागोंदी कारभार...! राज्य महामार्गावरील दुकानांना भाडे आकारणी ?

# नियम धाब्यावर बसवून दुकाने व पाळणे थाटले; जिल्हाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

शहरातील ख्वॉजा शमशोद्दीन गाजी रहे दर्गाह येथे उर्स सुरू झाला असून अनेक परवाण्याविनाच या ठिकाणी भांडी, कपडे व खेळणी दुकाने, खाद्य स्टॉल्स व पाळणे याबरोबरच विविध प्रकारचे मनोरंजनात्मक खेळणी व टॉल्स थाटलेली आहेत. विशेष म्हणजे यापैकी अनेक परवाने मिळालेल्या नाहीत.

तरी देखील वरील प्रकारची दुकाने बिंदीकतपणे थाटलेली आहेत. महत्त्वाचे म्हणजे या दर्गासमोरून राज्य महामार्ग जात असून सार्वजनिक बांधकाम विभागाने परवानगी दिली नसताना देखील दुकाने थाटली आहेत. या दुकानांचे देखील भाडे अव्वाच्या सव्वा अवैध नियमबाह्य पद्धतीने उकळलेले आहे.

या परिसरातील सर्व कार्यक्रम नियमानुसार आहेत किंवा नाहीत याच्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी जिल्हा वक्फ अधिकारी आमेर सय्यद यांची आहे.

मात्र तेच अनभिज्ञ असल्यामुळे या ठिकाणी सर्व अनागोंदी व भ्रष्ट कारभाराचा बोलबाला राजरोसपणे सुरू आहे. या सर्व प्रकाराकडे जिल्ह्याचे प्रमुख असलेले जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. कारण दुकानदारांकडून अव्वाच्या सव्वा भाडे वसूल केले जात आहे. तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर देखील नियमबाह्य भाडे वसूल करण्याची मोहीम जोरदारपणे सुरू आहे.

धाराशिव शहरातील ख्वॉजा शमशोद्दीन गाजी रहे हा दर्गाह पवित्र दर्गाह म्हणून भारतात प्रसिद्ध आहे. त्यामुळे या ठिकाणी दरवर्षी उर्स दरम्यान मोठे-छोटी पाळणे, मौत का कुवा आदींसह विविध खाद्य पदार्थांची दुकाने व साहित्य विक्रीचे स्टॉल्स उभारले जातात. यादरम्यान लाखो रुपयांची उलाढाल होत असते. त्यामुळे व्यापारी देखील आपले दुकान लावण्यासाठी प्रयत्नशील असतात.

वक्फ बोर्डाच्या नियमानुसार ८ बाय ९ फूट आकाराची जागा एका दुकानासाठी तर दोन दुकानांमध्ये १० फूट अंतर ठेवणे बंधनकारक आहे.

मात्र, दोन्ही दुकानाच्या मधील अंतर ठेवलेले दिसून येत नाही.

### पाळण्याची सुरक्षा रामभरोसे !

मोठे व छोटे पाळणे बसविण्यासाठी वेगवेगळ्या परवानग्या आवश्यक असतात. त्यामध्ये सर्वात महत्त्वाची परवानगी तो पाळणा चालण्यासाठी योग्य आहे की नाही ? तो कोणत्या साली तयार केलेला आहे, त्याची वैधता किती तारखेपर्यंत आहे ? इन्सुरन्स चालू आहे का? एका पाळण्याची वहन क्षमता किती किलो वजन करण्याची आहे ? तसेच पाळणा फिरताना जर तुटला तर कमीत कमी १०० फूट परिसरापर्यंत योग्य त्या प्रमाणात लाल माती किंवा गाद्या अंथरल्या आहेत किंवा नाहीत ? सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे पाळणे विद्युत प्रवाहावर फिरत असल्यामुळे त्यामध्ये करंट उतरणार नाही ना ? आदी परवानगी घेणे बंधनकारक असते. मात्र यापैकी काही परवानग्या न घेताच पाळणे देखील थाटले गेले आहेत.

### देखरेखीची जबाबदारी कोणाची?

दर्गाह परिसरामध्ये निविदेप्रमाणे दुकाने थाटली आहेत किंवा नाहीत ? तर पाळणे व इतर कामे नियमाप्रमाणे होत आहेत किंवा नाहीत ? तसेच या ठिकाणी कोणता अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यक ती खबरदारी व प्राथमिक सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाहीत ? यावर देखरेख करण्याची जबाबदारी जिल्हा वक्फ अधिकारी आमेर सय्यद यांची आहे. मात्र ते यापासून पूर्णतः अनभिज्ञ असल्याचे दिसून येत आहे.

### भाडे ठेकेदाराच्या खिशात !

या दर्गाह परिसरातून म्हणजेच एकदम समोरून बोरफळ माढा हा राज्यमार्ग गेलेला आहे. या मार्गावर दुकाने थटण्यासाठी अजिबात परवानगी दिलेली नाही. मात्र या रस्त्यावर ठेकेदाराने अवैधरित्या व मनमानीपणे दुकाने बसविलेली आहेत. शिवाय त्या जागेचे भाडे देखील ठेकेदाराने आपल्या खिशात घातले आहे. मात्र बाहेर गावचे व्यापारी असल्यामुळे याबाबत वाच्यता करण्यास धजावत नाहीत.

### वक्फ बोर्डाची जागा किती?

वक्फ बोर्डाची दरगाह परिसरात गट नंबर ४२८ मध्ये जागा आहे. ती जवळपास ५ किलो मीटर अंतर परिसरामध्ये विस्तारलेली आहे. तसेच उर्स साजरा करण्यासाठी दुकाने, पाळणे व स्टॉल्स या दर्गाह लगतच्या १८० बाय १५० फूट व २५० बाय १५ फूट अशा एकूण २७ हजार जागेवर थाटली जातात. एका दुकान ८ बाय ९ फूट एवढ्या जागेवर बसविण्यास परवानगी दिलेली आहे. तर दोन दुकानांमध्ये १० अंतर ठेवणे आवश्यक व बंधनकारक करण्यात आलेले आहे. मात्र, अशा प्रकारचे अंतर राखल्याचे दिसून येत नाही.



धाराशिव : यंदाच्या वर्षी मकरसंक्रांत या सणाचा महापुण्यकाल हा सकाळी नऊ वाजेपासून संध्याकाळी जवळपास सहा वाजेपर्यंत असल्यामुळे मंदिरात महिलांनी वानवसा करण्यासाठी गर्दी केली नव्हती. गर्दी नसल्यामुळे सर्व महिलांनी निवांत पूजा करून एकमेकींना वाणाची, तिळगुळाची देवाणघेवाण करत सणाचा निर्भेळ आनंद लुटला! (छाया-ऐश्वर्या सक्राते)

## अ‍ॅड. प्रभाकर पाटील व अ‍ॅड. दादाराव कातपुरे यांची नोटरी पदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जानेवारी -**

अतिरिक्त जिल्हा न्यायालय उमरगा येथे मागील अनेक वर्षांपासून वकीली व्यवसायात पारंगत असलेले अँड. प्रभाकर उर्फ बापू पाटील व अ‍ॅड. दादाराव कातपुरे यांची भारत सरकारच्या नोटरीपदी निवड करण्यात आली आहे.





अ‍ॅड. प्रभाकर पाटील व अ‍ॅड. दादाराव कातपुरे यांच्या नियुक्तीचे उमरगा तालुका परिसरातून स्वागत करण्यात येत आहे.

नोटरी पब्लिक ऑटर्नी म्हणून वकील यांना ओळखले जाते.

अ‍ॅड. प्रभाकर पाटील बलसुर व दादाराव कातपुरे माडज यांची त्यांच्या गावातून व उमरगा तालुक्यातून निवडी बद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## पोदार स्कूलमध्ये क्रिडा दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव शाळेचा आठवा वार्षिक क्रीडा दिवस मोठ्या उत्साहामध्ये आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश वसंत जाधव, अमोल गुंड, तहसीलदार डॉ. मृणाल जाधव, एपीआय विलास हजारे, प्राचार्य फादर अमोल, संदीप बर्डे, प्रसाद पोंक्षे, प्रतिक्षा अवस्थी, प्रज्ञा अवस्थी, प्राचार्य रम्या तूतिका, उपप्राचार्य निलेश जाधव, प्रशासकीय अधिकारी जीवन कुलकर्णी, रेश्मा संकपाळ आदी मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.




या कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद तथा जिजाऊ मासाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पोदार शाळेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करून करण्यात आले.

त्यानंतर मार्च पास करून वेगवेगळ्या कसरती देखील करण्यात आल्या आणि त्यानंतर अनेक प्रकारचे खेळ घेऊन या कार्यक्रमाचे बक्षीस वितरण देखील करण्यात आले.

## वाकडी येथे होणार कुस्ती निवड चाचणी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ जानेवारी -**

परंडा तालुक्यातील वाकडी येथे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची धाराशिव जिल्हा निवड चाचणी स्पर्धा वाकडी या ठिकाणी होणार आहे.

ही स्पर्धा २३ व २४ जानेवारी रोजी होणार आहे. ह्या कुस्त्या जिल्हा कुस्तीगीर संघ यांनी बैठक घेऊन कार्यकारणी च्या बैठकीत सर्वानुमते वाकडी या ठिकाणी कुस्ती चाचण्या स्पर्धा वाकडी येथे घेण्याचे एकमताने ठरले. ही स्पर्धा वाकडी येथे परांडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा परांडा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे यांनी आयोजित केली आहे.

यावेळी महाराष्ट्र कुस्तीगिर संघांचे उपाध्यक्ष, डबल उपमहाराष्ट्र केसरी बाळासाहेब पडघण, जिल्हाध्यक्ष विशाल देवकर, वस्ताद नवनाथ जगताप, राजाभाऊ देवकते, ज्ञानेश्वर गोडगे, श्रीराम गोडगे, भारत डाकवाले, मारुती बारस्कर, शिवाजी कदम, बालाजी बुरंगे आदि उपस्थित होते.

## श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

**गणपती मंदिरासमोर हैदराबादच्या भाविकांच्या सोन्याच्या हारावर चोरट्यांचा डल्ला...**

**मंदिर प्रशासनाचा कारभार... सुरक्षा व्यवस्था धोक्यात...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

तेलंगणा राज्यातील जिल्हा रंगा रेड्डी तालुका नामपल्ली हैदराबाद येथील तुळजाभवानी देवीचे भक्त सिताराम बाग, अजित बाग हे त्यांच्या कुटुंबीयांसोबत दि.३१ डिसेंबर रोजी देवीच्या दर्शनासाठी तुळजापूर शहरात आले होते. सर्व कुटुंबीयांसोबत देवी दर्शनासाठी साधारण सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास मंदिरात गेले होते. तुळजाभवानी मंदिर परिसरातील निंबाळकर दरवाजापाशी असणाऱ्या गणपती मंदिरासमोर सिताराम बाग यांची आई शोभाबाई बाग यांच्या गळ्यातील ३० ग्रॅम वजनाच्या सोन्याचा हार अंदाजे किंमत एक लाख वीस हजार किमतीचा अज्ञात चोरट्यांनी लंपास केला. फिर्यादी आनंदकुमार डुके यांनी ११ जानेवारी रोजी तुळजापूर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीवरून कलम ३०३ नुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे पुढील तपास पोलीस करत आहेत.



तुळजाभवानी मंदिरात साधारण २०० सुरक्षारक्षक असताना देखील भाविक सुरक्षित नसल्याचे सदरील घटनेवरून लक्षात येते. पोलीस प्रशासनासह मंदिर प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे तुळजाभवानी मंदिरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून तुळजाभवानी मंदिरात बनावट पुजारी आणि एजंटांनी भाविकांची आर्थिक लूटमार करतात म्हणून अधिकृत पुजाऱ्यांनी वेळोवेळी तक्रारी केल्या पण याकडे मंदिर प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. भाविकांची आर्थिक लूट करत आता चोऱ्याचे देखील प्रमाण वाढले असून अधिकृत पुजाऱ्यांनी अनेक वेळा मंदिर प्रशासनास बायोमेट्रिक ओळखपत्राची मागणी केली आहे. तुळजाभवानी मंदिरात वाढणाऱ्या गैरप्रकारावर जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष काय ठोस उपाययोजना करणार याकडे पुजार्यांसह भाविकांचे लक्ष लागले आहे.

मंदिर प्रशासनाने आशा बनावट पुजारी आणि एजंटावर ठोस कारवाई करून भाविकांची होणारी पिळवणूक थांबवावी.

विनम्र अभिवादन... विनम्र अभिवादन...
भावपूर्ण श्रद्धांजली...



४ थे पुण्यस्मरण!
बुद्धवासी.
बापुसाहेब नरहरी शिंदे
नायब तहसीलदार
यांना ४ थ्या
पुण्यस्मरणानिमित्त
विनम्र अभिवादन...!

बुद्धवासी. बापुसाहेब नरहरी शिंदे
मा.ना. तहसीलदार, परंडा

सर्वांसाठी देह झिजवला...
कष्टातून आनंद फुलविला...
उरली नाही साथ आम्हाला...
आठवण येते क्षणाक्षणाला...

अभिवादक :- शिंदे परिवार परंडा,
घोडके परिवार, चंदनशिवे परिवार.

धाराशिव
# जिल्हा
**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नगर परिषदेच्या नविन अग्नीशामन गाडीचे पूजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

तुळजापूर शहराच्या बाह्य ठिकाणी हद्द वाढ भागामध्ये सद्य परस्थितीला मोठ्या प्रमाणामध्ये नव्याने बांधकाम कामे होत आहेत. नविन अग्नीशामन वहान गाडीची व्यवस्था आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शासन दरबारी प्रयत्न करुन न.प.च्या माध्यमातुन शहरास नविन अग्नीशामन गाडी



उपलब्ध करुन दिली.

या नविन अग्नीशामन वहान उपलब्ध करुन दिल्या बद्दल आ. पाटील यांचे शहवासियांकडुन आभार व्यक्त होत आहेत.

यावेळी पुजन हे महंत वाकोजी महाराज, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, नगरसेवक अमर हंगरेकर, किशोर साठे, अविनाश गंगणे, औदुंबर कदम, नरेश अमृतराव, भाजपचे शांताराम पेंदे, शुभम क्षिरसागर, कार्यालयीन अधिकक्ष वैभव पाठक, अग्निशामन कर्मचारी देविदास देवकते आदींच्या हस्ते पुजन करण्यात आले.

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'ज्ञानज्योती' संस्था सदैव तत्पर : आकांक्षा चौगुले

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जानेवारी -**

तालुक्यातील गृहउद्योग चालविणाऱ्या महिला भगिनींनी तयार केलेल्या वस्तूंना चांगली बाजारपेठ उपलब्ध झाल्यास जास्तीत जास्त मालाचा खप होऊन महिला आर्थिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. यासाठीच ज्ञानज्योतीच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी ज्ञानज्योती संस्थेच्या माध्यमातून सदैव तत्पर असल्याची ग्वाही अॅड. आकांक्षा चौगुले यांनी दिली.

ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्था उमरगा, ग्रामऊर्जा फाउंडेशन, अंबाजोगाई, युथएड फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव जिल्ह्यात




शनिवार दि.११ ते १२ जानेवारी २ दिवस श्रीराम मंगल कार्यालय, उमरगा येथे उद्योजकता एस समिट २०२५ व मकर संक्रातीनिमीत्त महिलांसाठी भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या समीटमध्ये उमरगा तालुक्यातील जवळपास २८ उद्योजकांनी सहभाग नोंदवत आपल्या उद्योगा विषयी कल्पना सादर केल्या.

यापैकी ५ स्पर्धकांची निवड बेंगलोर येथे होणाऱ्या राष्ट्रीय एस समीटसाठी झाली आहे. त्यांना उद्योजक प्रशिक्षण संदर्भात ७ दिवसीय बुटकॅम्प व व्यवसाय विकासासाठी लागणारे मार्गदर्शन मिळणार आहे.

अजित जाधव पाटील जनाई मिल्क प्रॉडक्ट रा. एकोंडी लो., राधा थोरे, सुरभी ब्युटी पार्लर उमरगा, प्रीती दयानंद सुतार, आदर्श महिला उत्पादक गट तुगाव, शुभांगी शाईवाले, शाईवाले अँड ग्रुप, अस्मिता सूर्यवंशी शेवया उद्योग गुंजोटी हे स्पर्धक विजेते ठरले असुन त्यांना उपाताई गायकवाड व पोलीस निरीक्षक आश्विनी भोसले, ज्ञानज्योती संस्थेच्या अध्यक्षा आकांक्षा चौगुले यांच्या शुभहस्ते विजेते प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमात जवळपास १८ विविध साहित्य व खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी ज्ञानज्योती संस्थेच्या अध्यक्षा अॅड. आकांक्षा चौगुले, ग्रामऊर्जा फाऊंडेशनचे अध्यक्ष दादासाहेब गायकवाड, प्रा. वर्षा मरवाळीकर, ज्योती चौगुले, नगराध्यक्षा वैशाली खराडे, नगरसेविका सारिका बंगले, अमर देशटवार आदी उपस्थित होते.

## भवानी रोडवरच पोलिसांच्या प्रायव्हेट वाहनाची बेशिस्त पार्किंग



### जिल्हाधिकाऱ्यांचे नियम धाब्यावर

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

भाविकांना चार चाकी वाहनाचा त्रास होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी यांनी भवानी रोडवरील तिकीट मधून गेटमधून चार चाकी वाहनांना एन्ट्री बंद केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे नियम धाब्यावर बसवून पोलीस प्रशासनाचा मनमानी कारभार चालू असल्याचे चित्र भवानी रोडवरील गेट जवळ बेशिस्त पार्किंग केलेल्या प्रायव्हेट पोलीस वाहनाकडे बघितल्यानंतर लक्षात येते. जिल्हाधिकाऱ्यांचे नियम केवळ जनतेसाठी आणि पोलीस प्रशासनाला यातून सूट दिली का? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला भवानी रोडवर बेशिस्त पद्धतीने पार्किंग केलेल्या या वाहनाकडे बघून पडत आहे.

दि.१३ जानेवारी रोजी संक्रांतीनिमित्त महिलांच्या खरेदीसाठी भवानी रोडवर अनेक व्यापाऱ्यांनी रोडच्या मधोमध दुकाने थाटली होती. खरेदीसाठी येणाऱ्या महिलांची तुफान गर्दी तसेच तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या देखील त्याचप्रमाणे अशा गर्दीमध्ये भवानी रोडवरील गेटवरून कुठल्याही चार चाकी वाहनाला एन्ट्री नसताना एक चार चाकी वाहन (क्रमांक एमएच २३/ड ५४९१) हे वाहन गेटमधून एन्ट्री करून गेट जवळच रस्त्याच्या मधोमध बेशिस्तपणे पार्किंग केलेले होते. सदरील वाहनाकडे पाहिले असता गाडीच्या डॅशबोर्डवर पोलिसांची टोपी आणि काचावर पोलिसांचा ट्रेडमार्क असलेला लोगो लावला होता. असं दिसल्यावर भवानी रोडवर कर्तव्यास असणारे ट्राफिक पोलीस देखील अशा वाहनांवर कुठलीही दंडात्मक कारवाई करत नाहीत. दंडात्मक कारवाई केवळ भाविकांच्या वाहनावर केली जाते.

भाविकांना रोडवर लावलेल्या फेरीवाल्यांचे दुकान आणि अशा बेशिस्त लावलेल्या गाड्यामधून वाट काढताना नाहक त्रास सहन करावा लागत होता. जिल्हाधिकाऱ्यांचे नियम मोडणाऱ्या अशा वाहनावर पोलीस जिल्हा अधीक्षक काय कारवाई करणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

## वाशी पोलीस ठाणे हद्दीत स्फोट; बॉम्ब शोधक पथकाची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ जानेवारी -**

वाशी पोलीस ठाण्यात ६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अचानक स्फोट झाल्याने मोठा आवाज झाला. स्फोटानंतर बॉम्बशोधक पथकाने सायंकाळपर्यंत तपासणी केली.

परंतु अद्याप पर्यंत स्फोटाचे कारण समजले नाही. स्फोटात अर्ध्या झालेल्या वस्तू व म तिचे नमुने घेऊन प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविले आहेत. पूर्वी पोलीस कर्मचाऱ्यांची घरी होती. त्यात त्या ठिकाणीच पोलीस ठाण्याच्या पूर्वे स्फोट झाला आहे. त्यांच्या शेजारी दुकाने व काही घरे आहेत. शेजारील ग्राहक सेवा केंद्रातील एक महिला कर्मचाऱ्यांच्या डोळ्याला काचेचा तुकडा लागला असल्याचे दिसून येते.

मोठ्या आवाजाने काचा तुटून पडलेल्या आहेत. स्फोट नेमका कशामुळे झाला व कशाचा याचे मात्र अद्याप उघडले नाही. स्फोटाने शेजारील दुकानातील स्किन, काचेची टेबल व इतर काही साहित्य तुटून पडलेले दिसून येत आहे.

बॉम्ब शोधक पथकाला पाचारण करण्यात आले. असून ते आल्यानंतर स्फोटाचे खरे कारण समजून येऊ शकले.

## उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

ऑक्टोबर २०२४ मध्ये श्री तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर येथे शारदिय नवरात्र महोत्सव शांततेत पार पडला. या महोत्सवात सामाजिक सलोखा अबाधित ठेवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न होता सर्व काही शांततेत पार पडले. या शारदिय नवरात्र महोत्सवात उत्कृष्ट काम करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचा पोलीस अधीक्षकांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

तुळजापूर शारदिय नवरात्र महोत्सव बंदोबस्त यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल पोलीस निरीक्षक रविंद्र खांडेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव, विठ्ठल चासकर, सुरेश नरवडे, पोलीस उपनिरीक्षक विजय थोटे, कल्याण पवार, अनिल धनोरे, पोलीस अंमलदार गोवर्धन माने, अनुप गायकवाड, पोलीस हेड कॉन्स्टेबल महादेव राऊत, कमलकिशोर राऊत, रवी भागवत यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तुळजापूर शारदीय नवरात्र महोत्सव बंदोबस्त व्यवस्थेचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि समर्पण खरोखरच कौतुकास्पद गौरवोद्गार पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी यावेळी काढले.

तुळजापूर येथील शारदीय नवरात्र महोत्सवात नेमुन देण्यात आलेली भुमिका आणि जबाबदाऱ्यांप्रती असलेली बांधिलकीमुळे बंदोबस्त यशात महत्वपूर्ण योगदान दिले असेही ते म्हणाले.

## शाळा, महाविद्यालयांतून होणार जिजाऊ-विवेकानंद विचारांचा जागर; हळदी-कुंकवातही वाटले जाणार पुस्तिकांचे वाण



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जानेवारी -**

दि.१२ जानेवारी रोजी स्वराज्याच्या प्रेरणास्रोत राजमाता जिजाऊ तसेच विवेकवादी, विज्ञाननिष्ठ आणि समाजवादी स्वामी विवेकानंद यांचा जन्मोत्सव देशभर साजरा केला जातो.

या दोन्ही महामानवांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने यंदा उमरगा-लोहारा परिसरातील शाळा व महाविद्यालयांतून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा जागर करण्याचा तसेच हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांतही जिजाऊ-विवेकानंद यांच्यावरील पुस्तिका वाण म्हणून लूटण्याचा महत्वपूर्ण उपक्रम प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालयाच्या वतीने राबवण्यात येणार आहे. या उपक्रमाची रुपरेषा वाचनालयाचे संकल्पक अॅड. शीतल चव्हाण यांनी मांडली आहे.

या उपक्रमांतर्गत उमरगा-लोहारा परिसरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये न्याय्य स्वराज्याच्या शिल्पकार-राजमाता जिजाऊ या दर्शना पवार लिखित तर विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी विवेकानंद या डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर लिखित पुस्तिकेच्या प्रत्येकी ५०० प्रतींचे वाटप केले जाणार आहे. या पुस्तिकांचे शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून वाचन करून घेऊन, त्यावर निबंध लिहून घेऊन, भाषणे व परिसंवाद आयोजित करून जिजाऊ-विवेकानंद विचारांचा जागर केला जाणार आहे. तसेच यंदाच्या मकरसंक्रांती ते रथसप्तमी या दरम्यान होणाऱ्या हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांतदेखील महिलांना या दोन पुस्तिका वाण म्हणून लूटण्यास दिल्या जाणार आहेत.

## तेर येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१४ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्यातील शासकीय व शासनमान्य सार्वजनिक वाचनालय मध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री नरसिंह सार्वजनिक वाचनालयात हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

जिजाऊ मासाहेब यांच्या जयंतीच्या निमित्ताने जिजाऊ मासाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यंकटराव माळी, हनुमंत कोळपे, महादेव आगाशे, दत्ता वैद्य यांचे प्रमुख उपस्थित होती. यावेळी उपस्थित उपस्थित सर्व पत्रकार, ग्रामस्थ, महिला यांना दर्जेदार वाचणे असे पुस्तक भेट देण्यात आले.यावेळी वाचनालयाच्या ग्रंथपाल मिना वसंतराव वडवले, स्वाती भक्ते, संगिता वैद्य, वैशाली सौदागर, अमोल सौदागर, अमोल सावंत यांची उपस्थिती होती.

अॅड. शीतल चव्हाण यांनी म्हटलेल्या या उपक्रमास सत्यनारायण जाधव, राजू भालेराव, राजू बटगिरे, अॅड. ख्वाजा शेख, अॅड. अर्चना जाधव, प्रदिप चौधरी, किशोर बसगुंडे, किशोर औरादे, ज्योती माने, करीम शेख, धानय्या स्वामी, प्रदिप मोरे, अनुराधा पाटील, बबिता मदने, शबाना शेख, निर्मला देशमुख, यशोदा पवार आदी सहकाऱ्यांनी अनुमोदन दिले.

## उणिवा पूर्ण करताना केलेला संघर्ष इतिहास निर्माण करतो : ममता सपकाळ

### ममता सपकाळ यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार प्रदान...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

माणसाच्या जगण्यामध्ये काही उणिवा असतील तर त्या उणिवा पूर्ण करत असताना जो संघर्ष केला जातो. तो संघर्ष इतिहास निर्माण करतो. अनाथांची माई सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या प्रसिद्ध गजलकार ममता सपकाळ यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार गुरुवर्य हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर आणि गुरुवर्य महंत तुकोजीबुवा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना, असे उद्गार ममता सपकाळ यांनी काढले.




महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या तुळजाई नगरीत पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर संस्कार भारती प्रदेशाध्यक्षा स्नेहल पाठक, सरपंच परिषद प्रदेशाध्यक्षा जिनत कोहिनूर सय्यद, मंदिर तहसीलदार माया माने, विनय सिंधुताई सपकाळ, पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी, शुभांगी पुजारी आदींची उपस्थिती होती.

सत्काराला उत्तर देताना ममता सिंधुताई सपकाळ पुढे म्हणाल्या की, माझी आई मला एक दिवसासाठी आणून द्या, अशी भावस्पर्शी कविता सादर करून आपल्या भावना व्यक्त करण्यास सुरुवात केली महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या चरणी मी पहिल्यांदाच नतमस्तक झाले आहे. मी तुळजापूरकरांचा सदैव ऋणी राहील अशा शब्दात त्यांनी या पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया दिली. माईनी जे सोसलं त्यामुळेच त्यांनी हे सामाजिक कार्य व सेवा प्रकल्प उभे केले.

जे माईनी काम सुरू केलं होतं ते आयुष्यभर सुरू ठेवलं तेच काम पुढे सुरू ठेवण्याचा संकल्प आम्ही केलेला आहे आणि माईचने ते काम आजही त्यांच्याच पद्धतीने चालू आहे हे सांगताना मला माझं मन भरून आला आहे, असेही ममता सपकाळ यांनी सांगितले. पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रा. विवेक कोरे, प्रास्ताविक अनिल आगलावे तर आभार डॉ. सतीश महामुनी यांनी मानले.

या पुरस्कार सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने महिलांसह नागरिकांची गर्दी झाली होती.

### पुरस्काराचे स्वरूप...

तुळजाभवानी मातेला नेसवलेली मनाची पैठणी, कवड्याची माळ, शाल, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे होते. पुजारी नगर फाऊंडेशनतर्फे अनाथ मुलांच्या शैक्षणिक खर्चासाठी ५१ हजार रुपयाचा धनादेश मान्यवरांच्या उपस्थितीत ममताताईंना देण्यात आला.

## पत्रकार आणि लोकप्रतिनिधी यांनी सकारात्मक दृष्टीकोन बाळगून काम करावे

### सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे प्रतिपादन...

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१४ जानेवारी -**

चाकूर येथे सिटी प्रेस क्लबच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रातील विविध पुरस्कारांचे वितरण राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते दि.१२ जानेवारी रोजी देण्यात आले.

समाजाच्या विकासासाठी पत्रकार आणि लोकप्रतिनिधींनी हातात हात घालून काम करणे अतिशय महत्वाचे असून यासाठी दोघांनीही सकारात्मक दृष्टीकोण बाळगणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माहिती विभागाचे विभागीय सहाय्यक संचालक डॉ. श्याम टरके होते. याप्रसंगी सत्कारमूर्ती तथा पत्रकारिता पुरस्काराचे मानकरी विभागीय उत्कृष्ट पत्रकारिता



पुरस्कार मंगेश डोंग्रजकर यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्या मातोश्री कमलनी अमृतराव डोंग्रजकर, कन्या शर्वरी मंगेशराव देशपांडे, शशिकांत घोणसे पाटील, नरसिंह घोणे आणि संजीव पाटील हे मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते सर्व सत्कारमूर्तींचा सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास काँग्रेसचे विलासराव पाटील, राष्ट्रवादीचे भानुदास पोटे, मुर्तुजा सय्यद, अनिल वाडकर, साईप्रसाद हिप्पाळे, शिवदर्शन स्वामी, बाळू लाटे, गणपत कवठे, हुसेन शेख, शरद किणीकर, ज्ञानेश्वर चाकूरकर, अॅड. संतोष गंभीरे, अॅड. संतोष माने, अॅड. श्रीधर सोनटके, विश्वनाथ एडके, विष्णू तिकटे, मोहन कुलकर्णी, संतोष फुलारी, प्रशांत शेटे, संग्राम वाघमारे, सुधाकर हेमनर, गणेश स्वामी, अलीम शेख, अजगर मचकूरी, हाकाणी सौदागर, संदीप शेटे, युनुस सय्यद, प्रा.रमेश शिंदे, तौफिक शेख, अजित सौदागर, मतीन गुळवे, चंद्रमणी सिरसाठ, जाफर सय्यद, शिवाजी शिंदे, शिरीष शिंदे, सचिन तोर यांच्यासह चाकूर तालुक्यातील विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते.

**जाहिरनामा**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

जा.क्र. २०२५/एम.ए.जी/कावि- दि.१३/०१/२०२५
**अर्जदार :- श्रीमती शेख फयाज उस्मानसाब रा. चाकुर ता. चाकुर**
**विरूध्द**
**गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकुर ता. चाकुर**
**अर्ज :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **श्रीमती शेख फयाज उस्मानसाब रा. चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर** यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार त्यांची मुलगी **शेख तस्लीम फयाज जन्म दिनांक ०३/०३/१९९८** रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्राम सेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने त्याच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि.लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि. १३/०१/२०२५ पुढील तारीख ३१/०१/२०२५
आदेशावरून
स्वाक्षरित /-
तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर

**जाहिरनामा**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

जा.क्र. २०२५/एम.ए.जी/कावि-६४० दि.१३/०१/२०२५
**अर्जदार :- श्रीमती शेख शब्बाना महताबसाब रा. चाकुर ता. चाकुर**
**विरूध्द**
**गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकुर ता. चाकुर**
**अर्ज :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात **अर्जदार श्रीमती शेख शब्बाना महताबसाब रा. चाकुर, ता. चाकुर जि. लातुर** यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत त्यांचा स्वताःचा जन्म **दिनांक १३/०९/१९७९** जन्म रोजी राहत्या घरी झाला असून मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने त्याच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत /ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि. १३/०१/२०२५ पुढील तारीख
३१/०१/२०२५
आदेशावरून
स्वाक्षरित /-
तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## गृहनिर्माण संस्थाच्या निवडणूक नामतालिकेसाठी अर्ज करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** लातूर विभागातील लातूर, बीड, नांदेड व धाराशिव या जिल्ह्यातील ई वर्ग संस्था (२५० पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी सभासद असणाऱ्या) सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका घेण्यात येणार आहे. यासाठी नियुक्त करावयाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांची नामतालिका तयार करण्यासाठी २० ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज करण्याचे आवाहन विभागीय सहनिबंधक सुनिल शिरापूरकर यांनी केले आहे.

अर्ज सादर करण्यासाठी पुढीलप्रमाणे पात्रता असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. १. शासकीय विभागातील (सहकार विभागातील कार्यरत अधिकारी,कर्मचारी वगळून) स्थानिक स्वराज्य संस्थेतील, सहकारी संस्थेतील कायम कार्यरत अधिकारी, कर्मचारी (वरिष्ठ लिपीक किंवा त्यापेक्षा जादा दर्जा असलेले कर्मचारी), २. प्रमाणित लेखापरीक्षक, ३. वकील ( पाच वर्षाचा कामाचा अनुभव), ४. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेला अधिकारी, कर्मचारी (वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसलेले).

विहित नमुन्यातील अर्ज २० जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी, २०२५ या कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर (पत्ता-मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, लातूर), जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड (पत्ता- सहकार शक्ती इमारत, जालना रोड, बीड), जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड (पत्ता-सहकार भवन, भुविकास बँक इमारत, दुसरा मजला, आयटीआय समोर, नांदेड), जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज मिथ३१ जानेवारी, २०२५ अखेर संबंधित कार्यालयात सादर करावेत.



### संक्षिप्त वृत्त...

## भरधाव हायवा डंपरने कारला जोराने उडवले : पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** भरधाव हायवा-कारची जोराची धडक झाल्याची घटना लातुरातील मळवटी चौक, रिंगरोड येथे घडली. याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी सांगितले, शामकांत व्यंकटराव चव्हाण (वय ६०, रा. गंगासागर रेसिडेन्सी, रिंगरोड लातूर) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. भरधाव हायवा डंपर (एमएच २४ एयू ११११) च्या चालकाने हायगय व निष्काळजीपणे चालवून चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करत फिर्यादीच्या कारला (एमएच १२ व्हीव्ही १७१०) जोराची धडक दिली. यामध्ये कारचे जवळपास १ लाखाचे नुकसान झाले. शिवाय, घटनास्थळावरून डंपरचालक पसार झाला.

## माँ जिजाऊ,स्वामी विवेकानंद यांची जयंती महाविद्यालयात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ जानेवारी -** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे माँ जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती सांस्कृतिक विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. या जयंतीच्या निमित्ताने प्रारंभी क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, स्टाफ सचिव डॉ. जयदेवी पवार यांच्या उपस्थितीत प्रतिमा पूजन व अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अंगद कोते, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ.अजित भांजी, प्रा.महारुद्र बिडवे, प्रा. संतोष कल्याणकर, अकुंश थडकर यांच्या उपस्थितीत प्रतिमा पूजन व अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

## छोट्या-छोट्या यशातून मोठ्या यशाची प्रेरणा मिळते :सुधाकर तेलंग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** विद्यार्थांनी शिक्षणातून करिअरच्या वाटेकडे जाताना जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर मिळालेल्या छोट्या-छोट्या यशातून व त्यातून मिळालेल्या प्रेरणेतून मोठे यश मिळते असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळाचे लातूर विभागाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांनी केले.

यावेळी ते लातूरातील जेएसपीएम शिक्षण संस्था संचालित श्री स्वामी विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्यावतीने ११वी व १२वी च्या विद्यार्थांसाठी आयोजित यशासारखे यशदायी दुसरे काही नाही या विषयावरील आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेएसपीएम चे उपाध्यक्ष तथा भा.ज. यु. मो. चे प्रदेश उपाध्यक्ष मा श्री अजितसिंह पाटील कव्हेकर हे उपस्थित होते तर मंचावर प्राचार्य गोविंद शिंदे व प्राचार्य मारुती सूर्यवंशी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना सुधाकर तेलंग म्हणाले की, विद्यार्थांनी स्वतःच्या कौटुंबिक परिस्थितीची व ग्रामीण भागातील आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून अभ्यास करावा असे यावेळी ते म्हणाले.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १० जानेवारी, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २४ जानेवारी, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही.

# शिवरायांच्या पुतळा परिसराची दुरावस्था

## शिवभक्तांनी केली माँ जिजाऊ जयंतीदिनी स्वच्छता





**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांच्या पुतळा परिसरास महापालिका प्रशासनाच्या अनास्थेमुळे अवकळा आली असून आता मोकाट प्राण्यांचाही तेथे वावर वाढला आहे.

रविवारी माँ जिजाऊ जयंतीदिनी अभिवादनासाठी नागरिक तेथे गेले असता, त्यांना पुतळ्याच्या आतील भागात घाण दृष्टीस पडली व त्यांनी ती स्वत: स्वच्छ केली. शहर स्वच्छतेबाबत बेफिकीर असलेल्या महापालिकेने नागरिकांची श्रध्दास्थाने असलेली महापुरुषांची स्मारके तरी किमान स्वच्छ ठेवावीत, त्यांचे पावित्र्य राखावे, अशी अपेक्षा करीत महापालिकेच्या अनास्थेचा शिवभक्तांनी निषेध केला. छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे सुशोभिकरण करावे अन्यथा रस्त्यावर उतरू, असा इशारा यावेळी महापालिका प्रशासनास देण्यात आला.

मराठवाड्यातील अनेक शहरांत छत्रपती शिवरायांच्या स्मारकांचे सुशोभिकरण तेथील प्रशासन व लोकप्रतिनिधींनी केले आहे. शिवकाळाला साजेल व सर्वांना समाधान देईल, अशी सजावट व स्वच्छता तेथे आहे. परंतु, याबाबत लातूर शहरातील छत्रपती शिवरायांचा पुतळा मात्र अपवाद ठरला आहे. महापालिका व लोकप्रतिनिधींची अनास्था यास कारणीभूत आहे. पुतळ्याभोवतीच्या संरक्षण कठड्याचे पाइप तुटले आहेत. कठड्याला दार नसल्याने रात्री-अपरात्री मोकाट प्राणी तेथे जात आहेत व घाण करीत आहेत. विजेच्या वायर अनेक ठिकाणी उघड्या आहेत. काही झाडे सुकली आहेत.

या पुतळ्याचे सुशोभिकरण करावे, अशी मागणी गेली पाच वर्षांपासून लातूर जिल्हा मराठा क्रांती मोर्चा महापालिका आयुक्तांकडे करीत आहे. यासाठी त्यांनी आयुक्तांची वेळोवेळी भेट घेऊन निवेदने सादर केली आहेत. आयुक्तांना जायमोक्यावर बोलावून वस्तुस्थितीही दाखवली आहे. सुशोभिकरण आराखडाही दिला आहे. असे असले तरी आजतागायत त्यावर महापालिका प्रशासनाने काहीच कार्यवाही केली नाही.

शिडी नसल्याने महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करणे कठीण झाले आहे. तेथील ध्वजस्तंभही शिवप्रेमींनी स्वखर्चातून उभारला आहे. वेळ मारून नेण्यापुरती चर्चा करायची व त्यानंतर या कामांशी आपले काहीएक देणेघेणे नाही या भूमिकेत रहायचे, अशी मानसिकता महापालिका आयुक्तांनी या कामाबाबत अवलंबली असल्याचा आरोप यावेळी शिवप्रेमींनी केला. या विषयाबाबत लोकप्रतिनिधींही गंभीर नसल्याबद्दल त्यांच्याप्रतिही यावेळी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



### शक्य नसल्यास आम्ही स्वच्छता करू

शिवराय हे सर्वांचे आराध्य दैवत आहेत. त्यांचा पुतळा परिसर स्वच्छ ठेवणे, त्या स्थळाचे पावित्र्य राखणे याबाबत महापालिकेने गंभीर व कृतीशिल रहाणे अत्यंत गरजेचे आहे. याउपर त्यांना हे काम करावे वाटत नसेल तर आम्ही हाती झाडू घेऊ. किमान महापालिकेने तसे जाहीर करावे, अशी भावना यावेळी शिवभक्तांनी व्यक्त केली.

## लातूर उपक्रमास अनेकांच्या भेटी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या सहकार्याने आयोजित मराठवाड्यातील पहिले शैक्षणिक महासंमेलनात रीड लातूर उपक्रमाची माहीती देणारे एक दालन उभे केले होते.

याचा शुभारंभ राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख,आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी यासाठी रीड लातूर करत असलेल्या कार्य समाजहिताचे असून यातून एक समृद्ध पिढी निर्माण होईल असा विश्वास सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त करून रीड लातूर उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

यावेळी रीड लातूरचे संस्थापक धिरज विलासराव देशमुख यांनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ.शिवाजी काळगे,आमदार विक्रम काळे यांना उपक्रमाची सविस्तरपणे माहिती दिली. तीन दिवसीय शैक्षणिक महासंमेलनात रीड लातूरदालनास अनेकांनी सहपरिवार भेट दिली.

## दुर्धर आजार रोखण्यासाठी लातुरात जनजागृती रॅली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** राज्य शासनाच्या मिशन शंभर दिवस ॲक्शन प्लॅनअंतर्गत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विविध आजारांसंदर्भात रविवारी जनजागृती रॅली काढण्यात आली.

प्रारंभी, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या रॅलीस अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते व इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ करण्यात आला.

यावेळी उपअधिष्ठता डॉ. शैलेश चव्हाण, डॉ. अजय ओहाळ, डॉ. महादेव बनसुडे, डॉ. मेघराज चावडा, डॉ. किशोर जाधव, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, डॉ. उमेश लाड, डॉ. मंगेश सेलूकर, आयएमएचे सहसचिव डॉ. विकास सोळंके, डॉ. संगमेश चावंडा, डॉ. विमल होळंबे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव, अतिविशेषोपचार रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. सुनील होळीकर, अधिसेविका अमृता पोहरे, लक्ष्मीबाई आपटे, अंजना गिरी, राम सूर्यवंशी आदींची उपस्थिती होती. यावेळी ॲनिमिया, ब्लड कॅन्सर, ब्रेस्ट कॅन्सर, थैलॅसेमिया आदी आजारांसंदर्भात माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. नागरिकांनी व्यसनापासून दूर राहावे. रक्तातील उद्भवणारे आजार यासंदर्भात माहिती देण्यात आली. आयएमएचे अध्यक्ष, शरीरविकृतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. उमेश कानडे यांनी विद्यार्थ्यांनी कमी वेळेत खूप सुंदर पोस्टर बनविल्याचे सांगितले. यावेळी अधिष्ठाता डॉ. मोहिते म्हणाले, बदललेल्या जीवनशैलीमुळे आजार वाढत आहेत.

## मुलांच्या अपयशाला शिक्षकांना जबाबदार धरता कामा नये :रेड्डी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** प्रत्येक जबाबदार पालकांना आपल्या मुलांची बौद्धिक क्षमता, कौशल्य ज्ञात असते. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या अपयशाला त्याच्या शिक्षकांना जबाबदार धरता कामा नये, असे प्रतिपादन अंबाजोगाईचे उपक्रमशील संस्थाचालक संदीपान रेड्डी यांनी केले.

लातुरात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने व धीरज देशमुख यांच्या कुशल नेतृत्व व मार्गदर्शनाखाली टाऊन हॉल मैदानावर चालू असलेल्या पहिल्या मराठवाडा शैक्षणिक महासंमेलनात रविवारी सायंकाळी भविष्यातील शिक्षण या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

यावेळी राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, लातूरचे उपक्रमशील संस्थाचालक सतीश नरहरे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे मराठवाडा शैक्षणिक महासंमेलनाचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरळे, उपाध्यक्ष विजय सहदेव, रवी नरहरे , विवेक सौताडेकर आदिंनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.



पालकांनी आपल्या मुलांना त्याच्या आवडीचे करिअर करण्यास प्रोत्साहन द्यावे, त्याला आपल्या जीवनात काय करायचे आहे ते विचारून त्याप्रमाणे त्याला योग्य दिशा द्या,असे सांगून संदीपान रेड्डी पुढे म्हणाले की, पालकांनी आपला मुलगा - मुलगी एखाद्या विषयात हुशार असेल, त्या विषयाबद्दल सखोल अभ्यास करण्याची त्याची तयारी असेल त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. आजमितीस पूर्व प्राथमिक शाळेतील प्रवेशासाठीही अडचणी येताना दिसतात.पण पुढील पाच वर्षात परिस्थिती खूप बदलेली असेल. आपला मुलगा हुशार, चाणाक्ष असेल तर त्याला कोणत्याही दर्जेदार शिक्षण संस्थेत शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील. शिक्षण तर सगळेच घेतात. पण आपल्या क्षमता ओळखून चालण्याचा प्रयत्न करणे अतिशय आवश्यक आहे.

आज आपल्याकडे महाविद्यालयीन शिक्षण घेणारे किमान ६३ टक्के किंबहुना त्यापेक्षा अधिक विद्यार्थी महाविद्यालयात जात नाहीत. याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे आठव्या इयत्तेपासूनच वाणिज्य विषयाची निवड करू शकतो. कौशल्य शिक्षणाने मुलांचे भवितव्य चांगले घडण्यास मदत होऊ शकते.

मोबाईलचा वापर वाढूनही आपल्याकडे आजही ९८ टक्के लोकांना इंटरनेटवर ईमेल कसा लिहायचा याची माहिती नाही. मुलांना नेतृत्व कौशल्य शिकविणे गरजेचे आहे. पालकांनी मुलांना त्यांचे करिअर निवडण्याचे पस्वातंत्र्य देणे आवश्यक असल्याचेही रेड्डी यांनी सांगितले.

## प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील राहू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** शिक्षकांमुळे आपले जीवन घडत असते. शिक्षक - मुख्याध्यापकांच्या अनेक न्याय मागण्या मागच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. या सर्व मागण्या, प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय संमेलनाच्या समारोपप्रसंगी बोलताना दिली.



अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणे व लातूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मुख्याध्यापकांच्या ६१ व्या दोन दिवसीय राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाची सांगता शनिवारी सायंकाळी उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

समारोप प्रसंगी खा. डॉ. शिवाजी काळगे , शिक्षक आमदार विक्रम काळे, के.एस. ढोमसे, वसंतराव पाटील, मारोती खेडेकर, मोहन सोनवणे, बजरंग चोले यांच्यासह मुख्याध्यापक संघाचे सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी शिक्षकांमुळेच आम्ही घडलो, शिक्षकांमुळेच उज्वल पिढी घडत असल्याचे सांगितले.

ग्रामीण भागात त्याकाळी अनेक कुटुंबातील आई वडील फारसे शिक्षित नसल्याने त्यांच्यानंतर मुलांना घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवरच येत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांना घडविण्यात शिक्षक - मुख्याध्यापकांचा वाटा मोठा असायचा. आज शिक्षण क्षेत्र खूपच प्रगत झाले आहे. शिक्षणाचे अनेक माध्यम , पर्याय उपलब्ध आहेत. तरीही शिक्षकांचे स्थान कायम अबाधित आहे. विद्यादानाने पिढी घडविण्याचे काम करणाऱ्या शिक्षक - मुख्याध्यापकांच्या अनेक प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही खा. डॉ. काळगे यांनी यावेळी दिली.

लातुरात पार पडलेले हे शैक्षणिक संमेलन उत्कृष्ट नियोजनामुळे अपेक्षेपेक्षाही अधिक यशस्वी झाल्याबद्दल त्यांनी संयोजकांचे अभिनंदन केले. आ. विक्रम काळे यांनी यावेळी बोलताना बदलत्या परिस्थितीत आता धावते जग झाले आहे. त्यामुळे अशा प्रकारची अधिवेशने, संमेलने फक्त एकच दिवस व्हायला हवीत म्हणजे संमेलनास उपस्थित असलेले सगळे लोक मोठ्या संख्येने हजर राहतील, असे मत व्यक्त केले. संमेलनाच्या आयोजनात प्रचंड खर्च, परिश्रम करूनही अशी स्थिती निर्माण होत असेल तर योग्य विचार होणे आवश्यक आहे. लातूर पॅटर्नची माहिती राज्यभरातील मुख्याध्यापकांना व्हावी या उद्देशाने लातुरात आलेल्या सर्व मुख्याध्यापकांचे आपण शिक्षक आमदार या नात्याने स्वागत करतो असे त्यांनी सांगितले. संयोजकांनी लातूरच्या दैदिप्यमान परंपरेला साजेल अशी भोजन, निवास व्यवस्था चोख केल्याबद्दल संयोजन समितीचे त्यांनी कौतुक केले.

शिक्षक - मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे बघावे, बाकीचे सगळे मी बघून घेतो.

लातुरात दोन दिवस चाललेल्या या राज्यस्तरीय संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे संयुक्त अध्यक्ष रावसाहेब आवारी, वसंतराव पाटील, अध्यक्ष के.एस. डोमसे, कार्याध्यक्ष मोहन सोनवणे, राज्य उपाध्यक्ष प्रकाश देशमुख, नंदकुमार बारवकर, शत्रुघ्न बिरकड, अशोक मोरे, संजय शिप्परकर, उपाध्यक्ष देविदास उमाटे, कांचन महाजन, नामदेव सोनवणे, जालिंदर पैठणे, सतीश जगताप, मंदा उमाटे, विनोद संगीतराव, सचिव विलास भारसाकळे, सचिव बजरंग चोले , कोषाध्यक्ष शिवराज म्हेत्रे, प्रवक्ते कालिदास शेळके, उपाध्यक्ष रमेश मदरसे, सचिन साबणे, उमेश पाटील आदिंनी परिश्रम घेतले.

## शेडम येथे भारतीय संस्कृती उत्सवाचे आयोजन : अनेकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ जानेवारी -** भारत विकास संगम या सामाजिक संघटनेच्या वतीने कर्नाटकातील कलबुर्गी जिल्ह्यातील प्रकृती नगर येथे दिनांक २९ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सातवा भारतीय संस्कृती उत्सव आयोजित करण्यात आला आहे या उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे अशी माहिती,भारत विकास संगमचे राष्ट्रीय सह संयोजक अशोक टांकसाळे, महादेव गोमारे यांनी येथे पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

प्रकृती केंद्रित विकासात समर्पित जगातील हा सर्वात मोठा उत्सव आहे असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

कर्नाटकातील प्रकृती नगर येथे आयोजित या भारतीय संस्कृती उत्सवाची सविस्तर माहिती अशोक टांकसाळे व महादेव गोमारे यांनी या पत्रकार परिषदेत बोलताना दिली .ते पुढे बोलताना म्हणाले की,भारत विकास संगम हा एक विचार मंच असून, समाजातील सक्रिय सकारात्मक कार्य करणाऱ्या सज्जन व्यक्ती - नव देवता व संस्था - नव तीर्थ यांच्या एकीकरणातून प्रकृती केंद्रित विकासाचे कार्य २००४ सालापासून देशभरात करत आहे. आता त्याचे चांगले परिणाम मिळत आहेत.

गाव आईची कुस आहे. ती सुरक्षित ठेवण्यासाठी पर्यावरण पूरक शेती, विकेंद्रित गृह,लघु उद्योग हीच आत्मनिर्भर ग्राम व निरोगी समाज विकासाची गुरुकिल्ली आहे. या विषयी ठोस कृती व अर्थपूर्ण मार्गदर्शन करण्याच्या हेतूने भारतीय संस्कृती उत्सव - ७ चे प्रकृती नगर सेडम जिल्हा कलबुर्गी येथे दिनांक २९ जानेवारी २०२५ ते ६ फेब्रुवारी २०२५ या काळात आयोजन करण्यात आले आहे .

२४० एकर क्षेत्रावर संपन्न होणाऱ्या वरील नऊ दिवसीय भव्य कार्यक्रमात साधारण पणे ३० लाख लोक, त्यात देशभरातून दहा हजार संस्था व संपुर्ण देशातून अनेक तज्ञ मान्यवर सहभागी होऊन याचा सकारात्मक संदेश जगातील ८० कोटी जनते पर्यंत पोहंचणार आहे.

या उत्सवात कृषी, ग्रामविकास, आहार, आरोग्य, उद्योग, सेवा,धर्म, संस्कृती व पर्यावरण या सर्व विषयातील तज्ञांचे अमूल्य मार्गदर्शन होणार आहे, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमास सौ. सुधा मूर्ती, इस्रोचे माजी प्रमूख सोमनाथ जी,केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, गोपाल भाई सुतारीया, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, बी. बी. ठोंबरे, जल तज्ञ श्रीराजेंद्र सिंह, पद्मश्री लक्ष्मण सिंह लापोडिया,ग्लोबल विकास ट्रस्ट चे श्री मयंक गांधी, वैद्य हितेश जानी, पंचगव्य चिकित्सक डॉ. डी पी रमेश, शिक्षण तज्ञ डॉ आशोक ठाकूर, श्री माधव रेड्डी थोर राष्ट्रीय चिंतक व भारत विकास संगम चे संस्थापक के एन गोविंदाचार्य आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१४ जानेवारी -**

महाराष्ट्राची अस्मिता, प्रेरणा आणि स्वराज्य जननी राजमाता जिजाऊंच्या जयंतीचे औचित्य साधून रेणापुर तालुक्यातील तत्तापुर ग्रामपंचायत आणि कलापंढरी संस्थेच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातून जिजाऊ आणि शिवरायाच्या कार्याला उजाळा देण्यात आला.



तत्तापुर येथे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शरद पवार तर उद्घाटन उपसरपंच लक्ष्मी गिरी यांनी केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून कलापंढरीचे अध्यक्ष बी.पी. सुर्यवंशी, ग्रा.पं. सदस्य कल्पना पवार, पोपटबाई पवार, शालू साके, मंगल पवार, कांताबाई वायदंडे आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...



### यात्रेनिमित्त आरोग्य शिबीर संपन्न

**उदगीर, दि.१४ जानेवारी -**

श्री गुरू हावगीस्वामी महाराज यांची यात्रा सुरु असून या यात्रेनिमित्त उदगीर येथील रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल व श्री बाल रुग्णालय व क्लिनिक यांच्या वतीने रविवार दि.१२ जानेवारी रोजी श्री हावगीस्वामी मठ संस्थान येथे मोफत बाल रोग व स्त्री रोग निदान शिबीर घेण्यात आले. यावेळी शिबीराचे उद्घाटन मठाचे मठाधिश श्री श्री डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले. या शिबीरात २५० पेक्षा जास्त रुग्णांची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी, सचिव ज्योती चौधरी, संतोष फुलारी, प्रमोद शेटकार, विशाल तोंडचीरकर, मंगला विश्वनाथे, सुनीता चवळे, अनिल मुळे आदींची उपस्थिती होती.

### बाळाराम बानापुरे यांचा सत्कार

**उदगीर, दि.१४ जानेवारी -**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक बाळाराम निवृत्ती बानापुरे यांचा संस्था पदाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी भा.शि.प्र.संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, डॉ. हेमंत वैद्य व विद्यासभा अध्यक्ष डॉ. जयंत जोशी यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व भारत एकात्मता स्तोत्र सचित्र दर्शन पुस्तक भेट देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा स्थानिक समन्वय समिती कार्यवाह शंकरराव लासुणे, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, शालेय समिती अध्यक्ष व्यंकटराव गुरमे, सर्व संस्था पदाधिकारी व मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांनी अभिनंदन केले.



### मुलींना मोफत कौशल्य प्रशिक्षण

**वलांडी, दि.१४ जानेवारी -**

१३ ते १८ वयोगटातील मुलींना सक्षम बनवण्यासाठी जगमंगल सोशल फाउंडेशन आणि ग्रामीण महिला विकास संस्थेच्या संयुक्त विद्यमाने स्वयम स्किल उपक्रमाचा शुभारंभ वलांडी येथे उत्साहात झाला. या उपक्रमातून मुलींना जीवन कौशल्य, संभाषण कौशल्य, डिजिटल साक्षरता आणि स्पोकन इंग्लिश यांचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. उद्घाटन सोहळ्याला स्वयमतेज अकॅडमी लातूरचे संचालक आकाश सोनकांबळे, ग्रामीण महिला विकास संस्थेच्या अध्यक्षा कुशावरता बेळे, गिरीश सबनीस, कचराताई गायकवाड, आजम पठाण, वैष्णवी मोरे आणि रेणुका होनकर यांसह ग्रामस्थ व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या मुलींची उत्सुकता दिसून आली.



### भूगोल दिन व मकरसंक्रांत संपन्न

**उदगीर, दि.१४ जानेवारी -**

लालबहादूर शास्त्री विद्यालयात भूगोल दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपमुख्याध्यापक अरुण पत्की प्रमुख वक्ते मीनाक्षी कस्तुरे प्रमुख उपस्थिती संस्था सभासद सुलभा कुलकर्णी माजी विद्यार्थिनी सुचिता संतपुरे पर्यवेक्षक कृष्णा मारावार माधव मठवाले, किरण नमेट, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख आशा गौतम या मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रमुख वक्त्या यांनी आपल्या मनोगततून मकर संक्रांतीचे व भूगोल दिनाचे महत्त्व कथन केले. याप्रसंगी सायली कुलकर्णी व क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडुंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रद्धा पाटील यांनी केले सूत्रसंचालन व आभार छाया दिक्कतवार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### शिवम पाटीलचे सुयश

**वलांडी, दि.१४ जानेवारी -**

संबंध देश भरात ब्रोनोब्रेन या संस्थेने एक स्तुत्य उपक्रम हाती घेऊन महाराष्ट्र सह अनेक राज्यात अभ्यासिका केंद्र



चालून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधत आहे. व मुलांमध्ये गणित अंकनशास्त्र अभ्यासक्रमाचा अधिकाधिक विकास साधता यावा म्हणून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधत आहे. संस्थे मार्फत दि.१२ जानेवारी रोजी पुण्यात राज्य स्तरीय परीक्षेचे आयोजन केले होते. पुण्यातील मुशी केंद्रातील विद्यार्थी शिवम नागेश पाटील अवघ्या १२ वर्षीय बालकाने या परीक्षेमध्ये भाग घेऊन घवघवीत यश संपादन करून दुय्यम स्थान पटकावें आहे. शिवम हा मोशी प्रियदर्शनी इंग्लिश स्कूलमध्ये इंग्रजी माध्यमातून ३ री वर्गात शिक्षण घेत असून त्याच्या यशाबद्दल शिक्षक वर्गातून कौतुक होत आहे.

# कमालपुरातील हत्या; पाच जणांवर गुन्हा दाखल

**▶▶ दोन अल्पवयीन मुलांचा समावेश... ▶▶ एकाने हत्या केली तर चौघांनी पुरावा नष्ट करण्यासाठी केली मदत...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१४ जानेवारी -**

नारळ पाणी पिण्यासाठी व खाण्यासाठी गेलेल्या तिन मित्रांपैकी दोघात झालेल्या बाचाबाचीत कमलपुर येथील रितेश विरेंद्र गिरी या १७ वर्षीय तरुणाची हत्या प्रसिध्द थोरे याने केली आहे. या प्रकरणी मयताचे पिता विरेंद्र गिरी यांनी दिलेल्या तक्रारी अर्जावरुन भादा पोलिस ठाण्यात पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून यामध्ये दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. तर या प्रकरणी एकाने हत्या केली व चौघांनी पुरावा नष्ट करण्यासाठी मदत केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.



बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या प्रकरणाचे पडसाद राज्यभरात उमटत असतानाच औसा तालुक्यातील कमालपुर येथील १७ वर्षीय मुलाची हत्या त्याच्या मित्रानेच केली असल्याचे समोर आले आहे. यामुळे मराठवाड्यातील हत्या प्रकरणाचे सत्र थांबणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. औसा तालुक्यातील कमालपुर येथे शनिवार दि.११ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास प्रसिध्द मेवा थोरे व फेरोज राजू पटेल यांनी रितेश विरेंद्र गिरी याला घरी येवून बोलावून नेले. संध्याकाळी ९ वाजेपर्यत घरी पोहंचला नसल्याने रात्री रितेशच्या आई वडीलांनी गावात शोधाशोध केली. परंतू मुलगा सापडला नाही. रात्री १० वाजेच्या सुमारास प्रसिध्द थोरे यांची भेट झाल्यानंतर त्याच्याकडे विचारणा केली. त्यावेळी आमच्यापासून तेव्हाच गेला असल्याचे सांगितले. यानंतर रविवार दि.१२ रोजी सकाळी ६ वाजता आई वडील व नातेवाईकांनी पुन्हा शोधाशोध सुरु केली. यावेळी फेरोज पटेल याची भेट झाल्यानंतर यास विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. यानंतर फेरोज यास विश्वासात घेऊन विचारल्यानंतर त्याने वामन कदम यांच्या शेतातील नारळ खाण्यासाठी आम्ही तिघे जण शेतात गेलो. नारळ खाल्ली. घराकडे येत असताना विजया विठ्ठल गिरी यांच्या शेतात आलो असताना प्रसिध्द थोरे व रितेश गिरी यांच्यात भांडण झाले. रात्री ८.३० च्या सुमारास प्रसिध्द थोरे याने हातातील विळ्याने रितेशच्या गळ्यावर, डोक्यात, पोटावर व शरीरावर वार करीत जखमी करुन जिवे मारले. यानंतर मी व प्रसिध्दने सोयाबीनच्या गुळीत झाकुन ठेवले असल्याची कबुली फेरोज राजू पटेल याने दिल्यानंतर त्याला सोबत घेऊन गिरी यांच्या शेतातील सोयाबीनच्या गुळीकडे गेलो. आणि गुळी सरकावून पाहिल्यानंतर पोटावर, गळ्यावर, मानेवर, दंडावर, उजव्या खांद्याच्या दंडावर, पाठीवर धारादार शस्त्राने मारुन नग्न व मयत अवस्थेत रितेश दिसून आला. प्रसिध्द थोरे याने रितेशला मारुन गुळीत टाकल्यानंतर पुन्हा प्रसिध्द थोरे, त्याची आई त्रिशला रेवा थोरे, वडील रेवा दगडू थोरे, फेरोज राजू पटेल व त्याचे वडील राजू फरीद पटेल यांनी शनिवारी अपरात्री जावून सोयाबीनचे गुळी झाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला असल्याची तक्रार मयताचे वडील विरेंद्र गिरी यांनी भादा पोलिसात दाखल केली आहे.

यावरून पाच जणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी भादा ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक राजकुमार भोळ पुढील तपास करीत आहेत.

**वैद्यकीय अहवालानंतरच हत्येचे गुढ उकलणार**

कमालपुर व परिसरात या हत्या प्रकरणी अनेक अंदाज बांधून चर्चा होत आहे. अनेक तर्क वितर्क चर्चिले जात असले तरी रितेश विरेंद्र गिरी याच्या हत्याप्रकरणी करण्यात आलेल्या वैद्यकीय तपासणीत वैद्यकीय अहवालानंतरच या हत्येचे गुढ उकलणार आहे. यानंतर पोलिस तपासाला योग्य दिशा मिळणार आहे.

## गरसुळी तलावात संभाजी सेनेचे जलसमाधी आंदोलन

**▶▶ तालुक्यातील ग्रामसेवक मुख्यालयी राहण्याची व ग्रा.पं. चे सर्व पाणी फिल्टर सुरु करण्याची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१४ जानेवारी -**

तालुक्यातील सर्व ग्राम पंचायतचे पाणी फिल्टर तात्काळ चालू करणे व ग्रामसेवक, ग्राम विकास विकास अधिकारी यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक करावे तसेच रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना फिल्टर पाण्याची सुविधा करून देणे या मागणीसाठी संभाजी सेनचे रेणापुर तालुका प्रमुख संतोष शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गरसुळी येथील तलावामध्ये दि.१३ जानेवारी रोजी सोमवारी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत तब्बल ४ तास जलसमाधी आंदोलन करण्यात आले.

घटनास्थळी सहाय्यक गटविकास अधिकारी सतिष पाटील यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन निवेदन स्विकारुन आंदोलन मागे घेण्यास सांगितले. संभाजी सेनेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पंचायत समितीकडे अनेकवेळा वेळोवेळी निवेदन देऊन कळवण्यात आले होते की, रेणापूर तालुक्यातील ग्रामसेवक ज्या ठिकाणी नोकरीला आहेत. त्या ठिकाणी त्यांनी मुख्यालयी राहण्याचे बंधनकारक असतानाही ते आपल्या सोयी प्रमाणे जिल्ह्याच्या ठिकाणी राहतात. त्यांनी मुख्यालयी राहावेत, तसेच रेणापुर तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत येणारे पाणी फिल्टर हे सर्व सामान्याचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून शासनाने गाव तेथे पाणी फिल्टर चालू करणेसाठी लाखो रुपयांचा निधी देऊ शासनाने आपले काम पूर्ण केले पण ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने ते काम पूर्ण जबाबदारीने केले नसल्याचे निदर्शनात येत आहे. या मागण्याची तात्काळ दखल घेण्यात यावी यासाठी गरसुळी येथील तलावात जलसमाधी आंदोलन करण्यात आले.



> रेणापूर तालूक्यातील ज्या ग्रामपंचायतचे फिल्टर नादुरुस्त आहेत ते येत्या ३० तारखेपर्यंत दुरुस्त करुन घेण्यात यावेत आहे पत्र दिले असून तसेच सर्व ग्राम सेवकांना मुख्यालयी राहण्याचे लेखी पत्र देण्यात आले आहे.
> - **सतीष पाटील,** सहाय्यक गटविकास अधिकारी, रेणापूर

या आंदोलनात संभाजी सेनेचे तालुका अध्यक्ष संतोष शिंदे, मदन पाटील, एकनाथ काळे, सुरेश चव्हाण, शिवाजी खटाळ आदी सह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## आय.टी.आय. कॉलेज निलंगा येथे युवा दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१३ जानेवारी -**

स्वामी विवेकानंद जयंती निमित्त रविवार दि.१२ जानेवारी रोजी शहीद श्रीधर चव्हाण औद्योगिक प्रशिक्षण संस्था निलंगा येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयएमसी सदस्य सत्तार पटेल, प्रमुख पाहुणे शहीद श्रीधर चव्हाण यांचे माता-पिता व्यंकटराव चव्हाण व सविता व्यंकटराव चव्हाण, प्राचार्य हर्षद राजुरकर तसेच माजी प्रशिक्षणार्थी व उद्योजक स्वप्निल भोपी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी हे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी कादरी, कोयाडे, दाणे, पोटे, जाधव, जावळीकर, सूर्यवंशी, मलकणे, सांगळे, देशमुख, देवणे, बनसोडे, ढाले, पोतदार, कलाने, दूधभाते व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी विविध ग्रंथाच्या वाचनाचा छंद बाळगावा : प्रा.डॉ. पांडूरंग मुट्ठे



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१४ जानेवारी -**

आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या आहारी न जाता, मोबाईलचा त्याग करावा व पुस्तकाला जवळ करावे त्याबरोबरच आपल्या आवडीच्या विविध ग्रंथाचे वाचन करावे. ग्रंथच आपल्या जीवनाला आकार देतात. आपल्या व्यक्तिमत्व विकासाला प्रेरणा देण्याचे काम ग्रंथ करीत असतात.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमाच्या पुस्तका बरोबरच वाचनाची गोडी वाढविण्यासाठी आपल्या आवडीचे पुस्तके वाचण्यास सुरुवात करावी व आपल्या अभ्यासाबरोबर विविध थोर महान व्यक्तीचे चरित्र वाचन करून त्यांचे विचार अंगीकारावे, असे प्रतिपादन प्रा.डॉ. पांडूरंग मुट्ठे यांनी केले. सामुहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचक संवाद मेळावा व ग्रंथ प्रदर्शन या कार्यक्रमात ते उदघाटना प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष एल.बी. आवाळे हे होते. तर उद्घाटक म्हणून शिवनेरी महाविद्यालयाचे प्रा.डॉ. पांडूरंग मुट्ठे हे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शकील देशमुख, डॉ. राजकुमार बोपलकर, नामदेवराव जगताप, काशिनाथ बाडके, सुनिता देवशटवार, पदमा येलमलवार, लता शेरसांडे, यांची उपस्थिती होती. याप्रसंगी पहिल्या शिक्षिका ज्ञानज्योती फातिमा शेख यांच्या जयंतीचे औचित्य साधून शकील देशमुख यांनी त्यांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व वाचनालयाच्या वतीने राबवित असलेल्या उपकृमाचे कौतुक केले. या कार्यकृमाचे प्रास्ताविक डॉ. राजकुमार बोपलकर यांनी केले. सुत्रसंचालन काशिनाथ बोडके यांनी केले. तर आभार सुनिता देवशटवार यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवनंदा चौसष्ठे, अनंत सुर्यवंशी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला कोळी, आरदवाड, जोशी तसेच विद्यार्थी होते.

### 'लालबहादुर' शाळेत मकर संक्रांत सण साजरा

**उदगीर, दि.१४ जानेवारी -**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालयात मकर संक्रांति निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे तर, प्रमुख वक्त्या म्हणून मंजुषा पेन्सलवारबाई व विभाग प्रमुख सुधाकर पोलावार उपस्थित होते. मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

## जि.प, पं.स., न.पा. निवडणुकीच्या कामाला लागा : बालाजी रेड्डी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१४ जानेवारी -**

अहमदपूर तालुका शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये येथील 'शिवनेरी' शिवसेना कार्यालयात तालुकास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शिवसैनिकांनी आपले पदाधिकारी सत्तेत बसवण्यासाठी आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारला अभिप्रेत असलेले काम करून घेण्यासाठी येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकीत पक्ष संघटन मजबूत करून एकजुटीने काम करुन शिवसेनेच्या उमेदवारांना विजयी करण्याचे काम करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी प्रत्येक शिवसैनिक आले जीवाची बाजी लावून आपली माणस सत्तेत सहभागी करावेत, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांनी केले.

अहमदपूर येथे 'शिवनेरी' शिवसेना संपर्क कार्यालयात आगामी काळात होणाऱ्या जि.प., पं.स., न.पा. निवडणूक या विषयावर पदाधिकारी यांच्या सोबत बैठक घेऊन चर्चा केली. तसेच मस्साजोग येथील संतोष देशमुख, परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी यांच्याप्रती भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जि.प. मतदार संघातील प्रत्येक पंचायत समिती गणात रक्तदान शिबिर, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना उपयोगी साहित्यांचे वाटप, वयोवृद्ध व्यक्तींच्या डोळ्यांची तपासणी, मोफत शस्त्रक्रिया शिबिर अशा समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त स्वामी विवेकानंद मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिरात भाग घेऊन शिवसैनिकांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिराला शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी भेट दिली.



यावेळी बैठकीसाठी तालुका प्रमुख दत्ता हेंगणे, शिवसेना जिल्हा कार्यालय प्रमुख सुभाष गुंडीले, उपतालुका प्रमुख अनिकेत फुलारी, गणेश माने, लहू बारवाड, तिरुपती पाटील, नगरसेवक संदीप चौधरी, माऊली देवकते, पद्माकर पेंढारकर, शिवकुमार बेद्रे, शिवा भारती, सुधाकर बारवाड, सुधाकर जायभाये, विश्वनाथ पवार, बाबाराव परतवाघ, गजानन येन्ने, विश्वनाथ अंकुलगे, दामोदर घोरपडे, रवी राचमल्ले, गंगाधर कल्याणे, रवी चामवाड, वैभव देशपांडे, व्यंकट सुरकुटे, भगवान कदम, गणेश राठोड, संतोष सूर्यवंशी, शिवदत्त मद्दे, गोविंद सलगर, राघोबा सोडगिर, अभिजित तिडोळे, कैलास राऊतराव, महादेव बिराडे, मारोती बिराडे, सचिन गुंडरे, कालिदास धुळगुंडे, विजय ढाकणे, निलेश अलापुरे, पुंडलिक गोरटे यांच्यासह शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.